
# महाभारत

मराठी अनुवाद

श्री. अशोक कोठारे



खंड ४१

शांतीपर्व

# महाभारत

## महाभारत खंड एकेचाळीसावा

## शांती पर्व भाग सहावा

## मोक्ष धर्म पर्व

अशोक कोठारे

**ई साहित्य प्रतिष्ठान**

विशेष सुचना - महाभारताचे सर्व खंड वाचण्यासाठी कृपया खालील लिंक वर जा.
http://www.esahity.com/23092343238123512366234023812350.html

# महाभारत

मराठी अनुवादक : श्री. अशोक कोठारे

ashokkothare@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क अनुवादकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी अनुवादकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

**ई साहित्य प्रतिष्ठान**

G1102, Eternity, Eleventh floor

Eastern Express Highway. Thane, 400604

**www.esahity.com**

**esahity@gmail.com**

©esahity Pratishthan®2018

• विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

• आपले वाचून झाल्यावर आपण हे फॉरवर्ड करू शकता.

• हे पुस्तक वेबसायटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचना व्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

**प्रकाशन : १० जून २०२१**

## अनुवादकाचे दोन शब्द –

हिंदू मान्यतेत ज्या कांहीं रचना सर्वमान्य आहेत त्यातील एक महाभारत आहे. हिंदूंच्या सगळ्या परंपरा, चालीरिती, संस्कार ह्यांची मुळं महाभारतात आहेत. चौकस हिंदू व्यक्तिला बर्याच वेळा अमुक प्रथा कां प्रचारात आली असा प्रश्न पडतो परंतु, त्याचे समाधानकारक उत्तर मात्र त्याला मिळत नाही. चार जण चार कल्पना सांगतात व त्याचा गोंधळ उडतो. ते होऊ नये व त्या वहिवाटी, प्रथा ह्यांचे मूळ कोठे आहे ते लक्षात यावे ह्यासाठी हा प्रयत्न आहे, हा अनुवाद वाचला कीं, त्या प्रश्नांची समाधानकारक उत्तरं मिळतील अशी माझी अपेक्षा आहे. म्हणून, मी महाभारत ह्या महाकाव्याचा मराठीत अनुवाद करण्याचे ठरवले. आता पर्यंत महाभारतावर बरेच लिहीले गेले आहे व ह्यापुढेसुद्धा पुष्कळ लिहीले जाईल पण महाभारत, जसें आहे तसें, एक शैक्षणिक माध्यम म्हणून वाचकांना मिळणे आवश्यक आहे व ते ह्या भाषांतराने मी वाचकांना देत आहे.

महाभारत हे एक महाकाव्य आहे. असें म्हणतात, हा सर्वात मोठा ग्रंथ आहे. मी मात्र अनुवाद करतांना तो गद्यात केला आहे कारण, मला कवितेचे अंग नाही. महाभारताच्या उपलब्ध प्रतिंत कांहीं भेद आढळतात. त्यासाठी सगळे भेद भाषांतरात घेतले आहेत म्हणजे, कांहीं राहून जावू नये. त्या शिवाय, सामान्य वाचकांना कथाभाग अधिक चांगल्या प्रकारे समजावा म्हणून कांहीं टीपा दिल्या आहेत.

माझे वाचक साधे मराठी आहेत ज्यांचे ज्ञान मोजके आहे असें गृहीत धरून मी अनुवादाची भाषा बाळबोध मराठी ठेवली आहे, त्यामुळें कोणालाही ते सहजपणे वाचता येईल व समजेल. कांहीं लेखक अशा ग्रंथाचे अनुवाद करतांना प्राचीनतेचा अनुभव यावा म्हणून मुद्दाम प्राचीन (Archaic) शब्दप्रयोग वापरतात परंतु, माझा असा अनुभव आहे किं, बहुतेक वाचकांना ते वाचण्यास त्रास होतो. म्हणून भाषा आपली नेहमीचीच ओघवती ठेवली आहे.

महाभारताचे अठरा पर्व आहेत व त्या आधीचा असा आदिपर्व म्हणून एक जोडला आहे. आदिपर्वामुळे महाभारतातील मुख्य कथाभागाचा पूर्वेतिहास वाचकांना समजेल. आदिपर्वात हिंदूंच्या अनेक पुराणांच्या मुळसुत्राची कल्पना येते. म्हणून तो माझ्यामते फार महत्वाचा आहे. मी मात्र अनुवाद करण्याच्या सोयीसाठी संपूर्ण महाभारत चाळीसांपेक्षां

जास्त खंडांत विभागून दिले आहे. त्यामुळें इंटरनेटवर चढवतांना व उतरवतांना सोपे जाईल अशी अपेक्षा आहे. त्यातील हा एकेचाळीसावा खंड, शांती पर्व भाग सहावा, मोक्ष धर्म पर्व, आपण आता वाचणार अहात. ह्या खंडामध्ये शुद्ध अध्यात्म विद्या सांगितली आहे. ह्या आधीच्या शांती पर्वांतील खंडांतून नितीशास्त्र समजावून सांगितले आहे. हिंदू धर्माचे हे दोन भाग आहेत. त्यानंतर कर्मकांड येते परंतु, त्यावर महाभारतात विशेष चर्चा केलेली नाही. कर्मकांड आगम शास्त्रातून तयार झाली आहेत.

शांती पर्वात हिंदू धर्माचे मूलभूत ज्ञान सांगितले आहे. त्यात नितीशास्त्र, अध्यात्म विद्या आणि कर्मकांड अशा तीन विभागात ते दिलेले आहे. युधिष्ठीर व भिष्म ह्यांच्या संवादाच्या रुपात ते दिलेले आहे. नितीशास्त्रात माणसांने इतर लोकांशी, प्राण्यांशी व वस्तुमात्रांशी कसे व्यवहार करावेत त्याचे विवरण आहे. अध्यात्मविद्येत माणसांने त्याच्यामध्ये असलेल्या आत्म्याला कसे समजून घ्यावयाचे त्याची चर्चा केलेली आहे. कर्मकांड माणसाला त्याचे भाग्य बदलण्याची इच्छा असते त्यासाठी विविध देवतांना कसे खूष करावयाचे त्यासाठी काय करावे त्याची माहिती आहे. कर्मकांड हा एकाप्रकारे भ्रष्टाचाराचा भाग आहे. देवतांना वशिले लावून आपले भाग्य सुधारता येते अशा संकल्पनेतून हा भाग विकसित झाला आहे. कर्मकांड कितपत माणसाचे दैव सुधारू शकते हा विवाद्य विषय आहे. मनुष्य आशावादी असतो व म्हणून तो कृत युगापासून त्या वशिलेबाजीत रमलेला आहे. कृतयुगात प्रामुख्याने यज्ञ त्यासाठी सांगितले आहेत. परंतु, कलीयुगात त्याचे स्वरुप बदलून सामान्य पुजा विधीमध्ये ते रुपांतरीत झालेले आपण पहातो. उपास तापास, व्रतवैकल्ये, शाकाहार करणे अशी आणखीन कांहीं रुप कर्मकांडात आपण पहातो. शुद्ध हिंदू धर्मात कर्मकांडाला महत्व नसते. त्यात पहिले दोन म्हणजे नितीशास्त्र आणि अध्यात्मविद्या ह्यांच्यावर भर असतो. कर्मकांडाचे महत्व पुरोहित वर्गांने त्यांच्या स्वार्थासाठी अवास्तव प्रमाणात वाढवले आहे आणि कर्मकांडातील विधी करणे म्हणजेच हिंदू धर्म असा एक गैरसमज पसरवण्यात ते यशस्वी झालेले आहेत हे आपल्याला दिसते. त्यासाठी अनेक संघटना पुरोहीत वर्गाने यशस्वीपणे कार्यरत केल्या आहेत. समर्थ रामदासांनी तीनशे वर्षापूर्वीच त्यांच्या दासबोधात ते सगळे दिले आहे परंतु, त्याकडे हिंदू

समाजाचे त्याच्या अशिक्षित रहाण्याच्या प्रवृत्तीमुळे दुर्लक्ष झालेले आहे. प्रत्येक हिंदूंने त्याला त्याचा धर्म समजून घ्यावयाचा असेल तर शांतीपर्व चांगले लक्ष देऊन वाचावे.

महाभारत कधी लिहीले गेले असा प्रश्न नेहमी ते वाचणार्याच्या मनात डोकावतो म्हणून त्याबद्दल थोडे लिहीत आहे. महावीर व गौतम बुद्ध आपल्याला माहीत आहेत, साधारणपणे इसवीसन पूर्व ५५० वर्षे ते दोघे महानुभाव होऊन गेले. जर महाभारताची रचना त्या आधीची असती तर त्याचा उल्लेख त्या काळातील जैन व बुद्ध साहित्यात निश्चितच आला असता. बुद्धाला सांख्यमुनी असें संबोधतात. कारण, त्याचे तत्त्वज्ञान सांख्य विचारावर आधारीत आहे. व्यासांची भगवत गीता वेदांताचे तत्त्वज्ञान मांडते जे तुलनेने अर्वाचीन आहे व सांख्य विचार हा हिंदू तत्त्वज्ञानातील पहिला म्हणजे, सर्वात जास्त जुना समजला जातो. जर ते बुद्धाच्या आधीचे असते तर निश्चितच त्याचा प्रभाव बुद्धाच्या विचारांवर झालेला दिसला असता. विशेष करून हे दोघे राजघराण्याचे होते म्हणजे त्यांचे शिक्षण त्या काळातील सर्वोत्तम असणारच मग त्याच्या अभ्यासात गीता, कृष्ण हे आले असते. विशेषकरून जर ते दोघे धर्मावर काम करत होते तर हे अपेक्षित आहे. परंतु, प्रत्यक्ष असें दिसते किं, त्या दोघाच्याही तत्कालिन साहित्यात तो उल्लेख आढळत नाही. ह्याचा अर्थ महाभारत त्या नंतरच्या काळात रचले गेले असावे. दुसरा अंदाज असा कीं, वेदांत तत्त्वज्ञान लिहीणारे व्यास व महाभारतकार व्यास एकच व्यक्ति होती असें साधार मानले जात आहे. वेदांताचा सार महाभारतातील गीतेत आहे. वेदांत तत्त्वज्ञानाचा उगम त्याच सुमारास झाला हे सर्वमान्य आहे. महाभारत लिहीणारे व्यास सांगतात, वेदांचा विसर पडत चालला आहे तरी ते ज्ञान सोप्या भाषेत सामान्यानां समजावे म्हणून कथारुपातून ते उपलब्ध व्हावे ह्यासाठी त्यांनी महाभारत ही काल्पनिक रचना केली आहे. असें सर्व पहाता आपण अंदाज करू शकतो किं, महाभारत इसवीसन पूर्व ४००च्या सुमारास म्हणजे, सम्राट अशोकाच्या आधी लिहीले गेले असावे.

महाभारतात स्वतः व्यास एक पात्र अशी भूमिका करतांना दिसते. त्याप्रमाणे कृष्ण म्हणून जे पात्र आहे त्याचे सगळे कर्तव्य पहाता व्यास ज्यांचे खरे नांव कृष्ण द्वैपायन आहे, तेंच करीत आहेत असे वाटते. म्हणजे महाभारतकार व्यास त्यांच्या रचनेत दोन भूमिका करतांत असें म्हणावे लागेल. त्यामुळें असे समजण्यास हरकत नसावी कीं, महाभारत

त्यांच्या कल्पनांचाच एक भाग आहे. कदाचित असें म्हणता येईल कीं, महाभारत हा एक दंतकथांचा संग्रह आहे व त्याद्वारा नैतिकमुल्ये शिकवण्याचा प्रयत्न झाला आहे.

माझ्या मते, अशा चर्चेत वेळ व्यर्थ न घालवतां हिंदूंनी महाभारतातील कथांतून काय सांगावयाचे आहे ते पहावे. एक ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून महाभारत उपयोगी येईल असें वाटत नाही. महाभारतातील कथा पहाता, त्यातील अतिरंजित प्रसंग हेंच सांगतात किं हे सगळे कपोलकल्पित आहे. परंतु, त्यांतून जे शिकवण्याचा प्रयत्न झाला आहे तो अप्रतिम आहे.

आपल्याकडे इंग्रजांनी सांप्रतची शिक्षण पद्धती आणली त्या आधी हिंदूंतील द्विज, पाठशाळांतून प्राथमिक शिक्षण घेत असतं. त्यात प्रथम, अक्षर ओळख नंतर गणित व महाभारत शिकवले जाई (पुरोहित ब्राह्मणांच्या पाठशाळांतून त्याशिवाय कर्मकांडाच्या पोथ्या शिकवल्या जात) हे लक्षात घेतले पाहिजे. कारण, महाभारतातून माणसाला जीवन कसे जगावे त्याबद्दलचे मार्गदर्शन मिळते. महाभारत हे एक शैक्षणिक माध्यम म्हणून वापरात होते. आपल्या शिवाजी राजांचे शिक्षण महाभारतातूनच झाले होते. त्यातून जे नितीशास्त्र शिकवले आहे तेंच आपले शिक्षण होते. कर्मकांडासाठी आगम शास्त्रांचा अभ्यास करावा लागतो ते महाभारतात नाही. अध्यात्मविद्येत माणसाने स्वतामधील परमेश्वर कसा पहावा कसा त्याच्याशी संपर्क करावा त्याचे शिक्षण असते तो विषय शांतीपर्वात विशेषकरून सविस्तरपणे पाहिलेला आहे. माझ्यामते, हांच उद्देश वाचकांनी डोळ्यासमोर घेऊन महाभारत वाचावे, धार्मिक ग्रंथ समजून भाबडेपणे वाचू नये कारण तो धार्मिक ग्रंथ असला तरी भक्तीमार्गी निश्चितच नाही, तो ज्ञानमार्गी आहे. असे माझे मत आहे. महाभारतात अनेक बौद्धीकं आहेत जसें भगवत गीता, विदूर गीता, कणिक गीता, व्याध गीता वगैरे. ते सगळे जीवनाचे ज्ञान आहे म्हणून प्रत्येक शहाणा हिंदू, महाभारत वाचण्यात ठेवेल तर त्याचे भले होईल. त्यांना ते सहजपणे मिळावे म्हणून हा प्रपंच आरंभला आहे. ई–साहित्य त्याचे विनामुल्य वितरण करणार आहेत म्हणून त्यांना शतशः धन्यवाद.

अशोक कोठारे



माझा ई-मेल –
ashokkothare@gmail.com

ह्या वरून आपण माझ्याशी संपर्क करू शकता.

ह्या पुस्तकाचे मुद्रण करण्यासाठी अनुवादकाची आधी परवानगी घेणे आवश्यक आहे. न घेतल्यास तो गुन्हा ठरेल व त्यावर योग्य कारवाई होईल.

ह्या ई–पुस्तकाचे विनामुल्य वितरण ई–साहित्य करणार आहेत परंतु, हे ई–पुस्तक कोणीही कोणालाही विनामुल्य भेट देऊ शकतो.

विशेष सुचना - महाभारताचे सर्व खंड वाचण्यासाठी कृपया खालील लिंक वर जा.
http://www.esahity.com/2309234323812351236623402381235O.html

## - शांती पर्व भाग सहावा –

## - मोक्ष धर्म पर्व -

## भाग चाळिसावा

भिष्म पुढे सांगतात, वासनांच्या प्रभावाने मनाचा गोंधळ होत असतो. त्यामुळें तमोगुण वाढतो. त्याशिवाय क्रोध, मोह, भय आणि मद हे दोष सुद्धा वाढतात. निव्वळ वासनांच्या नियंत्रणाने ते दोष कमी होतात. त्याची बुद्धी व्यवस्थिपणे काम करू लागते. तो तमोगुणातून रजोगुणाकडे जातो. प्रयत्नाने ते शक्य होते. परंतु, तो दोष (वासना) आवरला गेला नाही व त्यातच तो रमत असला तर त्याची अध्यात्मिक उर्जा कमी होत रहाते. त्याचे क्रोध, मोह, मद आणि भय हे दोष वाढत रहातात. त्याच्यातील शांतता संपुष्टात येते व त्यामुळें त्याचा नाश होतो. ह्यामुळें त्याचा अहंकार आणखीन वाढत असतो. त्याला त्यात जर यश प्राप्त झाले तर त्याचे ते दोष आणखीन वाढत असतात व त्याच्या तमोगुणात आणखीन वाढ होत असते. त्याच्या न पूर्ण झालेल्या वासनांमुळें त्याची पुन्हा जन्म घेण्याची इच्छा तीव्र होते. त्याचे जन्म मरणाचे चक्र त्याकारणाने अव्याहत चालत रहाते. त्याचे कारण माणसाला मिळणारा दुसरा जन्म त्याच्याच इच्छांचा परिणाम असतो. म्हणजे जर कोणतीही इच्छा उरलेली नसेल तर त्याला पुन्हा जन्म मिळत नसतो. तो आत्मा केवळ अध्यात्मिक उर्जेच्या अव्यक्त रुपात अवकाशात फिरत असतो. असें होत असतांना जर त्या अवस्थेत त्याला कांहीं इच्छा (वासना) उत्पन्न झाली तर तो पुन्हा जन्म घेत असतो. कित्येक आत्मे हजारो वर्षानंतर पुन्हा इच्छा झाली म्हणून जन्मत असतात. जेवढी वासना तीव्र तितके लवकर तो पुन्हा जन्म घेत असतो. ज्याच्या वासना नष्ट झाल्या तो जन्मरहीत होतो आणि अंतराळात शांतपणे रहातो. त्या अवस्थेत त्याचा लिंगदेह मात्र सक्षम असतो व त्याच्या आधीच्या जन्माच्या अपूर्ण इच्छांची त्याला आठवण करून देत असतो. त्यामुळें तसा एरवी उदास असलेला आत्मा पुन्हा उत्तेजित होऊन नवीन जन्माची वासना वाढवत असतो. त्यासाठी जोवर लिंगदेह आहे तोवर मुक्ती मिळणे शक्य नसते. आत्मा शरीराच्या शोधात फिरत रहातो, तो मिळणे सोपे नसते जसे अनेक आत्मे त्यांच्या

पुनर्जन्माची आस धरून वाट पहात असतात. आत्म्याला पुन्हा जन्म घेण्याची इच्छा झाल्यानंतर त्याला तो मिळण्या आधीचा काळ त्या अतृप्त आत्म्यासाठी फार वाईट असतो. मनुष्य जन्मात जे चांगले काम केलेले असते ते त्याला त्याकाळात तग धरून रहाण्यासाठी ताकद देत असतात. बहुधा आत्मा त्याच्या आधीच्या जन्माच्या आप्तांच्या कुळात जन्म घेण्याचे ठरवत असतो कारण त्याच्या लिंगदेहाचे संस्कार त्याला ते करावयास भाग पाडत असतात. परंतु, जेव्हां तो अनेक वर्षे अंतराळात तरंगत राहून त्यानंतर तो पुन्हा जन्म घेण्याचे ठरवतो तेव्हां तो कदाचित त्याच्या पेक्षा वेगळ्या कुळांत व वेगळ्या परिस्थितीत त्याचा नवीन जन्म घेत असतो. अशा आत्म्याला अपूर्ण आत्मा अस समजले जाते, त्याला त्याच्या अहंकाराने म्हणजे लिंगदेहाने घेरलेले असते. त्याचा जन्म कोणत्या तरी इतर दोन आत्म्यांच्या देहांच्या मिलनाने होत असतो. त्यामुळें त्याचे चरित्र त्या दोन अलग आत्म्यांच्या लिंगदेहाच्या प्रभावाखाली तयार होत असते. त्या नव्याने जन्म घेणार्या आत्म्याला त्या जन्म देणार्या माता पित्यांच्या संस्कारात वाढावे लागते, ते सगळे त्याच्या प्राक्तनानुसार होत असते. त्याचे व्यवस्थापन लोकपाल देवतां व त्यांचे असंख्य गण करत असतात. असे ऋषी सांगतात कीं, जन्मानंतर सुद्धा तो आत्मा त्याचे आधीचे कर्म भोग आठवत असतो. परंतु, जसे त्याचे शरीर वाढत असते त्याच्यावर होणार्या नवीन संस्कारामुळे त्याला त्याचा विसर पडतो. त्याला मिळणारे शरीर त्याच्या आधीच्या कर्मविपाकानुसार असते. म्हणून कांहीं सशक्त असतात तर कांहीं अशक्त असतात, कांहीं बहिरे, कांही आंधळे, कांहीं लुळे असे दोष घेऊन येतात. त्याचा श्वासोंश्वास त्याचे शरीर वाढवत असतो. त्याचा अहंकार लहानपणी सुप्तावस्थेत असतो परंतु, तो जसे शरीर वाढत असते तो सक्रिय होत जातो. अहंकार सुप्तावस्थेत असतांना तो पाप अथवा पुण्य करू शकत नसतो. म्हणून त्या अवस्थेतील बालकाला देवाची उपमा दिली जाते व त्याची पुजा केली जाते. कारण एकापरीने तो साक्षात परमेश्वराचे रुप असतो. पुढे जसा त्याचा अहंकार जागृत होतो तो पाप व पुण्य करण्यास योग्य होतो. म्हणून त्या काळातील मुलांना कायदा कानूचे नियम बंधनकारक नसता. शरीराच्या प्रभावामुळें तो दुःख आणि सुख ह्यांचे अनुभव घेऊ लागतो. त्याचा

लिंगदेह त्याला त्याच्या आधीच्या जन्माच्या वासनांची आवठण करून देत असतो व त्यामुळें तो त्यात अडकत असतो.

त्याला मिळणारा जन्म त्याच्या आधीच्या जन्माचा कर्मविपाक असतो. असें सांगतात, कीं, त्या बाल्यावस्थेत असलेल्या मुलाचे संरक्षण लोकपाल देवता त्यांच्या गण देवतांच्या मदतीने करत असते. म्हणून अशा बालकावर अन्याय करणार्याला मोठे पाप लागत असते.

मोक्ष धर्म पर्व भाग चाळीसावा संपला.

# मोक्ष धर्म पर्व

## भाग एकेचाळीसावा

भिष्म सांगतात, मी आता तुला सांगणार आहे इंद्रियांचे नियत्रण कसे करतात. जे वेदांत सांगितले आहे. ते समजल्यावर ज्ञानाच्या अतिउच्च अवस्थेत तू जाशिल. सगळ्या प्राणीमात्रांत मनुष्य श्रेष्ठ आहे. माणसांत वेद जाणणारे श्रेष्ठ असतात. त्यांना म्हणून ब्राह्मण (ब्रह्माला जाणणारा) असें बोलले जाते. ते ज्ञान नसलेला मनुष्य त्याच्या जीवनात अडथळत जगत असतो त्याला ब्राह्मणांकडून मार्गदर्शन घ्यावयाचे असते. पण जर तो ब्राह्मण स्वतःच अज्ञानी असेल तर त्याला जास्त मोठा धोका असतो. असे अज्ञानी ब्राह्मण त्याला नको ते कर्मकांड करण्यास सांगून त्याला मार्गभ्रष्ट करू शकतात. परंतु, जर खरा ब्राह्मण मार्गदर्शन करत असेल तर त्याचे कल्याण होत असते. दुसरे कांहीं नाही समजले तरी जो चांगुलपणा, माणूसकी आणि भूतदया ह्या त्रिसुत्रीचे प्रामाणिकपणे पालन करतो त्याचा अध्यात्मिक उद्धार निश्चितपणे होत असतो. हि त्रिसुत्री हांच खरा हिंदू धर्म (सनातन) आहे हे लक्षात घे. बाकी सगळे निरर्थक समज. त्यानंतर ब्रह्मचर्य सांगितले आहे. त्यात लैंगिक जीवनाचा विचार असतो. लैंगिक वासना माणसाची अध्यात्मिक उर्जा सर्वात जास्त प्रमाणात खर्च करत असते म्हणून त्याचे नियंत्रण जास्त महत्वाचे असते. त्यानंतर आहे क्रोध त्यानंतर आहे मत्सर, गर्व, लोभ, मोह अशा क्रमाने ते अध्यात्मिक उर्जा संपवत असतात म्हणून त्यांचे नियंत्रण सांगितले आहे. जो ह्या वासनांत स्वताला गुंतून ठेवत नाही त्याची अध्यात्मिक उर्जा वाढत असते. अखेरीस तो ब्रह्मपदी जातो. तसा मनुष्य त्याच्या पुढच्या जन्मी ब्राह्मणाच्या कुळात जन्म घेतो. ब्रह्मचर्य पाळणे सोपे करण्यासाठी त्याला शरीरावर नियंत्रण ठेवावे लागते. त्यासाठी पुरूषाला सांगितले आहे त्यांने सगळ्या महिलांत माता, भगिनी व कन्या पहाव्यात त्यामुळें त्याच्या वासना कमी होतात. स्त्रीयांसाठी पुरूषांत पिता व बंधू आणि पुत्र पहाण्याचे सांगितले आहे. कारण माता, भगिनी आणि कन्य ही नाती सात्त्विक (पवित्र) समजली जातात. त्याच प्रमाणे पिता, बंधू आणि पुत्र ही नातीसुद्धा पवित्र मानली जातात. ते मनाने ठरवले कीं, ब्रह्मचर्य पालन सोपे असते. त्याशिवाय त्याच्या घरचे संस्कार, समाजाचे संस्कार आणि त्याची

स्वताची सदसद्विवेक बुद्धी हे मदत करणारे असावे लागतात. माणसाचे मन व बुद्धी सवय प्रधान असल्यामुळे जी सवय विचार करण्याची त्यांना लावली जाते (त्यालाच संस्कार असे म्हणतात) त्याप्रमाणे त्या माणसाच्या मनात विचार येत असतात. यौवनावस्थेत शरीराच्या जोरामुळें ते नियंत्रण थोडे अवघड असते परंतु, परिश्रमाने व मनाच्या शिस्तीने ते सोपे होते. थोडक्यात सांगावयाचे म्हणजे अध्यात्मिक उर्जेचे व्यवस्थापन म्हणजे सनातन धर्म आहे.

मोक्ष धर्म पर्व भाग एकेचाळीसावा संपला.

# मोक्ष धर्म पर्व
# भाग बेचाळीसावा

भिष्म सांगतात, सुखाच्या अभिलाषेमुळें मनुष्य विविध भोग जे त्याची इंद्रिये सुचवतात त्यात रमण्याचा प्रयत्न करत असतो. परंतु, ज्यांना त्यातील फोलपणा समजला ते सूज्ञ लोक त्यामध्ये जास्त रमत नाहीत. ते त्यांच्याकडे औदासिन्याने पाहू लागतात. तरी गृहस्थाश्रमाच्या काळात तो त्यात रमून त्यातील सुखाच्या मर्यादा समजून घेत असतो. परंतु, जे रजोगुणी व तमोगुणी असतात ते मात्र त्या क्षणभंगूर सुखामध्ये पुन्हा पुन्हा अडकण्यातच शहाणपणा समजतात व अखेरीस दुःखामध्ये, निराशेमध्ये अडकत असतात. त्यांचे अज्ञान त्याना त्या सुखाच्या मोहात अडकवून ठेवत असते. असे लोक त्या अज्ञानात स्वताला सुखी समजतात व मोक्षापासून दूर जातात. परंतु, जे सावध होतात ते त्यात न रमता त्याचा त्याग करून त्यांबद्दल औदासिन्य धारण करून मोक्षाचा मार्ग पसंत करतात. ते विरक्त जीवन पसंत करतात. शरीराच्या सुखात ते रमणे मूर्खपणा समजतात. दुर्दैवात असलेल्यांबद्दल अनुकंपा येणे हें सुद्धा त्याबद्दल आकर्षण असल्यासारखे आहे म्हणून त्या परिस्थितीतसुद्धा तो वैरागी तटस्थ असेल. म्हणजे जगात कांहींही होवो, त्याला त्याच्याशी कसलाही संबंध नसला पाहिजे. कोणाच्या सुखात किंवा दुःखात तो सामील नसेल. तो त्याच्या मनात येणारे विचार व त्यानुसार जर कृती झाली तर ती तो सावधपणे अभ्यासून त्यात तो गुंतत नाही हे तपासत असेल. समाजात वावरतांना तो केवळ चांगुलपणाने वागत असेल. दुसरे कसे वागतात त्याचा तो अभ्यास करत असेल. त्यातून त्यांच्या चुकीच्या अथवा योग्य वागण्याचा (त्या वागण्याच्या परिणामावरून) तो अभ्यास करत असेल. त्यातून तो चांगुलपणा, माणूसकी आणि भूतदया ही तीन तत्त्व समजून घेईल. फावल्या वेळांत तो ध्यान करण्यात त्याचा समय घालवेल. रात्र झोपल्यावर तो ध्यानात जाईल. जितके विरक्त जीवन तो जगेल तितकी त्याला मनाची शांती प्राप्त होईल. जेवढे वासनात मनुष्य गुततो तितका तो विवंचनांत अडकत असतो. परंतु, शरीराच्या वासना त्या शरीराला जगण्यासाठी आवश्यक असतात तेवढ्याच जर तो त्या मर्यादेत ठेवेल तर त्याची मनाची शांती कायम राहिल. त्यासाठी

सत्यवादी असावे, सर्व व्यवहारात प्रामाणिकपणा असावा, इतरांशी क्षमाशिल असावे, जास्त लालसा नसाव्यात, आपल्या सगळ्या गरजा किमान मर्यादेत ठेवण्याचे त्याला जमले पाहिजे. ज्याने ह्या प्रकारे जगण्याची सवय केली त्याला विवंचना त्रास देत नाहीत. पापबुद्धीच्या प्रभावाखाली मनुष्य अस्वस्थ होत असतो. पापबुद्धीचा त्याग केल्याने त्याच्या मनात शांतता रहाते. ते साध्य होण्यासाठी मनुष्य सात्त्विक प्रवृत्तीचा असला पाहिजे. रजोगुणी त्याच्या वाढत्या वासनांमुळे नेहमी त्रस्त असतो त्याप्रमाणे तमोगुणी त्यापेक्षा जास्त वासनिक असल्यामुळे तितका जास्त त्रस्त असतो. वासनांच्या अभिलाषा त्याला बेचैन करत असतात. सात्त्विक माणसाच्या भोवती देवता गोळा होतात व त्याला मदत करण्याचा प्रयत्न करतात. त्याउलट रजोगुणी आणि तमोगुणी भोवती विविध प्रकारच्या पिशाच्च देवता गोळा होतात व त्याला आणखीन सतावत असतात. कारण आपण कधीच एकटे नसतो. अदृष्य जगातील विविध शक्ती चांगल्या आणि वाईट आपल्या भोवती पिंगा घालत असतात हे नेहमी चांगले लक्षात ठेवून त्या प्रमाणे आपले विचार ठेवले पाहिजेत. मनुष्य बर्याच वेळा काल्पनिक गोष्टींच्या मागे जात असतो ते त्याला जास्त बेचैन करत असते. जे शक्य आहे त्याचाच विचार व त्याच्याच अभिलाषा माणसाने करावयाच्या असतात. जो आपल्या कुवतीच्या मर्यादा समजून त्याचे जीवन जगतो तो सुखी होत असतो. त्यासाठी माणसाने त्याच्या बुद्धीचा वापर करून त्याच्या जीवनाची दिशा ठरवली पाहिजे. ह्या ब्रह्माच्या जगात जशास तसे हा नियम काम करतो त्याचे भान ठेवून मनुष्य इतरांशी सलोख्याने वागणे रास्त समजून तसे वागेल. जो वाकडे करतो त्याचे यथावकाश तितकेंच वाकडे होणार असते म्हणून आपले पुढचे जीवन विनात्रास असावे असें ठरवून तो मोठ्या संयमाने इतरांशी वागेल. सूडबुद्धी ठेवणार नसला तरी जशास तसे ह्या न्यायाने तो इतरांशी वागेल. त्या वागण्याने तो इतरांना पाप करण्यापासून दूर ठेवेल. कमीत कमी बोलणारा, शुभ बोलणारा, दुसर्याच्या दुःखाबद्दल सहानुभूती बाळगणारा असा तो असला पाहिजे. गैरसमज न पसरवणारा, चांगल्यांना मदत करणारा, चेष्ट मस्करी न करणारा, त्यात भाग न घेणारा, असा सदोदित ब्रह्माची अभिलाषा बाळगणारा असला पाहिजे. तरी आपल्या अध्यात्म साधनेची जाहिरात तो करणार नाही. कारण ते त्याचे निजी जीवन असेल. व्यसन म्हणजे ज्या नादामुळें नुकसान होते (कायिक, आर्थिक नैतिक त्याला

व्यसन म्हणतात) ती सगळी वर्ज असतात. जर कांहीं चूका झाल्या तर त्यांचे समर्थन न करता, त्यात सुधारणा करण्याचे प्रामाणिकपणाचे धोरण असले पाहिजे. अशा रहाण्याच्या सवयीमुळें तो अध्यात्मिक दृष्ट्या शुद्ध होत असतो. जसा तो जास्त शुद्ध होतो, त्याला विश्वातील चांगल्या (शुभ) शक्ती मदत करू लागतात व त्याचा देव होत असतो. त्या उलट जर तो त्या विरुद्ध वागत असेल तर त्याला विश्वातील पापशक्ती मदत करू लागतात त्यामुळे त्याचा देव न होता तो दैत्य, दानव, राक्षस असा असुरीसंपदा जपणारा होतो.
मोक्ष धर्म पर्व भाग बेचाळीसावा संपला.

# मोक्ष धर्म पर्व
## भाग त्रेचाळीसावा

भिष्म पुढे सांगतात, योगी झोपण्याच्या ऐवजी बिछान्यावर पहूडल्यावर त्याच्या श्वासांवर त्याचे लक्ष केंद्रीत करतो व त्याच्या ध्यानात रहातो. तो त्यामुळे न झोपतासुद्धा झोपण्याचे फायदे त्याला मिळत असतात. त्या ध्यानात तो पाप विचारांपासून दूर रहातो. जर तो झोपला तर त्याच्या शरीराच्या उरलेल्या वासना त्याला स्वप्नात येऊन त्रस्त करू शकतात. म्हणून खरा योगी कधी झोपणार नाही, तो सदैव ध्यानमुद्रेत राहील. अशा श्वासावर ध्यान करण्याच्या योगाला विपाशना असें म्हणतात. विपाशना म्हणजे वि-पाश (पाश म्हणजे वासनांचे बंध त्यांचा नाश करणारा) योग असा आहे. अशा योगामुळे मेंदूत विचार उत्पन्न होण्याची क्रिया बंद होते. मनात विचार नसल्याने पोकळी तयार होते. तसे झाले कीं, विश्वातील विचारसागरात असलेले विचार त्या योग्याच्या मेंदूतील त्या पोकळीत घुसतात. जे त्याला नवीन प्रतिभा प्राप्त करून देतात. अशा योग्याला त्या तेजस्वी विचारांमुळे ज्ञान प्राप्त होत असते. त्यालाच प्रज्ञा असें म्हणतात. असे पहिला योगी हर (शंकर) सांगतो. त्यातूनच पुढे अंतर्ज्ञान सिद्धी त्याला मिळते. तशा ध्यान अवस्थेला सुशुप्ती असें म्हणतात. अत्यंत लहान मुलं तशा सुशुप्तीमध्ये झोपलेली असतात म्हणून त्यांना झोपेतून उठवावयाचे नसते. त्या निष्पाप काळात ते बालक परमेश्वरासारखे असते. त्याची योगी पुजा करतात. त्या करतां लहान बाळांची सेवा करण्याचे ऋषी सांगत असतात. तशा सुशुप्तीत रहाणारे योगी तपस्वी समजले जातात. तशाच्या मदतीला लोकपाल देवता पुढे होतात व त्याची साधना मजबूत करतात. असा मनुष्य सात्त्विक असणार असें गृहीत धरलेले आहे. पण जर कोणी तमोगुणी हट्टाने त्या अवस्थेपर्यंत गेला तर तो असुर म्हणून ओळखला जातो. त्याला त्याच्या अध्यात्मिक उत्कर्षामुळें पापसिद्धी प्राप्त होत असतात. अध्यात्मिक उर्जा चांगल्या अथवा वाईट कामासाठी वापरली जाऊ शकते. प्राचीन काळी त्यामुळें देव आणि दानव ह्यांच्या लढाया होत होत्या. ब्रह्माला पाप व पुण्य दोनही हे विश्व चालवण्यासाठी पाहिजे असतात. परंतु, ब्रह्माशी एकरुप होण्यासाठी मात्र पुण्य शक्ती आवश्यक असतात. मोक्ष धर्म पर्व भाग त्रेचाळीसावा संपला.

# मोक्ष धर्म पर्व

## भाग चव्वेचाळीसावा

भिष्म पुढे सांगतात, ज्याला त्या चार अवस्था समजल्या नाहीत त्याला ब्रह्माचे खरे ज्ञान होत नसते. त्या चार अवस्था आहेत, स्वप्न, गाढ झोप (सुशुप्ती), व्यक्त ब्रह्म आणि अव्यक्त ब्रह्म. असे प्राचीन ऋषी नारायणांने सांगितले आहे. त्या सगळ्यांना ते तत्त्वं असे सांगतात. त्या चारातील जे व्यक्त आहे ते मृत होते व जे व्यक्त नाही ते मृत होत नाही. ऋषी नारायण पुढे सांगतात, ज्यावर सगळी चराचर सृष्टी आधारलेली आहे त्याला प्रवृत्ती असें म्हणावे. तिच्यामुळे जन्म व मरण होत असतात. त्या पलिकडे जी अव्यक्त सृष्टी आहे तिला निवृत्ती म्हणतात असे ऋषी नारायण सांगत होते. प्रवृत्तीमुळे जन्म व मरणाचे चक्र अव्याहतपणे चालू असते. निवृत्ती मोक्षाकडे माणसाला नेत असते. ध्यान साधना करणारे संन्याशी निवृत्तीच्या दिशेने वाटचाल करत असतात. ब्रह्मज्ञानाची इच्छा असलेल्याला ते माहीत असले पाहिजे. सांख्यात "मनस"ला पुरूष असें म्हणतात. ते सगळे वेगवेगळे शब्द आहेत त्यांचा अर्थ एकच आहे म्हणून त्या विविध शब्दामुळे बावचळून जाऊ नकोस. प्रवृत्ती पुरूषाचाच भाग असते परंतु, तिच्या वेगळ्या कार्यामुळे तिचा वेगळा उल्लेख केला जात असतो. प्रकृतीत सत्त्व, रज आणि तम असे तिनही असतात. पुरूषात सत्त्वाच्या पुढची अवस्था व्यक्त होत असते. आपले खरे स्वरुप समजण्यासाठी ध्यान योग करणे माणसाला आवश्यक असते. त्या योगामुळें माणसातील रजो व तमो अवस्था संपुष्टात येतात. ब्रह्मचर्य आणि अहिंसा (दुसर्याला दुःख न देणे) त्याला आचरावे लागतात. दुःख पापाचे लक्षण असते जेथे दुःख आहे तेथे पाप वाढत असते. म्हणून दुःख निर्माण होणार नाही असे जीवन तो जगेल. तो फक्त जगण्यासाठी जेवेल. शरीराचे संवर्धन करेल पण त्यात गुंतणार नाही. त्याला कशाचीच अपेक्षा नसल्याने तो सदैव समाधानी असेल. कितीही योग साधना केली तरी जोवर तो सत्त्वगुणी होत नाही तोवर त्याला मोक्षसाधना करता येत नाही. कांहीं योगी किंवा साधक ब्रह्म समजण्यासाठी त्याची मूर्ती तयार करतात. ती केवळ त्यांच्या समाधानासाठी असते. त्या मूर्तीत ते ब्रह्म पहातात ज्यामुळे त्यांची ब्रह्मसाधना त्यांच्यासाठी सोपी होत असते. जर त्यामुळें ब्रह्मसाधना सोपी होत असेल तर ते चांगले

समजावे. धर्माचा मुळ उद्देश मोक्ष साधना सुकर करणे हा असतो. जो धर्म ते साध्य करू शकत नाही तो अधर्म समजावा. वेद जाणणारे सगळे असेंच समजतात. ऋषी नारायण असें सांगत होते मोक्षसाधने बद्दल.

मोक्ष धर्म पर्व भाग चव्वेचाळीसावा संपला.

# मोक्ष धर्म पर्व

## भाग पंचेचाळीसावा

युधिष्ठीर विचारतो, "जनक राजा त्याची मोक्षसाधना कशी करत होता त्याबद्दलची माहिती मला ऐकावयाची आहे तीं सांगा".

भिष्म सांगतात, त्या संदर्भात मी तुला तो संवाद सांगणार आहे ज्यात राजा जनदेवांने जे संपादन केले ते सांगितले आहे. ते आता ऐक, एके काळी मिथिलानगरीत एक राजा ज्याचे नांव जनदेव होते राज्य करत होता. त्याच्या दरबारात शेकडो ब्राह्मण शिक्षक त्याने ठेवले होते जे त्यांच्या आत्म्याच्या मोक्षाबद्दलच्या कल्पना सांगत असतं. परंतु, राजाचा वेदांचा अभ्यास चांगला होता व त्या बरहुकूम त्या विद्वानांचे विचार त्याला पटत नव्हते. त्या विद्वानांचे असें सांगणे होते कीं, मनुष्य मेला की, त्याचा आत्मासुद्धा नष्ट होतो. ते होत असतांना एक महान वैरागी, पंचशिख नांवाचा जो कपिलमुनींचा मुलगा होता, भटकत भटकत त्याच्या दरबारात येतो. तो श्रेष्ठ ऋषी समजला जात होता. त्याने सगळ्या द्वैतांवर (थंडी - गरमी, सुख- दुःख, भय- अभय, चांगले- वाईट वगैरे) मात केली होती. त्यामध्ये सांख्य विचारांचे प्रणेते कपिल मुनी ह्यांचे सगळे गुण होते. तो असुरी ऋषीचा मोठा शिष्य होता. तो विचारशून्य अवस्थेत एक हजार वर्षे तप केलेला असा होता. ब्रह्म साधनेत जे यज्ञ दिले आहेत ते सगळे त्यांने केलेले होते. आत्म्याची पांच आवरणं (अन्नमय कोश-शरीर, प्राणमयकोश-जीव, मनोमय कोश-मन, विज्ञानमय कोश-बुद्धी आणि आनंदमय कोश-लिंगदेह) त्याने अनुभवलेली होती. त्या सगळ्यांवरील संयम त्याला माहीत होते. तो मिथिलामध्ये एकदा अनेक ऋषींच्या सभेत जातो. जे सगळे सांख्य विचाराचे होते. त्या सगळ्या ऋषींनी आत्म्यावरील पांच कोशांचा अभ्यास केलेला होता. त्याचा शिक्षक असुरी ह्याला समजले होते कीं, आत्मा व शरीर हे वेगळे आहेत. त्यांने ते त्याचे संशोधन त्या विद्वान लोकांपुढे मांडलेले होते. त्याच्या मते आत्मा नश्वर नाही व शरीर अर्थातच नश्वर आहे त्याप्रमाणे त्यांने त्याचा सिद्धांत मांडला होता. शरीर नष्ट झाल्यानंतर त्यातील आत्मा इतर रुप घेत विश्वात भटकत असतो असें त्यांचे म्हणणे होते. पंचशिख त्याचा शिष्य होता. तो कपिलाच्या बायकोचे दुध पिऊन मोठा झाला होता. त्या बायकोचे नांव होते ब्राह्मणी.

तो त्याप्रमाणे कपिलाचा मुलगा समजला जात होता. त्याचे सगळे ध्यान ब्रह्मावर केंद्रीत होते. अशी पंचशिखाचे बद्दलची माहिती होती. ती माहिती मला ऋषींनी सांगितली आहे. असा ज्ञानी पंचशिख जनक राजाच्या दरबारात आला होता. तेथे तो त्याचे विचार तेथे असलेल्या विद्वानांना सांगू लागला. त्याचे बुद्धीसामर्थ्य पाहून जनकला त्याच्या बद्दल आकर्षण वाटू लागले. कपिलेय (पंचशिख) जनक (जनदेव) राजाला त्याच्या कल्पना सांगत असे. त्यामुळे प्रभावित झालेला राजा त्याच्या इतर विद्वानांना सुटी देतो. त्याला सांख्य विचारांप्रमाणे तो शिकवत होता व जनक राजा ते शिष्याप्रमाणे शिकत होता. मानवी जीवनातील दुःखांबद्दल तो जनक राजाला सांगत असे. त्यात शरीराची आणि मनाची व इतर कारणांने उत्पन्न होणारी अशी सगळी दुःख ते अभ्यासत होते. त्यामध्ये विश्वाच्या निर्मितीत असलेली दुःख पिडा ते अभ्यासत होते. कर्मकांडाच्या यज्ञादि धर्मकार्याची माणसाला कां गरज वाटते त्याचीसुद्धा ते चर्चा करत होते. ह्यासगळ्या मागे कोणता गोंधळ आहे ते जनक अभ्यासत होता. त्यांची कोणती फळ मिळतात व ती फळ त्यांच्यामुळेंच मिळतात कां? त्या फळांचे स्वरुप ते तपासत होते. त्यातून त्यांचा विश्वास झाला कीं, ते सगळे थोतांड आहे. ते सांख्यांचे मुळसुत्र मान्य करतात कीं, जीवनात फक्त दुःखच असते व त्याचा त्याग करावयाचा असेल तर सुखामागे जाणे टाळावे. कारण सुखामागे जाण्याच्या हव्यासामुळे त्या ऐवजी दुःख मिळते. सुखाचे विचार केल्यामुळे मनुष्य उलटा दुःखात जातो. म्हणून सुखाचे विचार करण्याचेच माणसाने बंद करावे ह्या धोरणातून विपाशना हि साधना पद्धती पुढे रुढ झाली. अशारितीने ते विचारशून्य अवस्थेत राहू लागले त्यामुळें ते स्वाभाविकपणे विचारसागराशी जोडले गेले व त्यानंतर त्यांना पुढचे शोध अचानकपणे लागू लागले. तरी ते मृत्यूचे स्पष्टीकरण देऊ शकत नव्हते. मेलेल्या माणसात व जीवंत माणसात काय फरक असा प्रश्न पडला होता. तेव्हां चैतन्य ह्या संकल्पनेची गरज वाटू लागली. ते ज्यामुळे शरीरात चैतन्य संचारते ते काय हा प्रश्न होता. ते ज्ञानेंद्रीयांना आकलन करता न येणारे आहे पण ते आहे हे निश्चित अशा निर्णयापर्यंत ते आले. त्यामुळें तेव्हां प्रथमच सांख्यांच्या वस्तुवादाला धक्का बसला. जीवनातील दुःख शरीराचे भोग असतात व त्याचा त्या चैतन्य देणार्या गोष्टीशी कांहीं संबंध नसतो असे ते समजून चुकले. त्याकाळात जीव आणि आत्मा असे ते दोन आहेत हे मात्र माहित नव्हते. (पुढे बुद्ध

विचारांनी त्यातील जीव मानला आहे परंतु, आत्मा ते मानत नाहीत. जीव त्या शरीराची कार्यकारी व्यवस्था आहे हे पुढे लक्षात आले व त्यानंतर वेदांता प्रमाणे जीव आणि आत्मा असे दोन वेगळे असल्याचे मान्य झाले हिंदू (सनातन) विचारानुसार.)

सांख्यांना बुद्धीचे निर्णय मान्य असतात कारण ते सांगतात कीं, पंच ज्ञानेंद्रिय जे अनुभवतात तेवढेच खरे कारण ते बुद्धीवादी आहेत बुद्धी फक्त पंच ज्ञानेंद्रियांवर विश्वास ठेवते त्या उलट मन हे कल्पनांवर विश्वास ठेवणारे वैचारिक ज्ञानेंद्रिय आहे ते सांगते कीं, त्याहूनही आणखीन कांहीं असले पाहिजे. मनाच्या भरवशांवर असणारे देवता असल्याच मानतात जे बुद्धीवादी मानत नाहीत. कारण आपली ज्ञानेंद्रिये त्यांना जाणू शकत नाहीत. जे कांहीं अव्यक्त आहे ती सगळी अव्यक्त अदृष्य सृष्टी समजण्यासाठी माणसाला त्याच्या मनाची मदत घ्यावी लागते. बुद्धी त्यात उपयोगाची नसते. कांहीं ऋषी बोलत होते कीं, जर आपण आधी होऊन गेलेल्या घटनांची कल्पना करू शकतो ज्या आपली ज्ञानेंद्रीये अनुभवू शकत नाहीत तर मग भविष्यात होऊ शकणार्या घटनांची आपण कां कल्पना करू नये? तो सांख्य विचारांना दुसरा धक्का होता. अशारितीने सांख्यांची वस्तुनिष्ठता अपुरी आहे हे लक्षात आले. त्यापुढे बराच काळ जीव आणि आत्मा ह्यांत गफलत होत होती जी आजपर्यंत कांहीं विचारवंत करत असतात. देहा बरोबर जीव संपुष्टात येतो हे लक्षात आल्यामुळे आपल्याला (सर्व चराचरांना) एकच जन्म असला पाहिजे असें समजले जाऊ लागले व तो सांख्यवादींचा समज आजसुद्धा तसांच आहे. जे धर्म आणि तत्सम विचार प्रणाली सांख्य विचाराने प्रभावित आहेत त्यानुसार समजणार्या सगळ्या तत्त्वज्ञान शाखांत आजही आत्मा मानला जात नाही व जीवालाच आत्म्याच्या जागी धरले जाते त्यामुळें अनेक प्रश्न त्यांना अनुत्तरीत असतात. त्या विचारप्रणाल्या पुनर्जन्म मानत नाहीत, देव मानत नाहीत, आणि आत्मा व कर्मविपाक हा सिद्धांतसुद्धा मानत नाहीत कारण त्या सगळ्यांचे वस्तुनिष्ठ पुरावे सापडत नाहीत. त्यात अनेक धर्म येतात. तरीसुद्धा पुढे बुद्धाने जातक कथा सांगून त्याचा पुनर्जन्मावर विश्वास असल्याचे मान्य केले असल्याचे दिसते. पुनर्जन्म मान्य करणे म्हणजे आत्म्याचे अस्तित्व मान्य करण्यासारखेच आहे. सांख्य त्याच वेळी शक्तीसातत्य हा सिद्धांत मान्य करतात. त्यामुळे ह्या जन्मात जे घडले ते कर्म त्याच्या परिणामाच्या रुपात कोठेतरी शाबूत असलेच पाहिजे मग ते पुन्हा व्यक्तसुद्धा झालेच

पाहिजे (जसे फेकलेला चेंडू परत येतोच तसे) ते शक्य होण्यासाठी त्या आत्म्याचा पुन्हा जन्म होणे अपरिहार्य ठरते. परंतु, ज्या अर्थी देहाबरोबर जीव नष्ट झाला त्या अर्थी जीवा व्यतिरीक्त आणखीन कांहीं असले पाहिजे जे त्या कर्मभोगाचा वाटेकरी असले पाहिजे हे मान्य करावे लागेल. ते दुसरे कांहीं म्हणजे आत्मा असे पुढे वेदांताने मान्य केले होते. शरीराने जे केले त्यात त्या शरीराच्या आत्म्याचा अंतर्भाग असतोच. त्यामुळें जरी शरीर व त्याबरोबर असलेला जीव संपला तरी ते कर्म त्याच्या परिणामाच्या स्वरुपात त्या आत्म्याला धरून असले पाहिजे हे मान्य करावे लागते. तो जो कर्मविपाकाचा लेखाजोखा असतो त्याला आनंदमय कोश अथवा लिंगदेह असें समजले गेले आहे. परिणामतः मृत्यू हा अंत असे नसते तर तो केवळ अर्धविराम असतो आत्म्याच्या जन्मोजन्मीच्या प्रवासाचा हे ऋषींच्या लक्षात आले. त्याचा अर्थ हा आत्म्याचा जन्मोजन्मीचा प्रवास कधीच संपणारा नाही कां"? असा प्रश्न पुढे आला. शक्तीसातत्य आणि कर्मविपाक हे दोन सिद्धांत मान्य झाले होते व सृष्टीचे कार्य ह्या नियमाने बांधलेले आहे हेसुद्धा त्यांच्या लक्षात आले होते. चराचरांचे जन्म दुसर्या जीवांच्या संयोगाने साध्य होतात त्याची अनेक उदाहरणें ऋषी लक्षात घेतात. जसें पुरूष व स्त्री एकत्र येतात व त्यातून नवीन बालक जन्म घेते त्याचा अर्थ ते जन्म घेणारे व जन्म देणारे ह्यांचे कांहीं आधीचे संबंध असणे आवश्यक ठरते. त्याला केवळ एक अपघात असें मानावयाला ते तयार नव्हते. त्याचा अर्थ सगळे जन्मणारे चराचर एकमेकांशी कोणत्यातरी नात्याने बांधलेले आहेत असे त्यांच्या लक्षात आले. त्यातून पुढे अद्वैत आणि परब्रह्म असले पाहिजे ज्याच्यातून सगळे चराचर विविध रुपाने तयार झाले आहेत हे मान्य झाले. ते मान्य करण्यासाठी मनाच्या कल्पकतेची गरज होती कारण केवळ बुद्धीच्या तर्काने ते सिद्ध न होणारे होते. म्हणून आत्मा, ब्रह्म ह्या मनाच्या कल्पकतेचा आविष्कार बुद्धीने मान्य केला. आपण केलेल्या चांगल्या वाईट कर्मांचा परिणाम (चेंडूचे परत येणे) पुढच्या जन्मीच अनुभवास येऊ शकतो कारण त्या जन्माचा देह आणि जीव उरलेला नसतो. म्हणून आपण केलेल्या कर्माचे परिणाम आपल्याला पुढच्या जन्मीच भोगावे लागतात हेसुद्धा मान्य झाले. जशास तसे व जितक्यास तितके असे ते परिणाम असले पाहिजेत हेसुद्धा मान्य झाले. पुढे पंचशिख जनकाला सांगतो कीं, शरीर नष्ट होणारे असल्यामुळे त्याला सुख अथवा दुःख नसते ते सगळे आत्म्याचे भोग

असतात. आत्मा ते त्याच्या त्या जन्माच्या शरीराच्या माध्यमातून अनुभवत असतो एवढेच. अशा शरीराबद्दल लोभ आणि मोह असणे निरर्थक असते असें तो राजाला सांगतो. ते ज्ञान ऐकून राजा जनदेव (जनकाचे दुसरे नांव) अचंबित होतो. राजा पंचशिखा कडून आणखीन ऐकण्यासाठी आतूर होतो.

मोक्ष धर्म पर्व भाग पंचेचाळीसावा संपला.

# मोक्ष धर्म पर्व

## भाग सेहेचाळीसावा

भिष्म पुढे सांगतात, "पंचशिखाला राजा विचारतो कीं, मृत्यूनंतरचे आयुष्य कसे असू शकेल ते सांगा. तो विचारतो कीं, "जर मेल्यानंतर सगळे नष्ट होते तर त्याचे ज्ञान असणे किंवा नसणे ह्यात काय फरक पडणार आहे"? कारण सगळे नष्ट होणे हांच न्याय असेल तर चांगले वाईट, मान-अपमान, सुख दुःख, असे सारे निरर्थक ठरते. फक्त जर कांहीं उरणार असेल तरच ह्या सगळ्यांची चिंता करावी एरवी खा, प्या, कर्ज काढा, मजा करा, चोरी करा, ठार मारा आणि मरून जा हांच न्याय योग्य ठरेल. कोणाला कशाचीच जबाबदारी रहाणार नाही. परंतु, आपले नितीशास्त्र वेगळे सांगत आहे, त्याबद्दल तुमचे काय सांगणे आहे ते मला ऐकावयाचे आहे.

भिष्म पुढे बोलतात, जनक राजा असा गोंधळलेला पाहून पंचशिखा त्याला सांगतो, "ह्या सृष्टीत गोष्टी संपतात म्हणजे नष्ट होतात असे नाही, त्यांचे फक्त स्वरुप बदलत असते. तसेंच कर्मविपाक हे विचाराच्या परिमाणात असल्याने ते तसेंच अवकाशात धरून ठेवलेले असते जे योग्य वेळी परत व्यक्त होणार असते. आपले शरीर, मन व बुद्धी कर्माने बांधलेली असतात ती मृत्यूमुळें जरी सुटी झाली तरी त्यांच्या जागी अव्यक्त रुपात उपलब्ध असतात. ते कधीच नष्ट होत नाहीत फक्त त्याची सामान्याना जाणीव होत नाही. ते सगळे आनंदमयी कोशात म्हणजे लिंगदेहात नोंदलेले असतात. जेव्हां तो आत्मा पुन्हा जन्म घेतो तेव्हां ती सगळी नोंद त्या लिंगदेहातून त्याच्या नवीन देहाच्या मेंदूत नोंदवली जाते. अशारितीने ते क्रमविपाक त्या आत्म्याच्या नवीन अवतारात सिद्ध होत असतात. वरकरणी जे नष्ट झाले असे वाटते ते खरेतर पुढील कारवाईसाठी उपलब्ध असते. त्या नवीन जन्माच्या पहिल्या कांहीं काळात त्या सगळ्या स्मृती जागृत असतात पण जसे तो मोठा होत जातो त्या नवीन जन्मातील होणार्या नवीन नोंदींच्या येण्यांमुळें त्या आधीच्या नोंदीना दुय्यम स्थान प्राप्त होते व म्हणून बहुधा विस्मृतीत जातात. तरी लिंगदेहात त्या शाबूत असतात. यथावकाश त्यांच्या योगाचे भोग त्याला भोगावे लागतात. अशारितीने त्या कर्मविपाकाचे फळ त्याला मिळत असते. त्यानंतर तो कर्मविपाक नष्ट होतो जसें

हिशेबाच्या वहीतून खर्च वाळता झाल्यावर त्याची नोंद काढून टाकली जाते. कारण नवीन कर्माच्या नोंदी सतत होतच असतात त्या लिंगदेहात.
ज्यांने भोगांपासून दूर रहाण्याचा निर्णय घेतला आहे व मोक्षाचा मार्ग निवडला आहे त्यांना मार्गदर्शन करण्यासाठी एक तत्त्वज्ञान आहे त्याला संम्यगवध असे म्हणतात. त्याबद्दल थोडे सांगतो. मोक्षाची इच्छा असलेला प्रथम कर्माच्या भोगांपासून अलिप्त रहाणार. जो तसे वागत नाही तो बहुधा त्या कर्माच्या दुष्परिणामामुळें दुःखात जात असतो. त्यासाठी माणसाने कर्मात रमावे पण त्याच्या फळांपासून दूर रहावे असे वेदांत सांगितले आहे. त्या कर्मातून जे फळ अपेक्षित आहे त्याचा त्याग करावयाचा असतो. तरच ते कर्म त्या कर्म करणाऱ्याला लाभत असते मोक्ष सिद्धीच्या वेळी. चांगुलपणा दाखवतांना सुद्धा त्याचे फळ त्यांने नाकारावयाचे असते. म्हणजे कोणाचे भले केले कीं, त्याबद्दल त्या बदल्यात भले मिळत असते, ते स्वीकारावयाचे नाही. त्या परतफेडीत मिळणार्या फळांत वासना दडवलेली असते. ती वासना त्या माणसाला मोक्षापासून दूर ठेवत असते. तरी त्याला सात्त्विक समाधान, सुख, आनंद, मनःशांति त्यापासून जी मिळते ती त्याची असते. अर्थात जे मोक्षाच्या लालसेने जगत नाहीत त्यांनी ते फळ घ्यावयाला हरकत नसते कारण त्याला अजून मोक्षाची लालसा झालेली नाही.
आता सांगतो, सुशुप्ती म्हणजे काय"? जेव्हां निद्रेत असतांना त्याला त्याचे ज्ञानेंद्रिय त्यांच्या जाणीवा (कानाने न ऐकू येणे, नाकांना गंध न समजणे, डोळ्याना न दिसणे, त्वचेला स्पर्श न जाणवणे) देत नाहीत तेव्हां समजावे कीं, तो गाढ झोपला आहे म्हणजे सुशुप्तीत गेला आहे. त्या प्रकारच्या निद्रेत त्याचा आत्मा त्याच्या पासून वेगळा झाला असण्याची शक्यता असते व तो कदाचित विचारसागरात वावरत असावा. त्या परिस्थितीत त्याला एरवी न समजणार्या गोष्टी समजू लागतात. त्या ज्ञानाला अंतर्ज्ञान असें सांगितले आहे. त्या अवस्थेत असलेला काळाचे भान राखू शकत नाही. म्हणजे जरी तो दहा तास झोपला तरी त्याला वाटते आत्ता झोपलो व ताबडतोब जागा झालो आहे. त्याला कशाही प्रकारचे स्वप्न पडत नाही. अशी झोप नेहमी कोठलेही औषध न घेता स्वाभाविकपणे येत असेल तर त्याचा अर्थ समजावा कीं, तो मोक्षमार्गासाठी योग्य आहे. सुशुप्तीतमध्ये जे ज्ञान होते ते तो निद्रेतून उठल्यानंतरसुद्धा आठवू शकतो. कांहीं वेळा

आत्मा मनाच्या अस्वस्थपणामुळे शरीरातून बाहेर निघतो व त्याला त्याच्या गत कर्माचे स्मरण होते तशी स्वप्न तो उठल्यानंतर बर्याच वेळा विसरत असतो. त्या दोन प्रकारच्या निद्रांत साम्य असल्याने साधकाचा गोंधळ होत असतो. लहान मुलं बहुधा सुशुप्तीत असतात जेव्हां ते झोपलेले असतात म्हणून त्यांना उठवू नये. आत्मा वस्तु नसल्यामुळे तो शरीरात आहे असे समजणे चुकीचे ठरते. त्याला कोणताही गुण नसल्याने त्याचे अस्तीत्व शरीराच्या भोवती असते ज्याला योगी "प्रभावळ" असें म्हणतात. त्या प्रभावळीवरून त्या आत्म्याची अवस्था काय आहे (तो तमोगुणाने नडला आहे कीं, रजोगुणांने कीं सत्त्व गुणाने) ते समजते. विविध रंगछटांने ते व्यक्त होत असते. तेजस्वी शुभ्र छटा मोक्षमार्गाकडे जाणार्याचे लक्षण समजले जाते. अविद्या म्हणजे भ्रम अथवा माया ह्याच्या प्रभावाने जे अज्ञान माणसात असते त्यामुळें तो हे सगळे प्रकार समजू शकत नाही. त्या अविद्येमुळें जीव व आत्मा एकच असल्याचे वाटते तेव्हां त्या जोड अवस्थेला जीवात्मा (soul) असें समजतात. सामान्य माणसाचे आत्मे नेहमी जीवात्मा असा अवस्थेतच असतात. अध्यात्मिक उर्जेच्या वाढत्या प्रभावानेच ते वेगळे जाणवू लागतात. एरवी ते एकत्रच भासतात. म्हणून सांख्यांचा असा समज असतो कीं, आत्मा व जीव एकच आहेत. जो ज्ञानाच्या उच्च अवस्थेत गेला आहे त्याला अदृष्य जगातील देवता ज्या सृष्टी चालवत आहेत, त्याला धृष्टांत देतात व त्याच्या ज्ञानात भर घालत असतात, त्यामुळे तो सिद्ध होत असतो.

जनकाचे ज्ञान पूर्ण झाले होते त्यानंतर पुढे केव्हांतरी त्याच्या मिथिला नगरीला आग लागते व ती जळून जाते तरी त्याला त्याबद्दल यत्किंचित सुद्धा दुःख होत नाही. त्याचे सुख व दुःख समान झाले होते. भिष्म सांगतात.

मोक्ष धर्म पर्व भाग सेहेचाळीसावा संपला.

## मोक्ष धर्म पर्व

## भाग सत्तेचाळीसावा

युधिष्ठीर पुढे विचारतो, "जीवनाच्या दृष्टीकोनातून पहाता, काय केल्याने मनुष्य सुखी होतो किंवा दुःखी होतो तसेंच, काय केल्याने मनुष्य भितीमुक्त होतो व त्याचा जीवनाचा प्रवास यशस्वी ठरतो ते सांगा".

भिष्म सांगतात, सगळ्या चारही वर्णाच्या लोकांसाठी संयम हा उत्तम मार्ग सांगितला आहे श्रृतीमध्ये. परंतु, ब्राह्मणांसाठी मनाचा व इंद्रियांचा संयम जास्त महत्वाचा म्हणून सांगितला आहे. धार्मिक विधी, यज्ञविधी, तपस्या करणे, सत्याचा आग्रह धरणे अशा व्रतस्थ जीवनाचा विशेष आग्रह धरला आहे. संयमामुळे अध्यात्मिक उर्जा वाढते, त्या कारणांने त्याच्यातील दैविक शक्तींचा उद्धार होणे सोपे होते जर तो त्या वेळी सात्त्विक प्रवृत्तीला प्रोत्साहन देईल. जर त्याने रजोगुण अथवा तमोगुण आचरला तर त्यात असुरी संपदा वाढू शकते. संयमामुळें माणसाच्या मनाचा तोल जात नाही. तो शांत राहू शकतो. ज्याने संयम साध्य केला आहे तो त्याचे विविध शत्रू जसें वासना, लोभ, मोह, क्रोध त्याच्यापासून दूर ठेवू शकतो. ज्याच्यामध्ये संयम नाही तो त्या शत्रूंच्या आहारी जातो जसे गाय वाघाच्या तावडीत सांपडते. कारण कीं, जास्त करून माणसे संयमी नसतात त्यांना नियंत्रित करावे लागते त्या कामासाठी ऋषींनी राजाची नेंमणूक केली. जो ब्राह्मण असूनही क्षत्रिय बाणा दाखवत असतो. म्हणून संयम हा उत्तम गुण समजला आहे. संयम करण्याचे समजण्यासाठी मर्यादा समजणे जरूरीचे असते. प्रत्येक गोष्टीच्या मर्यादा असतात, त्यांचे भान ज्याला आले तोंच संयम करू शकतो. संयमाची लक्षणं अशी आहेत, तो क्षमाशिल असतो, मितभाषी असतो, निरर्थक चर्चा करत नाही, आहार, विहार आणि विचार ह्यांच्या मर्यादा तो समजून त्याची कामं करत असतो. तो स्तुतीने भाळत नाही आणि टीकेने त्रस्त होत नाही. तो कधी जास्त आनंदी अथवा दुःखी होत नाही कारण त्याला आनंद व दुःख ह्याच्या मर्यादांचे भान असते. तो कोणाचाही शत्रू किंवा मित्र नसतो कारण ती दोन नाती वासनांवर आधारीत असतात ते तो समजून असतो. ज्याला वासनांच्या मर्यादा समजतात तो स्थीर बुद्धीने जगत असतो. तो कशानेही भित

नाही व कोणालाही घाबरवत नाही. अशा इसमाला देवता अनुकूल होतात व त्याचे जीवन समाधानी होते. असंयमी त्याच्या नेमके उलट वागतात, त्यांना दैवतांची अनुकूलता प्राप्त होत नाही.

मोक्ष धर्म पर्व भाग सत्तेचाळीसावा संपला.

# मोक्ष धर्म पर्व
## भाग अठ्ठेचाळीसावा

युधिष्ठीर पुढे विचारतो, तीन द्विज वर्गातील लोक (ब्राह्मण, क्षत्रिय आणि वैश्य) यज्ञ केल्यानंतर त्याचे उरलेले मांस व मदिरा (वारुणी) प्रसाद म्हणून खातात (ग्रहण करतात) त्यांच्या भल्यासाठी, त्यात काय उद्देश असतो ते सांगा.

भिष्म सांगतात, "जे तसे खातात यज्ञात दिलेल्या शपथांचे पालन न करता ते दुर्गुणी ठरतात. त्यांना अपेक्षित फळ मिळत नाही. असे लोक त्या यज्ञाच्या प्रभावामुळें स्वर्गात जातात परंतु, लवकरच खाली फेकले जातात".

युधिष्ठीर पुढे विचारतो, "सामान्य माणसे समजतात कीं, उपवास करणे एवढे व्रत पुरेसे आहे, मला सांगा, त्यापेक्षा आणखीन जास्त काय करावयाचे असते"?

भिष्म सांगतात, "केवळ उपवास करणे मग तो कितीही दिवसांचा असो पुरेसा नसतो. त्याला व्रत समजले जात नाही. आत्म्याचे ज्ञान जर त्यामुळे होत नसेल तर ते व्यर्थ असते. अहंकाराचा त्याग ही त्यासाठी पहिली गरज समजली जाते. त्यामुळें जी नम्रता, जे शांतचित्त, जे कर्मफळ त्याग तो करतो ते प्रत्यक्ष उपवासापेक्षा जास्त महत्वाचे असतात. माणूसकी, चांगुलपणा व भूतदया ही खरी उपवासाची लक्षणं समजली जातात. म्हणजे अहंकारामुळें जे दोष माणसात उत्पन्न होतात त्यांचा त्याग म्हणजेच खरा (त्यांचा) उपवास असं समजले जाते. खाण्याचा उपवास हे केवळ निमित्त मात्र असते. जो खाऊनसुद्धा जर त्या अहंकारच्या दोषांचा त्याग करत असेल तर तो खरा उपवास हे समजून घे, युधिष्ठीरा. ब्रह्मचर्य पालन हा सुद्धा एकप्रकारचा उपवास समजला जातो. कमी बोलणे, ध्यानस्थ बसणे हे उपवासाचे विविध प्रकार आहेत. देव त्याला अनुकूल होतात.

असा मनुष्य यज्ञाच्या उरलेल्या प्रसादाचा भोग घेत आहे असेंच समजले जाते".

युधिष्ठीर पुढे विचारतो, "खाण्याच्या उपवासात तो दिवसातून एकदाच सकाळी व नंतर रात्रा खात असेल. त्याशिवाय ब्रह्मचर्य पालन करत असेल. तो अतिथींना जेवू घालत असेल कारण तो गृहस्थ असेल. त्याचा उपवास सिद्ध होतो.

भिष्म पुढे सांगत असतात, जो त्याच्या पत्नीशिवाय इतर स्त्रीकडे पहात नाही, स्वताच्या पत्नीच्या पाळीनंतर फक्त तिच्या संमतीने संभोग करतो पुत्र प्राप्तीकरता तो ब्रह्मचारी समजला जातो. तो सत्पात्र दानं करत असेल. तो त्याच्यावर अवलंबून असणार्यांना प्रथम खाण्यास देतो व नंतर खातो तो ब्रह्मचारी समजला जातो. तो त्याच्यावर अवलंबून असणार्यांचा अपमान करत नसेल, त्याचा उपवास सिद्ध होतो. यज्ञात देव, पितर आणि पिशाच्च ह्यांना शिधा देतो व नंतर खातो तो खरा उपवास समजावा. असा मनुष्य त्याच्या परिवारासह सुखाने जगत असतो. तो मृत्यूनंतर उच्चस्थानी जातो.

मोक्ष धर्म पर्व भाग अठ्ठेचाळीसावा संपला.

# मोक्ष धर्म पर्व

## भाग एकोणपन्नासावा

युधिष्ठीर पुढे विचारतो, "सुखासाठी मनुष्य चांगले वाईट करत असतो. त्या त्याच्या कृत्याचे उत्तरदायित्व (त्याचे परिणाम भोगावे लागतात कां?) त्याला असते कां"? ह्या बद्दल माझ्या मनात शंका आहेत म्हणून मी ते विचारत आहे. ते मला समजावून सांगा".

भिष्म सांगतात, ह्या संदर्भात मी तुला एक प्राचीन किस्सा सांगतो तो ऐक, तो इंद्र आणि असुर राजा प्रह्लाद ह्यांच्यातील आहे. दैत्यांचा राजा सगळ्या प्रकारच्या मोहापासून अलिप्त होता त्याच्या स्वभावानुसार. त्याला कशाचेच आकर्षण वाटत नसे. त्यामुळे त्याची उरली सुरली पापं सुद्धा विरून गेली होती. तो उच्च कुलिन होता आणि मोठा विद्वानसुद्धा होता. तरी त्याला त्या गोष्टींचा दुरभिमान नव्हता. त्याच्या वागण्यातून चांगुलपणा व भूतदया व्यक्त होत होती. त्याला स्तुती आणि निंदा सारख्याच होत्या. तो व्रतस्थ जीवन जगत होता. संयम आणि मर्यादा त्याच्या वागण्यातून व्यक्त होत होत्या. त्याला काळाच्या महिमाची पूर्ण कल्पना होती. त्यामुळे तो सदैव नम्र असे. त्याच्यासाठी सोने व दगड सारखेंच होते. तो सदैव आत्म्याच्या उद्धारासाठी प्रयत्नशिल होता. त्याच्या जीवनाच्या अभ्यासातून तो सत्याच्या जवळ गेला होता. असा तो एकदा शांतपणे बसला होता तेथे देवांचा राजा शक्र येतो. त्याला बोलतो "अहो दैत्य राजा, तुझ्यामध्ये सगळे चांगले गुण दिसत आहेत. ज्यांमुळें कोणीही श्रेष्ठ पदाला जाऊ शकतो. तरी तुझे वागणे एकाद्या बालकासारखे आहे असे मी पहातो. जसे बालक कोणत्याही मोहात अडकलेले नसते केवळ त्याच्या मातेच्या अंगावर विराजमान झालेले शुन्य दृष्टीने जग पहात असते तसे तुझे आहे. तू आत्म्याचे ज्ञान झालेला आहेस. जरी तू तुझ्या शत्रूंकडून मार खाल्लेला असलास तरी असा निर्विकारी होऊन कसा राहू शकतोस? तुला दुःख होत नाही कां? तू सगळे सत्य जाणत असल्यामुळें असा शांत आहेस कां तुझे धैर्य मोठे आहे म्हणून शांत आहेस"? इंद्राचे ते बोलणे ऐकल्यावर प्रह्लाद त्याला बोलतो, "ज्याला ह्या सृष्टीच्या व्यवस्थेचे ज्ञान आहे तो असा शांत रहात असतो. सगळे चराचर उत्पन्न होणार व नष्ट होणार त्यात कांहीं फरक नसतो हे जाणणारा असांच शांत असतो. मी माझे, मला ब्रह्माने आखून दिलेले,

काम करत आहे कीं नाही तेवढेच मला पहावयाचे असते. त्यात माझे असे कांहींच नसते हे जो ओळखतो तो असा शांत रहातो त्यात नवल काय वाटावयाचे? जो समजतो कीं, तो घडणार्या गोष्टींसाठी जबाबदार आहे तो आनंदी अथवा दुःखी होत असतो कारण तो समजतो कीं ते त्याचे कर्तृत्व आहे. जरी प्रत्यक्षात तो केवळ कारणमात्र असतो. असे असले तरी त्याच्या कर्तृत्वाचे काय मोल असते? सृष्टीच्या कारभारात अनेक घटक काम करत असतात त्यात एक असतो माणसाचे कर्तृत्व अथवा नकर्तेपणा. त्या प्रमाणात ते महत्वाचे असते. हे मी चांगलेच जाणतो कीं, माझ्या कर्तृत्वाला व माझ्या दैवाला किती हिस्सा आहे माझ्या यशात व अपयशात त्यांमुळे मी शांत आहे. जे घडावयाचे ते घडले आहे त्यावर आनंदी अथवा नाराज होण्याने कांहीं साध्य होणार नाही हे मी जाणतो. म्हणून मी शांत आहे. माझेच गत जीवनाचे कर्तव्य आज माझे दैव बनून आले ते मला भोगावे लागत आहे म्हणून मी कोणाला दोष देणार नाही. निसर्ग माझेच मला परत करत आहे हे मी जाणत आहे म्हणून मी शांत आहे. कोणा दुसर्याच्या कर्माची फळ मला भोगावी लागत नाहीत हे मी जाणतो म्हणून मी शांत आहे. मोक्ष मिळणे अथवा न मिळणे हे सुद्धा माझ्याच संचीताने साध्य होत असते ते मी जाणतो म्हणून मी शांत आहे".

असे सांगून पुढे तो बोलतो, "माझे ऐक, आपल्याच कर्माचे फळ आपण भोगत असतो त्याबद्दल जे नियम आहेत ते सांगतो. कावळा खात असतांना एकटा खात नाही, तो त्याच्या इतर सवंगड्याना ओरडून हाकां मारून बोलावत असतो. ज्यामुळे त्याचे सवंगडी सुद्धा तेथे जमा होतात. तसे आपले कर्म जोराने ओरडत सगळ्या देवतांना सांगत असते. फक्त त्याची आपल्याला जाणीव नसते. ज्याला हा निसर्गाचा नियम माहीत आहे तो विचलित होत नाही. तो शांत असतो. तो त्या गोष्टींमुळें न आनंदी होत अथवा दुःखी होत. हे मी जाणतो म्हणून मी माझ्या आजच्या परिस्थितीमुळें कष्टी झालेलो नाही. हे होणारच होते ते झाले मग त्यासाठी कां मी विचलित होऊ? माझ्या कर्माला व त्याच्या परिणामांना मी माझा अहंकार जोडत नाही त्यामुळें मी विचलित होणार नाही. आपल्या अहंकाराच्या परिस्थितीनुसार आपले आनंदी अथवा दुःखी होणे ठरत असते. हे सामान्य माणसाला समजत नसल्याने तो आनंदी अथवा दुःखी होत असतो. मी निसर्गावर रागावत नाही कारण निसर्ग त्याचे असे कांहींच करत नसतो माझ्या बाबत. जे होत असते

माझ्याबाबत, ते माझेच केलेले मला परत येत असते. निसर्ग केवळ एक माध्यम असते. माझे दैव माझ्याच कर्माचा परिणाम आहे हे जो समजला तो नेहमी शांत रहात असतो".

शक्र बोलतो, "मला सांग असा शहाणपणा तू कसा मिळवला आहेस ते ऐकण्यासाठी मी आतूर आहे". प्रह्लाद सांगतो, "साधेपणाने जगण्याचा निर्धार ते देत असते. अनुभवी ज्येष्ठांचे ऐकण्याने ते शहाणपण आपल्याला प्राप्त होत असते. निसर्गाच्या वागणूकीचे निरीक्षण करणे हा आपला स्वभाव झाला पाहिजे. तसे केले तर मोक्षसुद्धा मिळवता येईल".

ते ऐकल्यानंतर देवांचा राजा संतुष्ट होतो. त्यानंतर तो देवांचा राजा प्रह्लादाची पुजा करतो. त्याच्या घरी जातो.

मोक्ष धर्म पर्व भाग एकोणपन्नासावा संपला.

# मोक्ष धर्म पर्व

## भाग पन्नासावा

युधिष्ठीर पुढे विचारतो, "मला सांगा पितामह, दैवाने मारलेला राजा त्याचे मनोधैर्य कसे सांभाळू शकतो तशा अवस्थेत"?

भिष्म सांगतात, "त्यासाठी मी तुला प्राचीन काळी झालेले संभाषण सांगणार आहे जे वसवा आणि विरोचनाचा मुलगा वली ह्यांच्यामध्ये झाले होते. वसवाने दैत्यांचा पराभव केला होता. त्यानंतर तो ब्रह्माला भेटण्यासाठी गेला होता. तेथे तो वलीची चौकशी करतो. तो ब्रह्माला विचारतो कीं, त्याला वली कोठे सांपडेल. त्याची संपत्ती कधी कमी होत नाही जरी तो ती सगळ्यांना दान करत असतो. त्यामागील रहस्य मला समजून घ्यावयाचे आहे. तो कधी वारा बनतो, कधी जलदेव बनतो कधी अग्नी बनून सगळ्यांना उब देतो, कधी पाणी बनून सगळ्यांचे जीवन सोपे करतो, त्याला आळस माहीत नाही. असा उपकार करणारा वली मला कोठे दिसत नाही. मला तो कोठे भेटेल ते सांगा".

ब्रह्मदेव सांगतात, "अरे मेघावता, तुला अशारितीने त्याची चौकशी करणे शोभत नाही. तरी मी तुला तो कोठे आहे ते सांगतो. हल्ली वलीने घोड्यांत, गाढवांत, उंटांत, बैलांत अशा प्रजातीत जन्म घेतले आहेत. तेथे ते पोकळीत रहात आहेत".

शक्र ब्रह्माला विचारतो, "जर मला तो तेथे भेटला तर मी त्याचा वध करणे योग्य असेल कां ते सांगा".

ब्रह्मदेव त्याला सांगतात, "त्याला हात लावू नकोस. त्याचा नाश होणे अयोग्य आहे. त्यापेक्षा तू त्याच्याकडे जा आणि नितीशास्त्र शिकून घे. त्यामुळे तुला फायदा होईल".

भिष्म पुढे सांगतात, ती आज्ञा ऐकल्यावर इंद्र सगळी पृथ्वी त्याच्या ऐरावतावर बसून फिरतो. त्याच्याबरोबर त्याचे साथी होते. अखेरीस तो वलीला भेटतो. तो एका पोकळीत गाढवाच्या रुपात रहात होता. त्याला भेटल्यावर इंद्र त्याला बोलतो कीं, "अरे दैत्य राजा तू गाढवाच्या रुपात गवत खाऊन जगत आहेस त्याचे तुला वाईट वाटत असेल नाहीं कां? गाढवाचा जन्म सुद्धा नीच योनीत आहे त्याची तुला खंत वाटते कां? तुझे साम्राज्य संपुष्टात आले आहे, तू निर्धन झाला आहेस, मी कधी तुझे असें होईल असें समजत

नव्हतो. तो तुझा रुबाब आता राहीला नाही. दैत्य तुझ्याकडे राजा म्हणून पहात होते. पृथ्वी तुझ्या मर्जीमुळें नांगरणी शिवाय पीकं देत असे. तुझी ही अवस्था मला पहावत नाही. त्याचे तुला निश्चितच दुःख होत असणार, नाहीं कां? पूर्व किनार्यावरील तुझी अफाट संपत्ती व तुझे सैन्य आता कोठे गेले आहे? स्वर्गीय अप्सरा तुझ्या पुढे नाचत असतं त्या कोठे गेल्या? त्यावेळची व आताची परिस्थिती ह्यातील फरकामुळें तू काय विचार करत आहेस ते मला सांग. त्याकाळी तुझ्या डोक्यावर सोन्याची छत्री होती व हजारो गंधर्व गात व नाचत होते तुला खूष करण्यासाठी ते कोठे गेले? असंख्य पशूधन अशी तुझी संपत्ती होती ती कोठे गेली? पूर्वी तू मोठे यज्ञ करत होतास. सम्य (एका प्रकारचा भाला) फेकून तू तो जेथे पडेल तेथे यज्ञ करत असें. अशारितीने सगळ्या पृथ्वीवर तुझा संचार होत होता ते सगळे संपले आहे. ब्रह्मदेवाने दिलेले ते स्वर्गीय हार कोठे गेले"?

वली त्याला बोलतो, "तू ते सगळे पाहात आहेस, ते माझे सगळे वैभव आता अंधाराच्या गुहेत गेले आहे. परंतु, जेव्हां माझी वेळ येईल तेव्हां ते तुला पुन्हा दिसेल. परंतु, तुझे असे मला हिणवून बोलणे तुझ्या योग्यतेत बसत नाही. तू समृद्ध झाला आहेस म्हणून तू इतरांचा अशारितीने अपमान करणे नितीशास्त्राच्या नियमात बसत नाही. एक लक्षात घे कीं, जे खरे ज्ञानी आहेत, जे उच्च कुलीन आहेत, जे मर्यादा समजतात, ज्यांचे मन शांत आहे, जे सज्जन (सात्त्विक) आहेत ते त्यांच्या बदलत्या (बिघडत्या) परिस्थितीवर शोक करत नाहीत. ते आनंद व शोक ह्यांत स्वताला अडकवून घेत नाहीत. ते शांत मनाने पुढच्या गोष्टींचा विचार करत असतात. मात्र जे भ्रष्ट बुद्धी असतात (रजो अथवा तमोगुणी) ते अशा मध्ये रमतात. जर तू माझ्यासारखा ज्ञानी असतास तर तू असे प्रश्न विचारले नसतेस".

मोक्ष धर्म पर्व भाग पन्नासावा संपला.

# मोक्ष धर्म पर्व

## भाग एकावन्नावा

भिष्म पुढे सांगतात, ते ऐकल्यावर इंद्र त्याच्याकडे पहात हसू लागतो. वली सापासारखा फुत्कार सोडत होता. शक्र त्याला डिवचण्यासाठी आणखीन बोलतो, "पूर्वीच्या काळी असंख्य रथ आणि योद्धे घेऊन तू आक्रमक होऊन देवांना त्रास देत होतास. ते तुझे वैभव आता कोठे गेले? तुझ्या दृष्टीने आम्ही देव खिजगणतीतसुद्धा नव्हतो. तुझे सैनिक आम्हाला त्रास देण्यात धन्यता मानत होते ते आता कोठे गेले? तुझी अशी हालाकीची दशा पाहून मला वाटते कीं, तू फार कष्टी असला पाहिजेस. ह्या आधी सगळे जग तुझ्या अधिकारात होते. त्याचा आनंद तू उपभोगत होतास, असें असतांना आताच्या तुझ्या दैनेमुळें तू फार दुःखी झाला असणार असें मी समजतो".

वली इंद्राला सांगतो, "आपले जीवन एक सरकता चित्रपट आहे हे जेव्हां तुझ्या लक्षात येईल तेव्हां त्या चित्रपटातील प्रसंग क्षणभंगूर आहेत हे लक्षात येते अशावेळी त्यातील सुख आणि दुःख सुद्धा तसेंच क्षणभंगूर असते हे समजून त्यामुळे आनंदी अथवा दुःखी होण्याचा प्रश्नच उरत नाही. म्हणून मी तू समजतोस तसा दुःखी नाही. मी उद्याच्या नवीन संधींकडे नजर लावून बसणे श्रेयस्कर समजतो. जे घडले आहे ते माझ्यामुळें झाले असें मी समजत नाही. तो भाग्याचा भाग आहे असें मी समजतो. सगळ्या गोष्टी जसे सुख, दुःख हे त्याच्या काळानुसार येत आणि जात असते हा निसर्गाचा नियम मी चांगलाच समजतो. त्यामुळें त्यांवर चिंता करणे मूर्खपणाचे असते अस मी समजतो".

भिष्म सांगतो, "ह्याचा अर्थ असुर दैत्य, दानव, राक्षस आणि असुर कर्मविपाकाचा सिद्धांत मानत नव्हते. ते पाप पुण्य कर्माचे फळं असतात तेसुद्धा मानत नव्हते. त्यांच्या मते आपले दुःख व सुख ब्रह्माच्या केवळ मर्जीचा भाग असतात. त्यात कर्त्याच्या कर्माचा संबंध नसतो. तरी पुनर्जन्म मानत होते. ते समजत होते कीं, पुनर्जन्म सुद्धा ब्रह्माच्या मर्जीचाच भाग आहे, त्यात जन्म घेणार्याचा कोणताच अंतर्भाग नसतो. ते शक्तीसातत्याचा सिद्धांत सुद्धा मानत नव्हते. ते नियम न मानणे ह्यात त्यांचे दैत्य, दानव, असुर आणि राक्षस होणे सामावलेले होते. जे हे नियम

मानून त्यानुसार आपले जीवन जगतात ते दैवी परंपरेतील समजले जातात व जे ते दोन सिद्धांत मानत नाहीत ते असुरी परंपरतील समजले जातात. त्यांची विचारसरणी ब्रह्मदेव केंद्रीत होती. म्हणून ते त्यांची आराधना करत असतं व त्याला प्रसन्न करून विविध आशिर्वाद मिळवून सामर्थ्य प्राप्त करत असत. तिसर्या विचारसरणी प्रमाणे विचार करणारे, ब्रह्मदेवालासुद्धा मानत नव्हते. ते निसर्गाला प्रधान मानून त्याच्या नियमांनुसार जग चालते असे समजत होते. त्यांना चार्वाक पंथी समजले जाते, अशाप्रकारे अरे पांडवा, तीन प्रकारच्या विचारसरणी अगदी कृतयुगापासून प्रचलित आहेत. दैत्यांच्या विचारसरणीप्रमाणे ब्रह्म प्रसंन्न होऊन आपले जीवन भाग्य सुधारू शकतो परंतु, चार्वाक पंथी तसे निसर्गा बद्दल समजत नाहीत. त्यांच्या मते निसर्ग त्याच्या ठरलेल्या नियमानुसार काम करणार त्याची आराधना वगैरे करता येतच नाही त्यामुळे ते तशी कोणतीही साधना करण्यात विश्वास ठेवत नाहीत. त्यांच्यामते, "खां, प्या, मजा करा आणि मरून जा" असा मंत्र जीवनाचा असतो. दैवी परंपरेने जगणार्याला मोक्ष प्राप्त होतो म्हणून माणसाने त्या परंपरेत राहून त्याचे जीवल जगावे असे आपले ऋषी सांगत आहेत". *म्हणून सनातन हिंदू धर्मात दैवी विचारसरणीला प्राधान्य असते. हल्लीचे नास्तिक, कम्युनिस्ट अथवा साम्यवादी लोक चार्वाक पंथी असतात.*

वली पुढे बोलतो, "माझा आताचा अवतार सुद्धा तात्पुरता आहे हेसुद्धा मी ओळखून आहे. कांहींही नित्य नसते तसे माझा पराभव व तुझा जय हे सुद्धा तसेंच क्षणिक आहेत. हे तूसुद्धा लक्षात घे. परंतु, जे वासनांच्या आहारी जाऊन त्या क्षणभंगूर यश अथवा अपयश ह्यांचा जास्त विचार करत असतात. ते दुःखी होत असतात. निष्पाप जीवन जगणारा त्याच्या चांगुलपणामुळें कायम समाधानी रहातो. जे तसे नसतात ते त्यांच्या वासनांच्या दबावामुळें पुन्हा पुन्हा मरतात व जन्म घेतात. मी माझ्या यशात अथवा अपयशात फारसा गुंतून रहात नाही. कारण ते सगळे क्षणभंगूर आहेत हे मी चांगलेच ओळखून असतो. जेव्हां कोणी मारले जाते तेव्हां तो देह निष्प्राण झालेला असतो. त्यातील आत्मा सुरक्षित असतो हे मी चांगलेच ओळखून असतो. त्यामुळे युद्धात आपण फक्त तात्पुरते त्या आत्म्याला दूर केलेले असते तो आत्मा पुन्हा येणार हे जो ओळखतो तो कधी जिंकल्याच्या किंवा हरल्याच्या गोष्टी करत नाही. ते युद्ध फक्त तात्पुरते कोणी जिंकलेले

अथवा हरलेले असते हे मी समजून त्या सगळ्या यशापयशाचा विचार करत असतो. तशानी जिकल्याचा आनंद जे घेतात जे अज्ञानी असतात. कारण कोणीही ह्या मर्त्य सृष्टीत कायम जिंकलेला किंवा हरलेला नसतो. मृत्यू आणि जन्म हे ज्या विधात्याच्या कामाचा भाग आहेत तो ते घडवत असतो मग आपले कर्म कांहीं ही असो, आपण त्याच्या हातातील कठपुतळ्या असतो, तो आपल्याला वापरून ते जन्म घालत असतो व मारत असतो. तो पंचमहाभूतांतून ते सगळे उत्पन्न करत असतो. त्या प्रक्रीयेत आपण फक्त एक उपकरण असल्यासारखे असते. ते सगळे काळाच्या ओघात होत असते. आपण उगाचच त्यांत स्वताला गुंतवून घेतो आणि त्यातून सुख अथवा दुःख ह्याची अपेक्षा करत असतो. मला जेव्हां समजले कीं, मी हरलो आहे, मी समजले कीं, काळाने मला बाद केले आहे थोड्या काळासाठी. मी ते मान्य केले व शांत झालो. पुढच्या संधीची वाट पहात आहे. जी तो काळ मला यथावकाश देणार आहे हे निश्चित. जे कांहीं ह्या सृष्टीत घडते ते आधीच घडलेले असते विधात्याच्या नियोजनामध्ये. त्यामुळें त्याने आनंदी होणे अथवा कष्टी होणे अज्ञानाचे लक्षण मी समजतो. काळ हा असा सागर आहे ज्यात कोठेही बेटे नाहीत. त्या सागराला किनारा नाही. त्याची खोली अगण्य आहे. जितके खोल जाल तितके अधिक खोल तो आहे. त्याची मला जाणीव आहे म्हणून मला अपयश आल्यानंतर कांहींच वाटले नाही, फरक एवढाच असतो कीं, काळाची पावलें आपण नेमकी समजू शकत नाही म्हणून सुखा दुःखाच्या भावनांत वाहून जातो. लढण्या आधीच आपल्याला जिंकणार कीं, नाही ते समजत नाही ही काळाच्या पावलांची विशेषता असते. हे ज्ञान माझ्यात नसते जसे तुझ्याबाबत आहे तर मी खात्रीने दुःखी झालो असतो व तू जे हिणवण्यासाठी बोलत आहेस त्यांने प्रभावित सुद्धा झालो असतो. मी गाढवाचे रुप घेऊन गवत खाऊन माणसांच्या पासून दूर रहात आहे कारण त्यात मला विश्रांती घेण्यास अवधी मिळत आहे. माणसाच्या अवतारात अनेक गुंतागुती सांभाळाव्या लागतात ते कांहीं ह्या योनीत मला करावे लागणार नाही व मी आराम करू शकतो म्हणून मी गाढव बनून रहात आहे. योग्य वेळी मी माझा समय आला कीं, पुन्हा तुझ्याशी दोन हात करण्यासाठी येणार आहे. माझ्या ह्या अवतारात तू मला मारून कांहींच साध्य करणार नाहीस म्हणून एका परीने मला तुझ्यापासून संरक्षण प्राप्त झालेले आहे. हा अशा नीच योनीत रहाण्याचा एक उद्देश

आहे. माझ्याप्रमाणे अनेक दैत्य अशा योनीत राहून विश्रांती घेत असतात. मी जे सांगत आहे त्यांने तू प्रभावित होऊ नकोस कारण हे सगळे तुला आधींच माहीत आहे. संमृद्धी कोणाच्या हातात नसते ती ब्रह्माकडून येत असते. त्यामुळें त्याचा गर्व करणे हे सुद्धा अज्ञानाचेच लक्षण असते. तू लहान मुलासारखा कां वागत आहेस सगळे माहित असून ते मला समजत नाही. तुझ्यात कांहीं सुधारणा झालेली मला दिसत नाही. जरा मोठा हो व सत्याचा अभ्यास कर. देव, पितर, राक्षस, गंधर्व, नाग, असे सगळे माझ्या अधिपत्यात होते. ते तू जाणतोस. ते माझी स्तुती करत होते कारण त्यांना वाटत होते कीं, मी त्यांना जिंकले आहे. वस्तुतः काळाने (ब्रह्माने) मला जिंकवले होते आणि त्याच्या भल्याची माझ्यावर जबाबदारी टाकली होती. परंतु, माझे कांहीं चुकले असावे म्हणून आता तुझ्यावर ती जबाबदारी आली आहे तरी तू ती योग्यप्रकारे निभावशिल अशी मी अपेक्षा करत आहे. जर तू ते नीटपणे नाही केलेस तर कदाचित पुन्हा मला काळ ते काम सोपवण्याची शक्यता आहे. हे लक्षात ठेव. असे कितीतरी राजे त्यांच्या कोणत्याही चुकीशिवाय हरलेले आहेत. कारण काळाला दुसर्यांना संधी द्यावयाची असते. सगळ्यांना काळ संधी देत असतो यथावकाश. त्याच प्रमाणे असेसुद्धा आपण पहातो कीं, कोणी अयोग्य त्याच्या दोस्तांसह मजेत रहात असतो कारण काळाला (ब्रह्माला) ते मंजूर आहे. काळ सर्व कांहीं असतो. काळाला तू जिंकावे असे वाटते म्हणून तू जिंकला आहेस. उद्या काळ मला संधी देईल व तू खाली फेकला जाशिल, असे नियतिच्या चक्रानुसार होत असते. त्यामुळे तू फार खूष होऊ नकोस. त्यात तुझे कांहींच नाही हे लक्षात घे. काळ आळीपाळीने सगळ्यांना संधी देत असतो. तसे पाहिले तर मी माझ्या एका फटक्याने तुला मारू शकलो असतो परंतु, ते विधीलिखीत नव्हते. हि माझी वेळ नाही हे मी समजलो व माघार घेतली कारण काळाची पावलं मी ओळखतो. त्याला आव्हान द्यावयाचे नसते. काळ सगळ्यांना त्यांची जागा दाखवत असतो. त्याची तुला कल्पना येईल योग्य समयी. एकेकाळी सगळे दानव माझी पुजा करत असतं. तो जमाना होता जेव्हां सगळ्या बारा आदित्यांचे तेज माझ्यात होते. मी चमकत होतो. काळ मला अनुकूल होता म्हणून ते होत होते. मी पाऊस पाडत होतो व शेती समृद्ध करत होतो. मी संरक्षण देत होतो व नाश करत होतो. मी देत होतो व काढून घेत होतो. मी कैद करत होतो व सोडून देत

होतो. मी सजा करत होतो व माफसुद्धा करत होतो. मी सगळ्या जगाचा धनी होतो. ते आता राहीलेले नाही कारण, कदाचित काळाला मला विश्रांति द्यावयाची आहे. म्हणून मी रानावनात हुंडारणार्या स्वच्छंदी गाढवासारख्या मामुली योनीत जन्मलो आहे आराम करण्यासाठी. नीच योनीत जन्म मिळणे नेहमीच दोषाचे निदर्शक नसते हे तू समजून घे. तुला जे यश मिळाले ते तू मिळवले आहेस असे जर तुला वाटत असेल तर सावध हो कारण, कदाचित पुढच्या वेळी तू गाढव आणि मी शक्र झाल्याचे आढळून आले तर आश्चर्य करू नकोस कारण काळ केव्हां काय ठरवेल ते कोणी जाणत नसते. वेदज्ञ सांगतात कीं, काळ म्हणजेच ब्रह्म आहे. त्याचे निर्णय अंतिम असतात. महिना, पंधरवडा असे त्याचे शरीर असते, ऋतू त्याचे अंग असते, कांहीं जाणकार सांगतात कीं, हे विश्व ब्रह्माचे अंग आहे, त्याचे खरे ज्ञान कोणालाच नाही. अगदी वेदसुद्धा ते जाणत नाहीत. त्याला सुरूवात नाही आणि अंतसुद्धा नाही. ते अनश्वर आहे. तू काळाच्या पलिकडे जाऊ शकत नाहीस. अनेक विद्वान काळाचे वर्णन त्यांच्या कल्पनेनुसार करत असतात पण त्या सगळ्या कल्पना असतात. खरे काय ते कोणालाच माहीत नसते. असा काळ रहस्यमय आहे. तुझ्यासारखे असंख्य इंद्र आले आणि गेले त्या काळाच्या व्यवहारात त्याची गणतीसुद्धा नाही. म्हणून अरे शक्रा असा घमेड करू नकोस. केव्हां तुझी वेळ येईल ते कोणी सांगणार नाही. तेव्हां कदाचित तू एकादा बेडूक बनलेला असशिल, कांहीं सांगता येणार नाही. आज जे वैभव तुला प्राप्त झाले आहे ते एकेकाळी माझे होते. म्हणून सांगतो संपत्ती, वैभव कोणाची कायम नसते. ती एकाद्या गणिकेसारखी असते, तिचे धनी वेगवेगळ्या काळात वेगवेगळे असतात. तुझ्यापेक्षा श्रेष्ठ अनेक इंद्र आले नी गेले आता तुझी वेळ आहे इतकेच. केव्हां तुझी वेळ संपेल कोणी सांगू शकणार नाही. काळाची पावलं समजणे सोपे नाही. म्हणून थोडा नम्र हो व तुझ्या मर्यादा समजून घे. जर काळाला दिसले कीं, तुला गर्व झाला आहे तर कदाचित तो काळाच्या महिमेने मोडला जाईल जसे माझे झाले.

मोक्ष धर्म पर्व भाग एकावन्नावा संपला.

# मोक्ष धर्म पर्व

## भाग बावन्नावा

भिष्म सांगतात, त्यानंतर इंद्र लक्ष्मीला पहातो. तिच्या तेजांने तो प्रभावित होतो. तो वलीला विचारतो, "अरे वली, ही कोण आहे? अशारितीने तेजांनी चमकत आहे. जिच्या सर्वांगावर चमकणारे दागिने आहेत, तिच्या अंगातून तेजाची किरणं बाहेर येत आहेत".

वली त्याला सांगतो, "मला माहित नाही ती कोण आहे, असुर देवता कां सुर देवता. तूंच तिला विचार, तेंच योग्य होईल.

शक्र त्यावर बोलतो, "अरे वली, हि तेजस्वी स्त्री तुझ्या अंगातून बाहेर येत आहे ती कोण आहे? मला तिचे नांव सांग. इंद्र त्या स्त्रीला उद्देशून बोलतो, "मी तुला ओळखत नाही, तू ह्या दैत्य राजाच्या अंगातून बाहेर आली आहेस, मला सगळे सांग".

श्री त्याला सांगते, "मला कोणीही खर्या अर्थाने ओळखत नसते. हा विरोचनाचा मुलगा ज्याच्यात मी इतका काळ होते तोसुद्धा मला जाणू शकत नाही. मी क्वचित मुष्कीलीने एकाद्याला प्राप्त होणारी आहे. म्हणून कांहीं मला दुःसहा (मुष्किलीने प्राप्त होणारी) असे समजतात. मला आणखीन अनेक नांव आहेत. त्यात भूती, लक्ष्मी, श्री, अशी कांहीं आहेत. माझे खरे स्वरुप कोणी समजू शकत नाही.

शक्र बोलतो, "अहो बाई, असे जर आहे तर आता तुम्ही वलीचा त्याग कां केला आहे? त्याचे कारण काय ते सांगा. त्याचे कारण मी आहे कां"?

श्री सांगते, मला कोणी नियंत्रित करत नाही. मला फक्त काळ नियंत्रित करत असतो. म्हणून वलीचा तू तिरस्कार करू नकोस".

शक्र तिला विचारतो, "वलीचा त्याग केल्यानंतर तू माझ्यामध्ये शिरण्याचा कां प्रयत्न करत आहेस? मला ते सगळे समजले पाहिजे".

श्री सांगते, "मी जेथे सत्य, दानशूरपणा, व्रतस्थता, सामर्थ्य आणि पुण्यप्रभाव आहे तेथे असते. वलीमधील त्यातील कांहीं गुण कमी झाले म्हणून मी त्याचा त्याग करत आहे. आधीच्या काळात तो विद्वानांचा सन्मान करत असे, त्याच्या वासना मर्यादीत होत्या. परंतु, नंतरच्या काळात तो द्वेष, गर्व अशा दोषात अडकला विद्वानांचा उपमर्द करू

लागला आणि अशुभ कृत्ये करू लागला कारण त्याच्या संपन्नतेचा त्याला गर्व झाला, त्यालाच अहंची बाधा असें म्हणतात. त्याचे यज्ञ करणे प्रामाणिकपणाचे राहिले नाही, त्याला काळाच्या सर्वस्वामित्वाचा विसर पडला तेव्हां मी त्याचा त्याग करण्याचे ठरले. आता मी तुझ्यात रहाण्याचे ठरवले आहे. तू जोवर सत्य, व्रतस्थता, पुण्यवंत असा असशिल तोवर मी तुझ्यात असेन.

शक्र बोलतो". अहो कमलवासिनी कोणीही नाही मग तो देव असो, मनुष्य असो किंवा इतर कोणी असो तो तुला कायम स्वताकडे धरून ठेवू शकत नाही. अहो शुभकामिनी, मला सांगा असं काय मी केले पाहिजे कीं, त्यामुळें तू माझ्याकडे नित्य रहाशिल. मी तुझ्या सगळ्या आज्ञांचे पालन करीन. मला ते सांग".

श्री सांगते, "अहो देवांच्या राजा, मी ते सगळे सांगणार आहे, जे केल्याने मी तुझ्यात कायम राहू शकेन. वेदात ते सांगितले आहे त्यानुसार माझे चार भागात विभाजन कर".

शक्र बोलतो, "मी चार भागात तुझ्या सामर्थ्याची विभागणी करीन व त्याचे पालन व्यवस्थित होईल अशी दक्षता बाळगीन. तुला कोणतीही तक्रार करण्याची वेळ येणार नाही. तुझी वाटणी मनुष्यांत, इतर प्राण्यात आणि देवांत मी अशी करीन कीं, त्यामुळें कोणावर अन्याय होणार नाही".

श्री बोलते, "माझा चौथा भाग मी पृथ्वीला देते, त्यानंतर आणखीन चौथा भाग पाण्याला देते त्यामुळे सगळे जीव (चराचर) सुखाने राहू शकलील. आता उरलेले दोन चतुर्थांश कोणाला द्यावयाचे ते सांग.

शक्र बोलतो, "वेदाप्रमाणे, सगळ्या देवता अग्नीमध्ये असतात म्हणून तिसरा भाग अग्नीला दे. चौथा भाग ब्राह्मणांना द्यावा कारण ते उत्तम गुणी असतात".

श्री शक्रला सांगते, तिने तिचे चार भाग आता वाटून दिले आहेत. ते ऐकून वली बोलतो, "आता सूर्य पूर्वेकडे आणि पश्चिमेकडे प्रकाश देत आहे तसा तो उत्तर आणि दक्षिणेकडे प्रकाश देतो पण अशा एक वेळ येणार आहे जेव्हां तो फक्त सुमेरूवर प्रकाश देत असेल त्या काळात देव आणि दानव ह्यांच्यात मोठा संग्राम होईल. त्या संग्रामात मी तुझा पराभव करणार आहे".

शक्र वलीला बोलतो, "ब्रह्माने मला आज्ञा केली आहे कीं, मी तुला कधीच मारणार नाही, म्हणून मी तुला हात लावत नाही. त्याकारणाने तू तुला जेथे जावयाचे आहे तेथे जाऊ शकतोस. तुझे कल्याण हो". असा काळ कधीच येणार नाही कीं, सूर्य सुमेरूवर प्रकाश देईल. कारण ब्रह्माने सूर्याच्या भ्रमाणाचे नियम निश्चित केले आहेत. त्याच्या उत्तरायणातून व दक्षिणायनातून फिरण्याने ऋतू निर्माण झाले आहेत".

भिष्म पुढे सांगतात असें इंद्राचे बोलून झाल्यावर वली दक्षिणेकडे प्रयाण करतो. इंद्र उत्तरेकडे निघतो. त्यानंतर वलीच्या उपदेशाचा विचार करत तो आकाशात जातो.

मोक्ष धर्म पर्व भाग बावन्नावा संपला.

# मोक्ष धर्म पर्व

## भाग त्रेपन्नावा

भिष्म पुढे सांगतात, ह्या संदर्भात इंद्र आणि नमुची ह्यांच्यातील संवाद तुला सांगतो. जेव्हां इंद्र पहातो की, नमुची सर्वस्व घालवूनही शांत रहात होता. पुरंदर त्याला विचारतो, "अशा विषण्णावस्थेत तू कसा शांत राहू शकतोस"?

नमुची त्याला सांगतो, "जे दुःख क्रमप्राप्त आहे जे अटळ असते त्याचा शोक करणे शहाण्या माणसाचे काम नाही. त्यांमुळे कांहींच साध्य होणारे नसते. दुःख व आनंद वासनामयतेची लक्षणं असतात. जे वासनामय नसतात ते अशांत होऊन त्यांची शक्ती वाया घालवत नसतात. जे घडते त्याचा अभ्यास करावयाचा असतो केवळ दुःख करून काय उपयोग"? जितका क्रोध अध्यात्मिक उर्जा नष्ट करतो तितकांच शोक करत असतो व अध्यात्मिक उर्जा सांभाळणे हे सगळ्यात जास्त महत्वाचे असते. असें कांहीं करता कामा नये ज्याने अध्यात्मिक उर्जेचा र्हास होईल. जेव्हां एकादा मनाचा निग्रह करतो तेव्हां तो ते मिळवतो. ब्रह्माच्या आदेशानुसार ते होत असते. जे त्याने ठरवले ते होणारच कारण हि दुनिया त्याच्या इच्छेचे फलित असते. जातकाला (जन्मणार्या जीवाला) त्यात कांहीं बदल करता येत नाही. जे सुख आणि दुःख वाट्याला येणार ते येणारच कारण ते तुमच्याच कर्माचे फलित असते. दुसर्याच्या कर्माचे फळ आपल्याला भोगावे लागत नाही. त्याला त्यातून मिळणारे दुःख नको म्हणून ते नाहीसे होणारे नसते. भविष्यात तसे दुःख नको असेल तर ह्या जन्मात तसले पाप कर्म न करण्याचा निर्धार करावा लागतो. तुम्ही कोणीही असा, ऋषी, देव, असुर, वेदाचे ज्ञानी, बैरागी, तुमच्या गत कर्माचे फळ तुम्हाला मिळणारच. ते सुखाचे असेल किंवा दुःखाचे असेल. म्हणून जे भोग पदरी येतात ते समजून त्यांचा स्वीकार करण्यातच शहाणपणा असतो. त्याबाबत नाराज होणे अथवा त्याबद्दल कोणा देवाला, ऋषीला, वेदाच्या अभ्यासाला दोष देण्यात आपला समय व्यर्थ घालवू नये. जो हे अकालाबाधीत सत्य जाणतो तो शोक अथवा क्रोध अशा प्रतिक्रीया देण्यात त्याची शक्ती वाया घालवत नाही. त्याउलट दुःखाच्या भोगांतून जो शिकतो तो पुढे जातो व मुक्तीच्या दिशेने त्याचा प्रवास यशस्वी होतो कारण तो त्या चुका करत नाही ज्याच्यामुळें त्याला

दुःख भोगावे लागले असते. असा जो त्याच्या चुका सुधारत त्याचे जीवन बिनातक्रार व्यतीत करतो तो मोक्षा पर्यंत जातो. सावध असलेला येणार्या कठीण प्रसंगाने व्यथीत होत नाही. तो त्यातून शिकण्याचा प्रयत्न करत असतो. असे जो जगतो तो वेदांती समजला जातो. गौतम ऋषीचे उदाहरण घे, त्यांने त्याच्या पत्नीला दगड होण्याचा शाप दिला त्याचा परिणाम म्हणून त्याला किती यातना भोगाव्या लागल्या ते त्यालाच ठाऊक. दुसर्याला शाप देण्याने शाप देणारा सुद्धा त्यात अडकत असतो. कितीही मंत्र जपा त्याने तुमचे भोग बदलणार नाहीत जे तुमच्या कर्मामुळे तुम्हाला भोगावे लागत असतात. म्हणून ते शांतपणे शिक्षा समजून भोगत रहाणे उचित असते. त्या न्यायाने मी माझे भोग भोगत आहे त्याबद्दल मी कधीच तक्रार करणार नाही. फक्त त्यातून काय शिकावयाचे ते मी जर नाही शिकलो तर ते दुःख भोग वाया गेले असें ब्रह्म समजेल. जे दुःखाचे तेंच सुखाचे आहे. त्याप्रमाणे मी कोणती चांगली कामं पुढे केली पाहिजेत ते ठरवावयाचे असते. ज्यातून कांहीं शिकावयाचे असते त्या ऐवजी त्याबद्दल दुःख करण्यात किंवा आनंद करण्यात आपला समय घालवणे शहाणपणाचे नसते. अशारितीने विचार करणार्याचा उद्धार होतो".

मोक्ष धर्म पर्व भाग त्रेपन्नावा संपला.

# मोक्ष धर्म पर्व

## भाग चौपन्नावा

युधिष्ठीर पुढे विचारतो, सर्वकांहीं बरबाद झालेल्या राजाने कशाच्या आधारे त्याचे पुढील कार्य करावे ते सांगा. तुमच्या कडून मला ते समजून घ्यावयाचे आहे.

भिष्म सांगतात, ज्याचे सगळे बरबाद झाले आहे त्याला त्याचा आत्मविश्वास आणि धैर्य उपयोगाचे असते. ज्याच्याकडे धैर्य आहे तो कधीच हार मानत नाही. असा कधी शोकाकूल होत नाही. त्याची तब्यत जर चांगली असेल तर तो पुन्हा समृद्धीकडे जाऊ शकतो. ज्याने चांगुलपणा सोडला नाही तो त्यातून बाहेर पडतो, धीर आणि चिकाटी त्याची आयुध असतात. ह्या संदर्भात मी तुला एक किस्सा सांगतो तो तू नीटपणे ऐक. तो वली आणि वासवा ह्यांचा आहे. देव आणि दानव ह्यांच्या युद्धात अनेक दैत्य आणि दानव मारले गेले होते, त्यामध्ये इंद्र जिंकतो व राजा होतो. वलीला विष्णू फसवतो आणि इंद्राला जिंकून आणतो. इंद्र सगळ्या देवांचा अधिपती होतो. त्यानंतर चतुर्वर्ण पद्धती स्थापन होते आणि सगळीकडे संपन्नता येते. त्यामुळे ब्रह्मदेव आनंदी होतो. त्या नंतर रुद्र, वसू, आदित्य, अश्विनी, स्वर्गीय ऋषी, गंधर्व, सिद्ध असे सगळे जमलेले असतात व इंद्र त्याच्या चार सुळे असलेल्या ऐरावतावर बसलेला असतो, एक नवीन उपक्रम आयोजित करतात. एके दिवशी इंद्र विरोचनाचा मुलगा वली, ह्याला एका डोंगरातील गुहेत पहातो. त्याच्या समोर तो त्याच्या दैवी लव्याजम्यासह जातो. ते पाहून वली कष्टी होईल असे इंद्राला वाटत असते परंतु, वलीच्या चेहर्यात ते तो पहात नाही. वली निर्भय असा तेथे त्याच्याकडे पहात असतो. ते पाहून इंद्र वलीला विचारतो, "कसे काय चालले आहे तुझे? तू दुःखी दिसत नाहीस, एवढा पराजय झाला तरी ते कसे काय? ज्येष्ठांच्या सल्ल्यामुळें कीं, तुझी तपस्या चालू आहे म्हणून? ते कसे हीं असो पण अशा मनस्थितीत रहाणे सोपे नाही असे मी समजतो. इतक्या उच्च पदावरून खाली फेकला गेल्यानंतर असे शांत रहाणे अवघड वाटते मला. दुःख करण्यासारखे झाले असले तरी तू शोकाकूल झालेला मला दिसत नाहीस. एके काळी श्रीमंतीत रहाणारा तू असा कफल्लक झाल्याने निश्चितच दुःखी व्हावयाला पाहिजेस असे

सर्वसाधारणपणे समजले जाते पण तुझ्या बाबत तसे मला दिसत नाही. मला सांग तुला ते कसे जमते? तू एकेकाळी तुझ्या पूर्वजांच्या सिंहासनावर बसून राज्य चालवत होतास. ते सौभाग्य आता तुझ्याकडून मी हिरावून घेतले आहे, त्याचा तुला राग वाटत नाहीं कां? तुला वरुणाचा फास बसला आहे व माझ्या वज्रास्त्राने जखमी केले आहे, त्याचे दुःख वाटत नाहीं कां? तुझ्या बायका तुला सोडून गेल्या आहेत, तुझी संपत्ती नाहीशी झाली आहे, तरी तू असा शांत कसा राहू शकतोस ते मला समजत नाही. तुझ्या ह्या वागण्याचे रहस्य काय ते मला सांग. दुसरा कोणी असतां तर तो एवढे अपयश आल्यानंतर जीव देऊन गेला असता. पण तू ते कांहीं करत नाहीस ह्या मागील गुपीत काय ते मला सांग".

ते विचारत असतांना त्याच्या वलीवरील विजयाचा दिमाख सुद्धा इंद्र त्याला हिणवण्यासाठी बोलून दाखवत होता. विरोचनाचा मुलगा वली त्याच्या शंकांचे समाधान न डगमगता शांत चित्ताने करत होता. तो बोलतो, "जेव्हां दुर्दैव माझ्या मागे लागले आहे ते पाहून तुला फार आनंद झाला आहे असे वाटते. अरे पुरंदरा, तू तुझे वज्र घेऊन माझ्या पुढे उभा हो, जे तू ह्याआधी कधी करण्याचे धाडस केले नसतेस पण कोणत्या तरी कारणांने तू मला हरवू शकला आहेस हे खरे. त्यामुळें तू अशारितीने माझा अपमान करण्याचे धाडस करत आहेस. जो जेता जिंकलेल्याचा अपमान न करता त्याच्याशी बोलतो तो खरोखरच महान जेता असतो. तू त्या योग्यतेचा नाहीस. कपट कारस्थानाने तू विष्णूच्या मदतीने मला हरवले आहेस हे सगळे जग जाणत आहे. त्या यशात तुझे कांहींच कर्तृत्व नव्हते. युद्धात एक जिंकतो व दुसरा हरतो हे ठरलेले आहे. आता तू जिंकला आहेस म्हणजे तू कायम जिंकलेला रहाशिल अशा भ्रमात राहू नकोस. हे यश तुझ्या कर्तृत्वाचे नाही हे मी आणि तू दोघे चांगलेच ओळखून आहोत. तुझ्या जिंकण्यात व माझ्या हरण्यात तुझ्या अथवा माझ्या कर्तृत्वाचा विशेष भाग नाही हे जर तू लक्षात घेतलेस तर ते तुझ्यासाठी चांगले होईल. हा सगळा काळाचा महिमा आहे. त्याच्या महिमेमुळें मी असा येथे आहे व तू तेथे आहेस. वडिलांची सेवा करून, देवतांची पुजा करून चांगुलपणाने वागून असे यश मिळत नाही. तो केवळ काळाचा महिमा असावा लागतो. ज्याचे नशीब फुटले आहे त्याला कोणीही मदत करू शकणार

नाही. आधीच्या काळात मी जिंकत होतो तसा आज तू जिंकत आहेस हा सगळा काळाचा महिमा आहे. काळ कोणाला जिंकवत असतो व दुसर्याला हरवत असतो. त्याचे श्रेय घेण्याचा प्रयत्न करणे अज्ञानाचे लक्षण आहे. अखेरीस तो काळ सगळे संपवणार असतो. तोच सृष्टीचा कर्ता करविता आहे. त्याचे श्रेय कोणी घेऊ नये. हे ठाऊक असल्याने मी कधी आनंद किंवा शोक करत नाही. काळाच्या मर्जीनुसार तुझ्या माझ्या सारखे कित्येक जिंकले आणि हरले आहेत ह्या आधीसुद्धा. तू आज अजिंक्यतेचा टेंभा मिरवत आहेस तो मी मिरवत होतो आधी. काळापुढे कोणाचे चालत नाही हेंच खरे. तुझ्या आधी अनेक इंद्र होऊन गेले आहेत. कोणीही कायम जिंकत नसतो. फक्त ब्रह्माचे चालते जो काळाचे नियंत्रण करत असतो. तुझ्यासारखा मूर्ख फक्त समजतो कीं, तो जिंकला म्हणजे कायम जिंकलेला रहाणार आहे. यथावकाश काळाच्या महिम्यामुळें पुढे तू हरलेला असशील व कोणी दुसरा तुला हरवून जिंकलेला असेल ही काळाची किमया आहे त्यात आश्चर्य करण्यासारखे कांहीं नसते. पृथू, ऐल्या, माया, भिम, नरक, संवर, अश्वग्रीव, पुलोमन, स्वर्भानू, प्रह्लाद, नमुची, दक्ष, विप्रचित्ती, माझा पिता विरोचन, ह्रनिषेव, सुहोत्र, भुरीहन, पुशवत, वृष, सत्येप्सू, ऋषभ, वाहू, कपिलेश्व, विरुपाक्ष, वण, कर्ताश्वर, वन्ही, विश्वदंश्त्र, नैरुती, संकोच, वरितक्ष, वराह, अश्व, ऋचीप्रभा, विश्वजित, प्रतिरुपा, वृषंद, विष्कर, मधू, हिरण्यकश्यपू, दानव कैतभ, असे अनेक दैत्य, दावन आणि राक्षस होऊन गेले जे काळाच्या कृपेने ऐश्वर्य भोगून गेले. काळाने त्यांचा यथावकाश नाश केला आहे. त्या सगळ्यांनी ब्रह्माची पुजा केली होती. शेकडो यज्ञ केले होते तुझ्या सारखे, ते उत्तम योद्धे होते कधी लढण्यात मागे नव्हते. त्यांच्याकडे अनेक विद्या, कला, किमया होत्या पण जेव्हां त्यांचा काळ संपला, ते मारले गेले अशी आहे काळाची किमया. ते सगळे तत्त्वनिष्ठ होते, वेदाचा अभ्यास करणारे होते, ते सर्वोच्च वैभव प्राप्त करून होते तरी वेळ आली तसे ते सगळे नष्ट झाले आहेत. ते सगळे दक्षाच्या मुलींचे मुलगे होते. तरी काळाने त्यांना नष्ट केले आहे. तुझ्या वागण्याने असे मला दिसते कीं, जेव्हां तुझी वेळ येईल तेव्हां तू हरलेला असशिल आणि त्या पराजयाचे तू दुःख करत असशिल कारण तुला हे काळाच्या महिमाचे सत्य ठाऊक नाही. मला ठाऊक आहे

म्हणून मी दुःख करत नाही. जे माझे झाले ते भविष्यात कधीतरी तुझेसुद्धा होणार आहे. मला टोचून तू आता बोलत आहेस कारण तुला तुझे काय होणार आहे पुढे त्याची कल्पना नाही. एकेकाळी माझ्यापुढे कोणाची बोलण्याची हिम्मत नव्हती. कोणी माझ्याशी लढण्याचा साधा विचारसुद्धा करत नव्हते. आज तू मला टोचून बोलू शकतोस हा आहे काळाचा महिमा. काळाच्या कृपेमुळें तू सगळ्यांचा कौतुकाचा विषय आहेस ज्याच्याकडे काल कोणी पहातसुद्धा नव्हते हा आहे काळाचा महिमा. काळ घडवतो व संपवतो, आपण फक्त कारणमात्र असतो. तू अशारितीने मला हिणवत आहेस जणू तूच मला पराजित केले आहेस. जो काळाचा महिमा जाणतो तो त्याच्या आयुष्यात येणारे चढाव, उतार, सामर्थ्य, सुख, दुःख, जन्म आणि मृत्यू ह्यांनी प्रभावित होत नाही. माझा जेव्हां काळ होता तेव्हां मी काय होतो ते तुला कदाचित समजणार नाही कारण तू त्यावेळी कोणींच नव्हतास. जे सामर्थ्य मी दाखवत असें त्याकाळात मी सगळ्या देवांचा जसे आदित्य, रुद्र, साध्य, वसू, मरुत सहजपणे फडशा पाडत असे जेव्हां ते आमच्याशी दोन हात करत असतं. त्या काळात मी तुझ्या वज्राचे शतशः तुकडे केले असते पण आता ते शक्य नाही कारण आता तुझा काळ सुरू झाला आहे. तुझ्या हातातील गवतसुद्धा वज्रासारखे काम करून दाखवू शकेल कारण आता तुझा काळ आहे. हा सगळा काळाचा महिमा असतो. आता काळ असा आहे की, मी शांतपणे सगळे गुपचुप सहन करत बसावयाचे बिनतक्रार. तू कसाही घमेड करत रहा तुला कांहीं होणार नाही कारण आता तुझा काळ चालू झाला आहे. ह्यालाच काळाचा महिमा म्हणतात. सगळे कांहीं तुझ्या सोयीचे असेल जसे एकेकाळी माझ्या सोयीचे होते. काळाने मला त्याच्या दोरबंधाने बांधून टाकले आहे त्यामुळें मी तुला हरवू शकत नाही. जे केल्याने मी एकेकाळी जिंकत होतो तेंच केल्याने आज मी हरत आहे, हा काळाचा महिमा आहे. म्हणून दुःख करण्यात अर्थ नसतो. त्यामुळें आपली शक्ती वाया जात असते. दुःखाकडे पहाण्याचा दृष्टीकोन महत्वाचा असतो. दुःख करण्याने आपली परिस्थिती सुधारत नाही. म्हणून मी शांत आहे, माझा काळ येण्याची मी वाट पहात आहे. माझा काळ जोवर येत नाही, मी कोठेतरी असाच शांतपणे लपून बसणार आहे". ते वलीचे बोलणे ऐकल्यावर इंद्र भानावर येतो व स्वताला आवरतो. शक्र बोलतो, "तुला माझ्या वज्राची

भिती नाही कारण तुला माहित आहे काळाचे काम कसे चालते. तुझी धिरोदात्तता पाहून मी प्रभावित झालो आहे. तू माझ्या सामर्थ्याने घाबरत नाहीस कारण माझे सामर्थ्य तुझी हिम्मत खच्ची करू शकणार नाही. तू जे सांगितले आहे ते मला ठाऊक आहे. मी तरी तुझ्या हिम्मतीची पहाणी करत होतो. तुझे म्हणणे योग्य आहे कीं, काळाच्या मर्जीनेच आपले सुख, दुःख, आनंद, यश सिद्ध होत असते. तरी त्यासाठी आपले कर्तव्यसुद्धा आवश्यक असते. काळ सोयिस्कर असला तरी जर आपण आपले कर्तव्य नाही केले तर तो काळ व्यर्थ जात असतो. म्हणून काळ आणि माणसाचे कर्तृत्व असे दोनही महत्वाचे असते. आपल्या कर्तृत्वाला कमी लेखणे योग्य ठरणार नाही. काळ संधी देत असतो जे त्याचा योग्य फायदा उचलतात त्यांना काळाच्या महिम्याने यश मिळत असते हे सत्य आहे. काळांने संधी दिली आहे कीं, नाही ते समजणे सुद्धा आवश्यक असते. त्यालाच काळाची पावले ओळखणे असें जाणकार म्हणतात. माणसाने काळ मोजण्याची मापं तयार केली आहेत जसे, कल, लवस, कस्थ, क्षण, दिवस, रात्र, महिना, मोसम, वर्ष इत्यादि. जो म्हणतो ते काम मी उद्या करीन त्याला काळ डावलतो व जो ते काम आजच्या आज करतो त्याला काल साथ देतो. प्रत्येक क्षणाने आपला काळ (मृत्यू) आपल्याकडे सरकत असतो. ह्या जीवनातील संधी कमी होत असतात कारण, मरण जवळ येत आहे. परंतु, त्याचे भान सामान्य लोकांच्या लक्षात येत नाही. वरुणाचा फासा (मृत्यूची गांठ) कसा आवळला जात आहे त्याचे भान नसते. तो त्याचा काळ व्यर्थ घावलत असतो. जे मात्र त्या काळात ध्यान साधना, ब्रह्मचर्य, तपस्या करत त्याचे जीवन जगतो तो त्याकाळात जी अध्यात्मिक उर्जा संपन्न करतो ती त्याचे पुढील जीवन समृद्ध करत असते. म्हणून आपल्या जीवनातील प्रत्येक क्षण मोलाचा आहे असे समजून जे तो खर्च करतात ते उत्कर्षाला जातात. जे बेसावध असतात ते काळाचा अपव्यय करण्यात धन्यता मानतात व अखेरीस नष्ट होतात. अरे वली, तू वेदांचा ज्ञाता आहेस. तुझे सृष्टीचे ज्ञान पूर्ण आहे म्हणून तू असा शांत आहेस हे मी समजलो. तुझी ही अवस्था पाहून मला तुझ्याबद्दल अनुकंपा वाटत आहे. तुझ्यासारख्या ज्ञानीला मी त्रास देऊ इच्छित नाही. दुसर्याला त्रास न देणे हे मोठे पुण्यकर्म असते. मी ते पाप करणार नाही. वरुणाचा फांस जेव्हां तुला धरेल तेव्हां तो

धरो, मी त्यात हस्तक्षेप करणार नाही. काळाने जे बंध तुझ्यावर टाकले आहेत ते तेव्हां मोकळे होतील जेव्हां सून सासूला कामाला लावेल, शुद्राचे पाय ब्राह्मण धुवेल, नीच मनुष्य उच्चकुलिन स्त्रीशी संभोग करेल, जेव्हां देवतांचे प्रसाद पापी खातील, जेव्हां चार वर्णांची शिस्त संपुष्टात येईल. त्या काळात तुम्ही असुर पुन्हा राज्य करू लागाल. कारण तो तुमचा काळ असेल. तेव्हां असुरीसंपदा फोफावेल. कारण तुम्ही कर्मविपाकाचा सिद्धांत मानत नाही. असे बोलून तो देवांचा राजा त्याच्या ऐरावतावर आरुढ झालेला त्याच्या स्वर्गाकडे निघतो. त्यानंतर ऋषी त्याची स्तुती करण्याची कवन गाऊ लागतात. अग्नी पुन्हा एकदा तेजाने तळपू लागतो, सगळे ऋतू योग्य प्रकारे काम करू लागतात. त्यानंतर इंद्र अमृताचा कलश घेऊन देवांच्या जगात जाऊ लागतो. त्याचा वलीवरील राग नाहीसा झाला होता कारण त्याला त्याची मर्यादा वलीने योग्यप्रकारे दाखवली होती. इंद्र काळाला नमस्कार करतो व मजेत त्याचे कार्य करू लागतो.
मोक्ष धर्म पर्व भाग चौपन्नावा संपला.

## मोक्ष धर्म पर्व

## भाग पंचावन्नावा

युधिष्ठीर पुढे भिष्माला विचारतो, माणसाचा उत्कर्ष होणार आहे कीं, अधःपात होणार हे ओळखण्याची लक्षणं कोणती ते सांगा.

भिष्म सांगतात, आपले मन त्याची समृद्धी होणार कां र्हास होणार ते ओळखत असते. ते समजण्यासाठी मी तुला श्री आणि शक्र ह्यांच्यात झालेला संवाद सांगणार आहे तो तू ऐक, श्रेष्ठ ऋषी नारद जे साक्षात ब्रह्मदेव होते, ते त्यांच्या पुण्यप्रभावामुळें हे आणि त्या पलिकडील जग पाहू शकत होते. ते सगळ्या सृष्टीत भटकत होते, ते असेंच एकदा सकाळी उठून त्यांचे प्रातर्विधी करून घेण्यासाठी गंगेच्या ध्रूव नांवाच्या तटावर गेले होते. तेथे ते त्या प्रवाहात उतरतात. तोच सहस्त्र अक्ष असा इंद्र तेथे आलेला असतो. नारद आणि इंद्र दोघे पूर्णसंयमी त्यांचे विधी उरकत असतात. त्यांच्या प्रार्थना मनाल्या मनात करत ते तेथे बसलेले असतात. तेथे असलेले इतर मोठे ज्ञानी ऋषी विद्वत चर्चा करत होते त्या ते ऐकत असतात. त्यावेळी ते उगवता सूर्य पहातात. ते पाहून ते उठतात व उगवत्या सूर्याची स्तुती करणारी कवन गाऊ लागतात. त्याच वेळी ते आकाशात पहातात सूर्याच्या विरुद्ध दिशेने एक तेजस्वी तारा चमकत होता. तो तेजस्वी तारा त्यांच्या कडे सरकत होता. ते जे पहात होते ते दुसरे कांहीं नव्हते तर साक्षात श्री होती. तिच्या भोवती अनेक अप्सरा पिंगा घालत होत्या. रत्नजडीत अलंकाराने विभूषित अशी श्री तो पहात होता जिला पद्मा असें सुद्धा म्हणतात. पद्मा तिच्या रथातून उतरते व इंद्र आणि नारद जेथे होते तेथे येऊ लागते. ते पाहून नारद आणि इंद्र सुद्धा तिच्या स्वागतासाठी तिच्या कडे जाऊ लागतात. नमस्कार करून ते तिचे स्वागत करतात. ते अत्यंत नम्रपणे तिची पुजा करतात. शक्र तिला बोलतो, "अहो स्मितवदना, आपण कोण अहात व कोणत्या निमित्ताने येथवर आला अहात"?

श्री त्याला बोलते, "ह्या तिनही जगातील चराचर मला प्रसन्न करण्यासाठी झटत असतात. मी पद्मा आहे. सुर्याच्या उगवण्याने फुलणार्या कमळात माझा वास असतो. मी समृद्धी आहे, मला कांहीं लक्ष्मी, भूती, श्री म्हणतात. अरे वलच्या हत्यारा, मी

श्रद्धा आहे, मी बुद्धी आहे, मी वैभव आहे, मीच यश आहे, मी स्वाहा, मी स्वाहा", असें ती बोलते. "मींच पावित्र्य आहे. मींच दैव आहे, मी अध्यात्मिक सामर्थ्य आहे, यशस्वी राजांच्या ध्वजात मी असते. त्यांच्या नगरात, बाजारपेठात मी असते, मी सगळ्या यशस्वी लोकांत असते. सगळ्या पुण्ण्यात मी असते, जे ब्रह्माची पुजा करतात त्यांच्या पुजेत मी असते. सगळ्या उत्तम गुणांत मी असते. पूर्वी मी असुरांच्या राज्यात होते परंतु, जसे त्यांचे गुण कमी झाले मी त्यांचा त्याग करण्याचे ठरवले आहे. आता मी तुझ्याकडे येत आहे".

शक्र बोलतो, "मला सांग असुरांच्या कोणत्या गुणांमुळें तू त्यांच्याकडे होतीस? आता त्याना तू कां सोडत आहेस"?

श्री सांगते, "जे त्यांच्या वर्णाच्या कर्तव्याचे प्रामाणिकपणे पालन करतात, त्यांच्याकडे असते. जे स्वर्गाच्या दिशेने जाणारे आहेत, जे वेदाचा अभ्यास करतात, जे यज्ञ करतात, जे पितरांची पुजा करतात, देवतांचा सन्मान करतात, जे गुरूचा मान ठेवतात, ज्यांच्या वासना मर्यादीत आहेत, जे अतिथीचा सन्मान करतात, जे ब्रह्मचर्य पाळतात, जे चांगुलपणाने जगतात, जे सज्जन आहेत, जे संयमी आहेत, जे धर्म करतात, ज्यांच्यामध्ये द्वेष, गर्व नाही, ज्यांचा क्रोध नियंत्रित आहे, जे त्यांच्या याचकांचा अपमान करत नाहीत, जे व्रतस्थ आहेत, जे ब्राह्मणांचा सन्मान करतात, ज्यांच्या मनात दुर्दैवींबद्दल अनुकंपा आहे, ज्यांच्या भूतदया आहे, जे दयाळू व क्षमाशिल आहेत. एकेकाळी हे गुण दानवांत होते म्हणून मी त्याच्याकडे होते. ह्या युगाच्या प्रारंभापासून मी त्यांच्याकडे होते. काळ बदलला आणि दानवांच्या वागण्यात बदल होत गेला. त्याच्यातील चांगले गुण नाहीसे होत होते. त्याच्यात अहंकार वाढत होता ज्यामुळे सगळे चांगले गुण कमी होतात. क्रोध, लोभ, मोह, मद आणि मत्सर वाढत होते. त्यांच्यातील सज्जनपणा कमी होत गेला. शिष्टाचाराचे नियम ते पाळेनासे झाले. त्यांच्यात भ्रष्टाचार वाढत होता, खोट्या मार्गाने ते श्रीमंत झाले. ते अग्नीचा सन्मान करण्याचे थांबवतात, ते यज्ञातील देवांचा, पितरांचा वाटा त्यांना देण्याचे टाळू लागतात. अस्वच्छता त्यांच्यामध्ये शिरली. शेताकडे दुर्लक्ष झाले, गुरांकडे दुर्लक्ष झाले, बेपर्वाई वाढली, सगळीकडे भांडण तंटे होऊ लागले, कोणी कोणाचा सन्मान

करे ना, आळस वाढला, हात न धुता ते जेवू लागले, त्यांच्यातील ब्राह्मण वैश्य झाले आणि क्षत्रिय शुद्र झाले. शिक्षकांचा अपमान होत होता, थोडक्यात सांगावयाचे म्हणजे त्यांचा अधःपात झाला होता. अशांच्यात मी रहाणे शक्य नव्हते. म्हणून मी तुमच्याकडे आली आहे. माझे सन्मानपूर्वक स्वागत कर, त्यात तुझे भले आहे. माझ्या इतर मैत्रीणी आशा, विश्वास, बुद्धी, समाधान, यश, प्रगती, शमाशिलता त्यासुद्धा तुझ्याकडे येणार आहेत जर तू माझे स्वागत करणार असशिल. ह्यापुढे चांगुलपणा, माणूसकी आणि भूतदया ह्या त्रिसुत्रीचे पालन करणार्या देवांच्या सानिध्यात आम्ही रहाण्याचे ठरवले आहे. ते ऐकल्यावर नारद आणि इंद्र त्यांचे स्वागत करतात. त्यानंतर वायूदेव आणि अग्नी आनंदाने त्यांचे काम करू लागतात. त्यांच्यामुळे सगळीकडे स्वर्गीय सुगंध पसरतो. ती वार्ता सगळ्या देवांत पसरते, ते सगळे आनंदाने श्रीचे स्वागत करण्यासाठी पुढे होतात. त्यानंतर ते त्यांच्या हिरवे घोडे लावलेल्या रथातून स्वर्गाच्या दरबारात येतात. ऋषी नारद बोलतात, श्री व तिच्या सख्यांचे देवांच्या राज्यात सदैव स्वागत असो. त्यानंतर अमृताचा शिडकावा ब्रह्मावर होतो. सगळे प्रसन्न होतात. स्वर्गीय वाद्यवंद वाजू लागतात. इंद्राच्या कृपेने पर्जन्य योग्यवेळी होऊ लागतो. सगळीकडे सुबत्ता येते. सगळे चांगुलपणा, माणूसकी आणि भूतदया ह्या त्रिसुत्रीचे पालन करू लागतात जे ब्रह्माला संतोष देते. माणसेसुद्धा त्याप्रमाणे वागू लागतात. वेदाचा अभ्यास होऊ लागतो. माणसे, यक्ष, राक्षस सगळे संमृद्ध होतात. गाई भरपूर दूध देऊ लागतात. झाडांना पुष्कळ फळं धरू लागतात. कोणी कोणाचा अपमान करत नव्हते. सगळे एकमेकांचा सन्मान करत होते. ब्राह्मण श्रीच्या स्तुतीची कवन गाऊ लागतात. त्यात इंद्र पुढे होता. असे सगळे झाले ते मी तुला सांगितले आहे. म्हणून तू असे पहा कीं, तुझ्या राज्यात ते सगळे गुण असतील जे श्रीला आवडतात. त्यामुळें तुझ्या राज्यात समृद्धी नांदेल.

मोक्ष धर्म पर्व भाग पंचावन्नावा संपला.

# मोक्ष धर्म पर्व

## भाग छप्पन्नावा

युधिष्ठीर पुढे विचारतो, "असे काय केल्याने, असे कोणते ज्ञान प्राप्त झाल्याने, आपण ब्रह्मापर्यंत जातो जे प्रकृतीच्या पलिकडील आहे"?

भिष्म सांगतात, "निवृत्ती जो त्याच्या जगण्यात अंगिकारतो तो ब्रह्मापर्यंत जाऊ शकतो. निवृत्तीनेंच ते शक्य होते. ह्याबद्दल मी तुला एक किस्सा सांगतो ज्यामध्ये ऋषी असित आणि जैगीश्व्य ह्यांचे संभाषण आहे. एकदा असित देवल आणि जैगीश्व्य ह्यांच्यामध्ये कर्तव्य आणि नैतिकता ह्यांच्यावर चर्चा झाली होती. जैगीश्व्य मोठे ज्ञानी होते त्या विषयाचे. असित देवल बोलतात, "अहो जैगीश्व्य आपली कोणी स्तुती केली तरी खूष होत नाही त्यामागील कारण काय ते सांगा. ते ज्ञान तुम्हाला कोठून मिळाले ते मला सांगा".

भिष्म पुढे सांगतात,तो प्रश्न ऐकल्यावर जैगीश्व्य ज्यांची तपस्या मोठी होती बोलतात, अहो श्रेष्ठ ऋषी, सत्गुणी माणसाचे ते ज्ञान मी तुला सांगतो ज्यामुळें माणसाला अंतिम ध्येय साध्य करणे शक्य होते. ज्यामुळें माणसाला चिरशांती प्राप्त होते. प्रथम लक्षात घे कीं, जो स्तुतीने अथवा टीकेने विचलित होत नाही, जो व्रतस्थ जीवन जगतो, जो दुसर्याची टीका अथवा स्तुती करत नाही, जो कोणाचे नुकसान होईल असे बोलत नाही व करतसुद्धा नाही, जो कोणाचा अपमान करत नाही, जो दुसर्याचे भले करता न आल्यास नुकसान सुद्धा करत नाही, अपमानाला अपमानाने उत्तर देत नाही, जो सुखाने आनंदी होत नाही व दुःखाने शोक करत नाही, अशा माणसाला ज्ञानी समजले जाते. त्याच्या सगळ्या वासना संयमित असतात. त्यांच्या इंद्रियांवर त्यांचा संपूर्ण संयम असतो. त्यामुळे कोणतीही अमर्यादा ते करत नाहीत. अशारितीने ते त्यांची कर्तव्ये पार पाडत असतात. परंतु, जर त्यांना सन्मानपूर्वक कोणी विचारले तर तुम्हाला उत्तर देतात. त्यात क्रोध, लोभ अथवा मद, मत्सर नसतो. तो कोणाचे मन दुखवत नाही. ते मितभाषी असतात, ते फार आनंदी होत नाहीत अथवा दुःखीसुद्धा होत नाहीत. त्यांच्या सगळ्या प्रतिक्रीया संयमित असतात. थोडक्यात त्यांचे वागणे

तटस्थतेचे असते. त्या त्यांच्या वागण्यातून त्यांची नैतिक वागणूक स्पष्ट होत असते. अशारितीने जे वागतात त्यांना चिरशांती प्राप्त होत असते. त्यातून त्यांचा चांगुलपणा, माणूसकी आणि भूतदया व्यक्त होत असते. अशी माणसं त्यांचे काम बरे कीं, ते बरे, अशाप्रकारे इतरांशी वागत असतात. न विचारता ते सल्ला देत नाहीत. अशांचा जे विनाकारण अपमान करतात त्यांच्यावर ब्रह्माचा रोष होतो. ते अपमान करणारे नष्ट होतात. अशी माणसं उच्चपदी जातात त्यांच्या मृत्यूनंतर. असे वागणारा देव, गंधर्व, राक्षस ह्यांच्यापेक्षा श्रेष्ठ ठरतो ब्रह्माच्या दृष्टीत.

मोक्ष धर्म पर्व भाग छप्पन्नावा संपला.

# मोक्ष धर्म पर्व

## भाग सत्तावन्नावा

युधिष्ठीर पुढे विचारतो, "सर्वांना आनंद देणारा ज्याची प्रतिष्ठा मोठी आहे ज्यांने सर्वकाहीं मिळवलेले आहे असा कोणी मनुष्य असू शकतो कां"?

भिष्म सांगतात, "ह्याकरता मी तुला कृष्ण आणि त्याचा सेनानी उग्रसेन ह्यांचे संभाषण जे झाले ते सांगतो".

उग्रसेन कृष्णाला बोलतो, "नारदांची सगळी वहाव्वा करत असतात, म्हणून मला वाटते कीं, ते सर्वश्रेष्ठ असले पाहिजेत. त्याबद्दल तुला काय म्हणावयाचे आहे"?

वासुदेव सांगतो, "अरे कुक्कुरांच्या सेनानी, माझे त्याबद्दलचे ऐक. मी मला माहीत असलेले नारदांचे चांगले गुण कोणते ते सांगतो, नारदांचे धर्मशास्त्राचे ज्ञान जितके सखोल आहे तितकेच ते पवित्र आहेत. असे असून ते पूर्णतः निगर्वी आहेत ह्याचे मोठे कौतुक करावे. त्यासाठी त्यांची पुजा सगळे करत असतात. असमाधान, क्रोध, भय आणि चेष्टा मस्करी करणे हे दोष त्यांच्यामध्ये नाहीत. त्याची धिरोदात्तता, जबाबदारी घेण्याची तयारी, अशा गुणांमुळें त्याची सर्वत्र पुजा होत असते. त्यांचे आत्म्याचे ज्ञान पूर्ण आहे. त्यांचा शांत स्वभाव, शब्दाचा सच्चेपणा, बुद्धिमत्ता, त्यांची इच्छाशक्ती, त्यांचा नम्रपणा, त्यांची तपस्या, त्यांना सगळीकडून सन्मान मिळवून देत असतात. त्यांचा प्रेमळपणा, त्यांची रहाण्याची पद्धत, त्यांचे खाणे, त्यांचे निर्मळ मन, त्यांची मृदूवाणी अशाने ते सगळ्यामध्ये प्रिय आहेत. त्यांच्या मनात पापबुद्धी नाही. त्यांना दुसर्यांचे भले व्हावे असेंच सदोदित वाटत असते, ते वेदाच्या वाणीने व पुराणांच्या वाचनाने स्वताला शुद्ध ठेवत असतात. ते सगळ्यांचा सम्नान करतात. ते कोणाचा द्वेष करत नाहीत तसेंच ते कोणाला जास्त महत्व देत नाहीत. त्या त्यांच्या वागण्यामुळें त्यांचे सर्वत्र स्वागत होते. त्यांचे वाक्चातूर्य वाखाणण्यासारखे आहे. त्यांचे शहाणपण आदरणीय आहे, त्यांना कसलाच मोह नसतो, त्याचे हित आणि सुख सगळ्यांना मानवणारे असते. त्यांची ब्रह्मावरील भक्ती पूर्ण आहे. त्यांचे श्रृतीचे ज्ञान उत्तम आहे. त्यांच्या मनात संभ्रम नसतो त्यामुळें त्यांचे वागणे शुद्ध असते. त्याकारणांने त्यांची

सगळी कडे पुजा होत असते. त्याना कशाचाच मोह नसतो म्हणून सगळ्यांना त्यांचा मोह असतो. त्यांच्याबद्दल कोणालाही कसलीही शंका नसते. ते मृदूभाषी आहेत, त्याना लोभ आणि मोह बाधत नाहीत. त्यांना सृष्टीच्या उत्पत्तीचे ज्ञान पूर्ण आहे. ते सगळ्या शास्त्र विद्यांचा सारखांच आदर करतात. त्यांचे नैतिकतेचे नियम इतरांना प्रेरणा देणारे असतात. ते पूर्णसंयमी आहेत, त्याकारणांने त्यांचा सगळे आदर करतात. प्रत्येक गोष्टीचे महत्व ओळखून त्यानुसार ते वागतात. म्हणून त्यांचा सगळे सन्मान करतात. त्यांच्या मदतीने इतर त्यांची प्रगती करत असतात. त्यांना सगळ्यांची गुपित माहित असली तरी ती ते कोणाला सांगत नाहीत, म्हणून ते सगळ्यांना आवडतात. त्यांचा विवेक शुद्ध आहे. त्यांचे निर्णय सर्वहिताचे असतात. ते सर्वज्ञ आहेत. म्हणून असे नारद सगळ्यांना आवडतात.

मोक्ष धर्म पर्व भाग सत्तावन्नावा संपला.

# मोक्ष धर्म पर्व

## भाग अठ्ठावन्नावा

युधिष्ठीर पुढे विचारतो, "मला सांगा, सगळ्या चराचराच्या उत्पत्ती मागील कारण काय? त्या जीवांनी ध्यान कसे करावे, त्यांचे उद्देश काय असतात, ते काळाने कसे ठरवले जातात आणि त्यांच्या जीवनाचा कालखंड कसा ठरतो"? ह्या सृष्टीच्या उगमाचे उद्देश काय ते सगळे मला आपल्याकडून समजून घ्यावयाचे आहे. त्याबद्दलचे भृगू व भारद्वाज ह्यांचे संभाषण मला आपण आधी सांगितले, तरी त्याबद्दल मला कांहीं शंका आहेत म्हणून मी ते पुन्हा विचारत आहे. मला त्यातील युग ह्या संकल्पनेची आणखीन माहिती समजून घ्यावयाची आहे.

भिष्म सांगतात, "ह्या बद्दल मी तुला प्राचीन संभाषण जे झाले होते व्यास आणि शुक ह्यांच्या मध्ये ते सांगतो. ध्यान साधना आणि वेदाचा अभ्यास ह्यांच्या मदतीने जे ज्ञान व्यासानी मिळवले ते शुकाला तो ऋषी सांगतो ते मी तुला आता सांगत आहे.

शुक विचारतो, "काळाच्या ज्ञाना प्रमाणे ह्या चराचरांचा कर्ता कोण ते आपल्याला समजले आहे ते मला सांगा. त्याच प्रमाणे ब्राह्मणांची कर्तव्ये कोणती ते सुद्धा सांगा"?

भिष्म सांगतात, त्रिकालज्ञ असे व्यास त्यांच्या मुलाला तो प्रश्न ऐकल्यावर सांगतात,

फक्त ब्रह्म जे अनादीअनंत आहे, ज्याचे तेज अद्वितीय आहे, जे कधी न संपणारे आहे, त्यांच्या कडून जे ज्ञान मला प्राप्त झाले ते मी तुला सांगत आहे. त्याप्रमाणे, काळाच्या भागांची नांव त्या त्या ऋषींच्या नावावरून दिली आहेत. ज्यांना त्यांचे ज्ञान प्रथम झाले. डोळ्याच्या पापण्याची पांच वेळा उघडझाप होते त्या काळाला कस्थ असे नांव दिले गेले. अशा तीस कस्थांचा एक कला होतो. अशा दहा कलांचा मुहूर्त होतो. तीस मुहूर्तांचा दिवस रात्र होते. तीस दिवसरात्रीचा एक महिना होतो. अशा बारा महिन्यांचे वर्ष होते. जे गणित जाणतात ते सांगतात कीं, एक वर्ष दोन अयनांचे (उत्तरायण आणि दक्षिणायन) असते. सूर्य माणसासाठी दिवस आणि रात्र करत असतो. रात्र विश्रांति साठी व दिवस कर्म करण्यासाठी अशी एकंदर व्यवस्था आहे. माणसाचा एक महिना पितरांचा एक दिवस-रात्र असते. पितरांच्या काळाची माहिती सांगतो, शुक्ल पक्ष पितरांसाठी कर्म करण्यासाठी

असतो व कृष्ण पक्ष विश्रांति घेण्यासाठी असतो. माणसाचे एक वर्ष म्हणजे देवांचा एक दिवस-रात्र असतो. म्हणजे देवांचे एक वर्ष म्हणजे माणसाची तिनशे पासष्ठ वर्षे होतात. उत्तरायणाचा काळ दिवस समजला जातो आणि दक्षिणायनाचा काळ रात्र समजली जाते. माणसाचे दिवस आणि रात्र (दिवस-रात्र हे एक समजले जातात) धरून त्यावरून ब्रह्माचे काल मापन कसे होते ते सांगतो. ब्रह्माचे कालमापन युगांच्या परिमाणात धरले आहे. त्याप्रमाणे कृतयुगाचा कालखंड पाहू. देवांची चार हजार वर्षे हा कृतयुगाचा कालखंड समजला जातो. त्यात कृतयुगाची सकाळ चारशे वर्षांची व संध्याकाळ चारशे वर्षांची असें धरून एकंदर कालखंड चारहजार आठशे देवांच्या वर्षांचा होतो. ती सकाळ आणि संध्याकाळ हा कालखंड एका युगातून दुसर्या युगात जाण्यासाठी जे स्थित्यंतर होते त्यासाठी असतो. म्हणून कृतयुगाचा माणसाच्या वर्षाच्या प्रमाणात ४८०० गुणिले ३६५ म्हणजे १७,५२,००० वर्षे (सतरा लक्ष बावन्न हजार) होतो. त्यानंतरच्या युगांचे गणित त्याप्रमाणे असेल. त्रेतायुगात देवांची तीन हजार वर्षे आणि सकाळ संध्याकाळ मिळून सहाशे वर्षे असे धरून एकंदर तीनहजार सहाशे वर्षे देवांची होतात. त्याला तिनशे पासष्ठ ने गुणले कीं माणसाची वर्षे येतात (३६०० गुणिले ३६५ म्हणजे) १३,१४,००० वर्षे होतात. त्यानंतर येते द्वापार युग त्यात देवांची दोन हजार वर्षे व सकाळ संध्याकाळ चे चारशे मिळून चार हजार चारशे वर्षे म्हणजे माणसाची (४४०० गुणिले ३६५) ८,७६,००० वर्षे होतात. अखेरीस कलीयुगाचा कालखंड आहे देवांची बाराशे वर्षे म्हणून माणसाची (१२०० गुणिले ३६५) ४,३८,००० वर्षे आहे. म्हणून ती सगळी मिळून (१७,५२,००० + १३,१४,००० + ८,७६,००० + ४,३८,००० = ४३८००००) माणसाची ४३,८०,००० वर्षे होतात एका मन्वंतराची. अशी मन्वंतर एकामागून एक होत असतात. त्यालाच ब्रह्माचा दिवस असे समजतात. कृतयुगात चार वर्णाचे लोक त्यांची कर्तव्ये योग्य प्रकारे पार पाडत असतात. पुढील युगांत त्यात शिथिलपणा येतो व बिघाड दिसू लागतो. तरी अगदी कलीयुगात सुद्धा कांहीं थोडा मनुष्य समाज कृतयुगाप्रमाणे वागत असतो. म्हणजे सर्व युगांत इतर युगाच्या प्रमाणे वागणारे लोक कांहीं प्रमाणात असतातच. वेदाचा अभ्यास कृतयुगात उत्तम प्रकारे होत असतो व कलीयुगात वेद (अध्यात्माचे ज्ञान) विसरले जातात. कृतयुगात माणसाची मनःशक्ती प्रबळ असते ती कमी होत कलीयुगात

नगण्य होते. पाप करण्याची प्रवृत्ती कलीयुगात प्रबळ असते. कृतयुगात माणसे बहुधा निरोगी असतात पण नंतरच्या युगात आरोग्य बिघडत जाते. सर्वच बाबतीत उत्तम गुणांचा र्हास व दुर्गुणांची वाढ असे होत असलेले दिसते. मनुष्याचे आयुष्य कृतयुगात हजारो वर्षे असते व अपमृत्यू नगण्य असतात परंतु, कलीयुगात अपमृत्यूंचे प्रमाण वाढत जाते व आयुष्य फार कमी झालेले असते. माणसांत कलीचा (भ्रष्टाचार, कलह) प्रभाव मोठा होत जातो कलीयुगाच्या काळात. कृतयुगात यज्ञ जसे सिद्ध होत तसे नंतरच्या युगात होणार नाहीत. कर्मकांड केवळ एक थोतांड बनून राहिल. कारण ज्या देवतांना त्या कर्मकांडाने याचना करावयाची त्या देवता निद्रीस्थ झालेल्या असतील. कलीयुगात भूत पिशाच्च देवतांची जागा घेतील. सद्‌गुणांची जागा दुर्गुण घेतील. ब्रह्मदेवाच्या दिवसाच्या सुरूवातीला सृष्टी प्रारंभ होते. दिवसाच्या अंती सर्वनाश होतो. ब्रह्म त्याच्या अविद्येचे नियम बदलून नवीन विज्ञान तयार करतो व त्या प्रमाणे ते नवीन कल्प प्रारंभ होते. अशी ही सृष्टी अव्याहतपणे कार्यरत होत असते.

मोक्ष धर्म पर्व भाग अठ्ठावन्नावा संपला.

## मोक्ष धर्म पर्व

## भाग एकोणसाठावा

व्यास सांगतात, ब्रह्म हे ओजस्वी बीज आहे ज्याच्यातून सगळे चराचर निर्माण होतात. ह्या विश्वाच्या प्रारंभ काळी त्यातून प्रथम महत (विचार सागर) येते. त्यातून विश्वाचे मन व बुद्धि साकारते. त्या महतातून चित म्हणजे चैतन्य आकार घेते. त्यालाच चित् असें ऋषी सांगतात. दुसरे कांहीं त्याला पुरूष असें बोलतात. तो पुरूष प्रथम अविद्येची कल्पना करतो व त्यानुसार अविद्या साकारते. तिला कांहीं ऋषी प्रकृती अथवा माया असें सांगतात. त्यातून सात गोष्टी तयार होतात, महत मधून (विचार सागरातून) अनेक कल्पना साकारतात. त्यातून जड आणि चल गोष्टी तयार होतात रचना परिमाणाच्या माध्यमातून. कांहीं मुलभूत गोष्टींच्या विविध रचनांतून ते तयार होत असते. त्यातील कांहीं मध्ये चित् प्रवेश करते व त्यामुळें त्याना सजीवता प्राप्त होते. अशा प्रकारे चर आणि अचर जीवांची निर्मिती होत रहाते. अवकाशातून वारे वाहू लागतात जे विविध गंध पसरवत असतात सगळ्या सृष्टीत. वार्यांतून ध्वनि उत्पन्न होतात. त्यामुळे स्पर्श ज्ञानाची निर्मिती होते. अवकाशातून चितच्या प्रभावातून प्रकाश तयार होतो व तो सगळीकडे पसरतो. प्रकाशातून जल तत्त्व तयार होते. त्याला रुची (स्वाद, चव) ज्ञान प्राप्त होते. पाण्यातून पृथ्वी तयार होते. त्याला गंध ज्ञान असते. अशाप्रकारे पांच ज्ञान तत्त्वं उपस्थित होतात.

अशारितीने तयार झालेले विविध पदार्थ एकमेकांत मिसळून रचना परिमाणाच्या प्रभावामुळे आणखीन कित्येक गोष्टी तयार होत हि सृष्टी साकार झाली. त्यामुळे असा अविर्भाव झाला कीं ही सृष्टी विविध गोष्टींतून तयार झाली आहे. वस्तुतः ते सगळे एकच आहे ज्याला महत अथवा ब्रह्म म्हणतात. म्हणून अद्वैतातून द्वैत कसे तयार होत गेले ते सांगितले. महतलाच ब्रह्म, मनस अथवा स्वयंभू अशी अनेक नांवं आहेत विविध ऋषींनी त्यांच्या दृष्टीनुसार ती दिली आहेत. त्यात कांहीं नश्वर आहेत व कांहीं अनश्वर असतात. चित् अनश्वर आहे त्यातून येणार्या प्रेरणांतून आत्मा उपस्थित झाला जो पुन्हा ब्रह्मांत विलीन होण्यासाठी (मोक्षासाठी) जन्म घेत असतो. त्याच्या उद्धाराप्रमाणे त्यातून पितर, ऋषी, देव, किंन्नर

असें जन्म घेत असतात. सगळे चराचर जग त्यातून उत्पन्न होत असते. त्यात चांगले आणि वाईट असे दोन प्रकारचे तयार होत होते कारण जग चालण्यासाठी फक्त चांगले किंवा वाईट असून चालत नाही. त्यात मनुष्य मध्यम स्थानी आहे व तो चांगले व वाईट ह्यात दोलायमान होत असतो ते सत्त्व, रज आणि तम गुणानी व्यक्त होते. बाकी दैवीसंपदेचे देव, यक्ष, गंधर्व, ऋषी, साध्य, सिद्ध हे चांगल्यात येतात व असुरीसंपदेचे दैत्य, दानव, असुर, राक्षस, पिशाच्च, इत्यादी वाईटमध्ये येतात. त्यांच्या जुगलबंदीने जगाची वहीवाट तयार होत असते. प्रत्येक चराचर निर्मिती ह्या चांगले व वाईट ह्यांच्यात विभागलेली असते. ह्या सगळ्यात अध्यात्मिक उर्जा काम करत असते. कांहीं ऋषी सांगतात की, (पहिला पर्याय) माणसाचे दैव त्याच्याच गत कर्माची परिपाक असतो व म्हणून तो त्याला भोगावाच लागतो. म्हणून जे चांगले वाईट भोगावे लागते त्याकरता कोणा दुसर्याला (देवाला) दोष देणे उचित नसते. कांहीं सांगतात की, ह्या जन्मात केलेल्या कर्मानें गतकर्माचे परिणाम बदलता येतात. असे अनेक विविध विचार सांगितले जातात. कांहींच्या मते देवतांना विनंति करून (वशिला लावून) मनुष्य त्याच्या वाईट गतकर्माचा नाश करू शकतो. त्यातून यज्ञ, पुजा, व्रतवैकल्ये अशा कर्मकांडाच्या साधना पद्धती तयार केल्या गेल्या व मनुष्य त्यात अगदी कृतयुगापासून रमत असतो. ते सगळे वेदांत आहे व ते समजण्यासाठी आगम विद्या तयार करण्यात आल्या त्याप्रमाणे मनुष्य पुरोहितांच्या मदतीने त्याच्या वाईट कर्मांचा नाश करण्याचा प्रयत्न करत असतो. त्यात अनेक विचारभेद आहेत. त्यावर ज्ञानी सतत विचार विनिमय करत असतात परंतु, ते सगळे कल्पनेनेच समजावे लागते कारण ते सिद्ध करता येत नाहीत म्हणून ते न मानणारेसुद्धा कित्येक आहेत. कांहीं समजतात (दुसरा पर्याय) कीं, विधाता जे आधीच ठरवून ठेवत आहे तेंच होत असते आणि माणसाच्या गतकर्मांचा अथवा ह्या जन्माच्या कर्मांचा कांहीं परिणाम होत नसतो. तिसरा पर्याय असा कीं, कांहीं समजतात कीं, विधात्याच्या कार्यक्रमात माणसाचे गत कर्म आणि ह्या जन्माचे कर्म असे सगळे कार्यरत असतात. म्हणून देवतांची पुजा करणे (कर्मकांड) चांगले असते. ज्याला जे उचित वाटते ते तो स्वीकारतो व ते त्याचे मार्गदर्शक तत्त्व होते त्याप्रमाणे तो जगत असतो. खरे काय ते

कोणीही सांगू शकत नाही. हिंदू विचारात तिसरा व चौथा पर्याय विशेष मान्य समजला जातो.

आगम विद्या व त्यानुसार केलेली तपस्या माणसाचा देवतांशी संपर्क सिद्ध करतात व त्यांच्या मदतीने मनुष्य त्याचे व इतरांचे कल्याण करू शकतो. ते मानणारे समजतात कीं, ह्या सृष्टीचे सगळे व्यवहार विविध देवता, ज्या महतने त्याच्या कल्पनेने उत्पन्न केल्या आहेत, त्या नियंत्रित करत असतात. त्या देवता हेंच सर्व कांहीं असे मानून त्यांच्या आराधना करण्यातच हित आहे. ते अनेक देवतांची पुजा करण्यात धन्यता मानतात त्यातून विविध कर्मकांड विधी पुरोहित वर्गाने रचल्या आहेत. त्या जर यशस्वी झाल्या तर त्या माणसाला सिद्धी प्राप्त होतात असे समजले जाते. नेमके खरे काय ते कोणालाच सांगता येत नाही. हा चौथा पर्याय असतो. ज्याला जो योग्य वाटतो तो पर्याय तो स्वीकारत असतो.

कांहीं मिळवण्यासाठी कांहीं द्यावे लागते ह्या वैश्विक न्यायाने यज्ञ विधी व त्यातून दान विधी हे पर्याय व्यवहारात आले. ब्राह्मण आणि क्षत्रिय प्राण्याचे मांस देवतांना देतात त्यातून हत्त्या त्या प्राण्याची होत असते त्या ऐवजी वैश्य जे कृषीप्रधान आहेत वनस्पती देण्याचा पर्याय स्वीकारतात. दोनही मध्ये हिंसा आहे. परंतु, जाणकारांच्या मते प्राण्याच्या हत्त्येत कमी हिंसा असते कारण एकच प्राणी मारला जातो परंतु, वैश्यांच्या दानात धान्य देण्यासाठी ते पिकवावे लागते ज्यासाठी शेतकरी अगण्य जीवांची सतत हिंसा त्याचे कृषीकार्य करत असतांना करत असतो, त्यामुळें त्यांची अध्यात्मिक उर्जा फार जास्त प्रमाणात कमी होत असते, म्हणून जनकानें (जनदेवांने) ब्राह्मण व क्षत्रियांचे मांसांचे दान जे कमी पापकारक आहे ते स्वीकारले आणि वैश्यांचे धान्याचे दान जे खूप जास्त हिंसक म्हणून जास्त पापकारक असल्याने अस्वीकृत केले. (*आधुनिक तंत्राप्रमाणे प्राण्याची हत्त्या अहिंसक करणे शक्य झाले असल्यामुळें प्राण्याची हत्या अहिंसक म्हणून जास्त श्रेयस्कर ठरली आहे. वनस्पतीला जेव्हां दुःख होते तेव्हां त्यांच्या पेशी सुक्ष्मपणे कंप पावतात. हे महान वैज्ञानिक जगदीशचंद्र बोस ह्यांनी १९०२च्या सुमारास प्रमाण देऊन सिद्ध केले आहे त्यासाठी बोस एक मापक वापरत त्याचे नांव क्रेस्कोग्राफ असें आहे. त्या संशोधनाने वनस्पतीला दुःख आणि आनंद होतो हे सिद्ध झाले आहे. त्या*

*प्रमाणित संशोधनामुळे शाकाहार जास्त हिंसक आहे हे आधुनिक विज्ञानाप्रमाणे सप्रमाण सिद्ध झाले आहे,*) वनस्पतीची हत्त्या अहिंसक करणे शक्य नसते म्हणून ते जास्त पापमय ठरते. देवांना संतुष्ट करण्यासाठी कांहींनी तिर्थयात्रा हा पर्याय सांगितला आहे ज्यात मनुष्य अशा ठिकाणांना जातो व तपस्या करतो (ध्यान साधना, ब्रह्मचर्य इत्यादि) त्यांमुळे त्याची अध्यात्मिक उर्जा वाढते. हे सगळे मी तुला आधीसुद्धा सांगितले आहे. तू मला विचारले होतेस त्या काळ, सृष्टीची निर्मिती, दान, कर्मकांड विधी, जे वेदात सांगितले आहेत त्याची माहिती सांगितली.

मोक्ष धर्म पर्व भाग एकोणसाठावा संपला.

# मोक्ष धर्म पर्व

## भाग साठावा

व्यास मुनी पुढे सांगतात, "आता सांगतो ब्रह्माचा दिवस कसा जातो व रात्र कशी जाते. दिवस जातो तेव्हां सगळ्या गोष्टी त्याच्यात पुन्हा समाविष्ट होतात. त्यामुळें ते विश्व सुक्ष्म रुपात जाते. त्यातील विविधता संपुष्टात येते. त्यावेळी असंख्य सूर्य त्यातील अग्नीने तळपू लागतात. सगळे विश्व त्या अग्नीत खेचले जाते. एक मोठा भडका उडावा असें होते. सगळे पदार्थ एकमेकांत वितळल्या सारखे मिळून जातात. द्वैताचे पुन्हा अद्वैत होऊ लागते जे त्याचे खरे स्वरुप आहे. पृथ्वी उजाड होते. पाणी प्रथम उकळू लागते व त्याचा उसळण्याचे मोठे आवाज होतात. त्याचा फार मोठा आवाज होईल. सगळीकडे उष्णता जाणवेल. इतर कोणताही गुण रहाणार नाही. त्या अग्नीमध्ये सूर्य झाकला जाईल जो आकाशात मध्ये असेल. त्यानंतर वारा वाहू लागेल. त्याच्या चक्री वादाळाने सगळे घुसळून निघेल. त्यानंतर फक्त अवकाश उरेल बाकी सगळे पंचमहाभूत त्यात विरून गेलेले असतील. त्याचा ध्वनि राहील जो अखेरीस मनांत खेचला जाईल. त्यानंतर कांहींच नसेल. त्यानंतर मनसुद्धा अव्यक्त अवस्थेत जाऊ लागेल. ते ईश्वरात विरून जाईल. अशारितीने त्या कल्पाचा अंत होईल. ईश्वर म्हणजे महत (विचार सागर) त्याच्या मुळ रुपात असेल. काळ सुद्धा संपलेला असेल. अशारितीने अविद्या संपुष्टात येईल. फक्त ब्रह्म त्याच्या अव्यक्त रुपात असेल. असे वेदात सांगितले आहे. त्याची परीक्षा घेता येत नाही. हा विज्ञानाचा विषय आहे. योगी त्यावर त्यांच्या कल्पना सांगतात. ज्या श्रृतीमध्ये दिल्या आहेत. ब्रह्माचे अशाप्रकारे व्यक्त होणे व पुन्हा अव्यक्त होणे हे कोणालाही न समजणारे रहस्य आहे. अशारितीने ब्रह्माचा एक दिवस संपतो व कालांतराने कदाचित दुसरा दिवस उगवतो जेव्हां ब्रह्माला तशी इच्छा होते. ब्रह्माचा एकदिवस अनेक युगांचा असतो. त्याची कोणी गणती करत नाही.

मोक्ष धर्म पर्व भाग साठावा संपला.

# मोक्ष धर्म पर्व

## भाग एकसष्ठावा

व्यास पुढे सांगतात, तू मला सगळ्या चराचरांच्या निर्मितीबद्दल विचारत होतास, त्याची सगळी माहिती मी तुला दिली आहे. आता ह्यापुढे सांगतो ब्राह्मणाची कर्तव्ये कोणती असतात. ब्राह्मण ज्या सगळ्या विधी करतात त्यात पहिला जातकर्म आणि अखेरीस समवर्तन त्यासाठी चांगला जाणकार वैदिक ब्राह्मण असावा लागतो. तो असा असावा की, त्याने त्याचे अध्ययन गुरूच्या घरी राहून केले असले पाहिजे तसेंच त्याने त्याच्या गुरूची मर्जी संपादन केली असली पाहिजे, त्यासाठी त्याने गुरूची दक्षिणा दिलेली असली पाहिजे. तसेंच तो गुरूच्या परवानगीने त्याचा गृहस्थाश्रम आचरत असला पाहिजे. तो त्याची सगळी वैदिक अनुष्ठानं व्यवस्थितपणे करत असला पाहिजे. जर तो गृहस्थाश्रमात नसेल तर तो ब्रह्मचारी असला पाहिजे. गृहस्थाश्रम हा मुख्य आश्रम आहे कारण तो ब्रह्मदेवाचा आश्रम असतो. ब्राह्मण अशा जागी वस्ती करणार जी पवित्र, सुंदर आणि मनाला आल्हाद देणारी असेल. ब्राह्मणाची ख्याति होते जर तो तपस्वी असेल म्हणून प्रत्येक ब्राह्मण तपस्या करेल. त्यात वैराग्य, ब्रह्मचर्य, इंद्रियसंयमन, मर्यादा हे त्याला आचरणात ठेवावे लागतात. ब्राह्मण शिक्षकाचे काम करू शकतो, तसेंच राजाला त्याच्या कामात मदत करू शकतो. तो वेदांचा व इतर संबंधित अगमशास्त्रांचासुद्धा अभ्यास करणारा असला पाहिजे. तो सत्पात्र व्यक्तीकडून दान घेऊ शकतो तसेंच दान करू शकतो. ब्राह्मण त्याच्या उपजिवीकेसाठी पौरोहित्य करू शकतो. सत्पात्र दान केल्याने पुण्यकर्म केल्यासारखे होते तसेंच अपात्र दान केल्याने पाप केल्यासारखे होते म्हणून दान करतांना नेहमी सावधानता यजमानाने बाळगावयाची असते. त्याची अनेक उदाहरणं आहेत. संकृतीचा मुलगा रणतीदेवाचे केवळ कोमट पाणी वसिष्ठ ऋषीना पिण्यासाठी दिले म्हणून त्याचा उद्धार झाला. अत्रीचा राजपुत्र इंद्रदमन अनेकांना विविध दान केल्याने स्वर्गात उच्च स्थानी पोहोचला. उशिनराचा मुलगा शिवी त्याच्या अंगाचे दान केल्याने कायमचा स्वर्गात गेला आहे. प्रदर्दन नरेश त्याचे डोळे ब्राह्मणाला देतो म्हणून त्याचा कायम उद्धार झाला आहे. निमी विदेहचा राजा त्याचे दागिने दान करतो म्हणून स्वर्गात

गेला आहे. युवनस्व वृषदर्भचा मुलगा अनेक दागिन्याचे दान ब्राह्मणाना दिल्यामुळे स्वर्गात गेला आहे. ब्राह्मणाने करावयाची दानं तीन प्रकारची असतात, त्यात वस्तुचे दान, ज्ञानाचे दान आणि पुण्याचे दान महत्वाचे आहेत. ते करणारा श्रेष्ठपदी जातो. एकदा पाऊस पडेना तेव्हां तपोसामर्थ्यांना वसिष्ठ पाऊस पाडून प्रजापतिला मदत करतात तेसुद्धा एक दान होते. कारण ज्याच्या बदल्यात कांहीं मिळण्याची अपेक्षा नसते ते दान समजले जाते. करंदभ त्याची मुलगी अंगिरसाला दान करतो त्यामुळे तो स्वर्गात जातो. राजा मित्रसह त्याची पत्नी वसिष्ठाला दान करतो त्यामुळे तो व त्याची पत्नी मद्यंति असे दोघे स्वर्गात गेले आहेत. राजर्षी सत्यजित त्याचे देहदान करतो एका ब्राह्मणांसाठी म्हणून तो स्वर्गात गेला आहे. राजा सतद्युम्न ऋषी मुद्गलाला राजवाडा दान करतो म्हणून तो स्वर्गात गेला आहे. राजा शल्व त्याचे सगळे राज्य रुचिकाला दान करतो म्हणून स्वर्गात जातो. राजर्षी लोमपाद त्याची कन्या ऋषशृंगाला दान करतो म्हणून त्याचे राज्य अवर्षणापासून सुरक्षित झाले होते. राजा प्रसेंजित असंख्य पशू धनाचे दान ब्राह्मणांना करतो म्हणून त्याचा उत्कर्ष झाला हे सगळ्याना माहित आहे. अशी असंख्य उदाहरणं दाना बद्दलची देता येतात. जे तुम्हाला हवेसे वाटते त्याचे दान कशाचीही अपेक्षा न ठेवता करण्याने ते दान सिद्ध होत असते. त्याने तू स्वर्गात जाशिल.

मोक्ष धर्म पर्व भाग एकसष्ठावा संपला.

# मोक्ष धर्म पर्व

## भाग बासष्ठावा

व्यास पुढे सांगत असतात, जे ज्ञान वेदांत त्रयी मध्ये दिलेले आहे ते समजण्यासाठी ऋचा, साम आणि यजू ह्यांचा शास्त्रशुद्ध अभ्यास करावा लागतो. ते अथर्वामध्ये जास्त चांगल्या प्रकारे दिले आहेत. त्या शास्त्राला वर्ण आणि आचाराचे नियम (अगम विद्या) असें म्हणतात. त्यामध्ये सहा वेगवेगळे वागणूकीचे प्रकार सांगितले आहेत. त्यात सगळे पावित्र्य असते. जे वेदाचे चांगले अभ्यासक आहेत, ज्यांना आत्म्याचे ज्ञान आहे, जे चांगुलपणा म्हणजे काय ते जाणतात, ज्यांचे जीवन पवित्र आहे ते जगाच्या उगम अंताचा विचार चांगला समजतात. एक खरा ब्राह्मण वेदात दिलेल्या रितीरिवाजानुसार जगत असतो. त्याच्या वागण्यात चांगुलपणा, माणूसकी आणि भूतदया परिपूर्ण स्वरुपात असते. तो त्याची उपजिवीका कोणालाही दुःख न देता करणारा असला पाहिजे. शहाण्या लोकांच्या संगतीत राहून तो त्याचे ज्ञान वाढवत असतो. त्याच्या शरीराच्या गरजा संयमित असतात. त्यासाठी तो तसे वळण त्याच्या शरीराला व मनाला लावतो. त्यासाठी घालून दिलेले नियम तो प्रामाणिकपणे आचरत असेल. त्याचे गृहस्थी जीवनसुद्धा त्याप्रमाणेच असेल. तो पूर्ण श्रद्धेने त्याच्या कुलदेवतांची पुजा करत असेल. त्यासाठी जे यज्ञविधी (पुजाआर्चा) सांगितले आहेत ते तो आचरणात ठेवील. त्याचा अहंकार असा नियमित असेल कीं, त्याच्यामध्ये क्रोध व स्वाभिमान किमान (गरजेपुरते) असतील. तो सदैव उद्यमशिल असेल. ज्या सहा गोष्टींमुळें माणसाची अध्यात्मिक उर्जा वाढते त्या दान करणे, वेदांचा अभ्यास करणे, यज्ञ करणे, तपस्या (ध्यानसाधना), नम्रता, प्रामाणिकपणा, संयम ह्यांचे पालन करत असेल. त्यामुळें त्याच्या गतकर्माचे पापसुद्धा यथावकाश संपुष्टात येत असते व तो पुण्यवान होत असतो. जर तो बुद्धीमान असेल तर आहार मर्यादित ठेवील. अशारितीने प्रमाणित जीवन जगणारा तो ब्राह्मण स्वर्गाच्या दिशेने जाऊ लागतो. त्याला विविध देवता अनुकूल होतात. त्या देवता त्याला न बोलावता मदत करू लागतात. त्यामुळें त्याला कर्मकांडं करण्याची आवश्यकता रहात नाही. तरी तो अग्नीदेवाची पुजा करत असेल कारण ते देवांचे मुख आहे. तो चुकूनही वाईट गोष्टींमध्ये

रमणार नाही. असें ब्राह्मणांसाठी सांगितले आहे. त्याचा भवसागरातील प्रवास सोपा होतो. ज्या ब्राह्मणाचा राग अनावर आहे, वासना उत्तेजित आहेत, मोह लोभात जो अडकला आहे त्याच्यामागे काळ लागतो हे त्यांने समजून त्याच्या वागण्यात सुधारणा केली पाहिजे. निसर्गाचे चक्र काळाच्या जोरामुळे सतत पुढे सरकत असते ते कोणी थांबवू शकत नाही. काळाच्या अथांग नदीत ते वहात जाते कोणी त्याला थांबवू शकणार नाही. त्यात वावरणारे वासनेचे हिंस्त्र प्राणी त्यात बुडणार्याला खाऊन टाकत असतात. तेथे दया माया नसते. हे समजून मनुष्य सावध राहून त्याचे जीवन जगेल तो त्यातून तरू शकतो. शरीराच्या वासनांत अडकलेला कितीही वेदशास्त्र संपन्न असला तरी काळाच्या त्या उग्र नदीत बुडत असतो त्याच्या वासना त्याला संपवतात. शरीराच्या सर्व वासनांवर जो लक्ष ठेवून त्यांना आळा घालतो तो भवसागरातून निभावतो सहीसलामत. योग्य आणि अयोग्य समजणारा अथवा ज्याला सच्चा मार्गदर्शक लाभला आहे असा, काळाच्या तावडीतून लिलया निसटत असतो. नाहीतर तो जन्म मरणाच्या विळख्यात कायमचा अडकलेला रहातो.

मोक्ष धर्म पर्व भाग बासष्ठावा संपला.

# मोक्ष धर्म पर्व

## भाग त्रेसष्ठावा

व्यास पुढे बोलतात, ज्याला मोक्षाची आस आहे त्याला त्या बद्दलचे ज्ञान संपादन करावे लागते. त्यात तो समजतो आत्मा आणि जीव ह्यातील फरक. त्या माहिती शिवाय तो नेहमी गोंधळात राहून अज्ञानी होतो. ते ज्ञान त्याला योगानेच प्राप्त होत असते. त्याला अनुभूती असे म्हणतात. त्यासाठी योगाच्या दहा गरजा समजून घ्याव्या लागतील. त्या अशा आहेत, स्थळ (जेथे जमीन समतल आहे, खाचखळगे नाहीत, शांतता आहे, एकांताची जेथे गडबड गोंधळ नाही), कृती (खाण्यात, खेळात, इतर प्रकारच्या करमणूकीत रमणार नाही.), इच्छा (चांगले विचार, योगाचा ध्यास), उद्देश (कामूक इच्छांचा नाश व चिंता न करणे), साधने, निर्धार (सर्व वासनिक इच्छांचा नाश आणि मोह, लोभापासून दूर), दृष्टी, आहार, संयम आणि स्वताचे निरीक्षण. योगसाधना बरोबर होण्यासाठी माणसाचा शरीर व मना ह्यांवर ताबा असला पाहिजे. जीवनात होणार्या सगळ्या गोष्टींकडे त्याची (चांगल्या व वाईट) पहाण्याची दृष्टी निरीक्षकाची असावी लागते. सगळे अनुभव तो अभ्यासत असेल व त्यांत भावनाविवश होणार नाही. भावनाविवश होणारे योगसाधना करू शकत नाहीत. मनाचा निर्धार मोठा गुण असतो तो त्याच्यात असला पाहिजे. योगसाधनेसाठी शरीर हे एक माध्यम आहे हे समजून तो शरीराचा उपयोग करणार. त्याला "खलू धर्म साधनम्", असे सांगितले आहे. शरीरातील प्राण, (अपान, व्यान, उदान आणि समान) पांच ज्ञानेंद्रियं दृष्टी, श्रवण, गंध, स्पर्श, स्वाद, हे त्या शरीररुपी रथाचे घोडे समजावे. त्या रथाचा सारथी असतात मन व बुद्धी आणि आत्मा त्या रथाचा स्वामी असतो. श्रद्धा आणि संयम त्याचे लगाम असतात. औदासिन्य त्या आत्म्याचा मित्र असतो आणि लिंगदेह त्याचा साथी असतो. शुद्ध जीवन त्याचा रस्ता असतो व मोक्ष त्याचे गंतव्य स्थान असते. अशा तयारीने तो योगी त्याची साधना सुरू करतो. आता मी तुला सांगतो त्या युक्त्या ज्यांच्यामुळें आत्मा त्याच्या शरीराचा उपयोग करून ब्रह्मपदी सुखरुप जाऊ शकतो. त्या पद्धतीने जर तो साधना करेल तर त्याला कमीत कमी त्रास होईल. एकाद्या गोष्टीवर

एकचित्त करण्याला धारणा (सात धारणा सांगितल्या आहेत त्यात पंचमहाभूत आणि मन व बुद्धी येतात.) असें म्हणतात. योगी अनेक विषयांची धारणा करू शकतो. त्या पद्धतीने तो यथावकाश त्यामध्ये निष्णात होतो. तो पंचमहाभूतांवर धारणा करून त्यांच्यावर ताबा मिळवू शकतो. त्यानंतर जर तो ठरवेल तर त्याच्या चित्तावर धारणा करून त्याचे नियंत्रण करू शकतो. त्यापुढे जाऊन तो अव्यक्त जगावर नियंत्रण करण्याचे तंत्र आत्मसात करू शकतो. हे सगळे करण्यासाठी त्याला सातत्य लागते व त्या काळात त्याचे ब्रह्मचर्य पूर्ण असावे लागते. त्याकरतां जे नियम वेदांत घालून दिले आहेत त्याचे काटेकोरपणे त्यांनी पालन करावयाचे असते.

हे सगळे तो त्याच्या गुरूच्या मार्गदर्शनात करणार असेल कारण तसे न केल्यास त्याच्या ज्या चुका होतील त्यामुळे त्याचा मृत्यू होवू शकतो. साधना करतांना एका प्रसंगी तो त्याचा आत्मा पाहू शकतो जसे आपण आपला चेहरा आरशात पहातो. त्याच्या लिंगदेहाचे सुद्धा तो दर्शन घेऊ शकतो. तशी दर्शनं त्याला सुशूप्ती अवस्थेत होतात. कारण त्या सुमारास त्याचा आत्मा त्याच्या शरीरातून बाहेर आलेला असतो. ह्या सगळ्या स्वानुभूतीच्या गोष्टी असतात त्यांचे सिद्ध करणे प्रयोगसिद्ध शास्त्रानुसार शक्य नसते. म्हणून हे सगळे अनुभवसिद्ध विज्ञानाचा भाग समजले जातात. पंचमहाभूतांच्या वर त्याचा संयम येतो. जेव्हां पृथ्वीवर त्याचा संयम येतो तेव्हां असा योगी त्याच्या अंगातून विविध वस्तू काढू शकतो. त्यावेळी त्याला प्रजापति असें समजले जाते. जेव्हां वायू त्याच्या नियंत्रणात असतो तो म्हणेल तर सगळी पृथ्वी तो धरणीकंपमय करू शकतो. आकाशावर जेव्हां त्याचा ताबा येतो तो अदृष्य होऊ शकतो. पाण्यावर ताबा येतो तसा तो अगस्त्य ऋषींप्रमाणे सगळा सागर प्राशन करू शकतो. अग्नीवर ताबा होतो तेव्हां तो तेजांनी असा चमकू लागतो जणू दुसरा सूर्य. त्या अवस्थेत गेलेला योगी सृष्टीचे सगळे व्यवहार चांगल्या प्रकारे समजू शकतो. तो सृष्टीबद्दल पूर्ण ज्ञानी झालेला असतो पण अजून त्याला देवतांचा अभ्यास करावयाचा असतो जर त्याला मोक्षाकडे जावयाचे असेल. त्या अवस्थेत गेलेल्या योग्यासाठी सगळी अव्यक्त सृष्टी व्यक्त झालेली असते.

पुढचे समजून घेण्या आधी तू सांख्य काय सांगतात ते पाहून घे. योग आणि सांख्य आत्म्याच्या अनुभूतीसाठी तयार केलेले दोन मार्ग वेदानुसार सांगितले आहेत, त्या

दोघांचा उद्देश एकच असल्यामुळे त्यामध्ये ज्या पंचविस विषयांचा अभ्यास होते त्याबद्दल तुला सांगतो. जे व्यक्त आहे त्याची लक्षणे अशी असतात, त्यांचा जन्म होतो, ते वाढतात, त्यानंतर ते वृद्ध होतात व शेवटी नष्ट होतात म्हणजे मरतात. ज्यांच्यात ही लक्षणं नसतात ते अव्यक्त मध्ये धरलेले आहेत. प्राचीन विद्या वेद सांगतात कीं, प्रत्येकाचे दोन आत्मे असतात एक अव्यक्त व दुसरा व्यक्त असतो. जो व्यक्त असतो त्याला जीवात्मा म्हणतात. जीवात्मा किंवा जीव शरीराला बांधलेला असतो व तो शरीराबरोबर नष्ट होत असतो. त्या जीवात्म्याला त्याच्या संवर्धनासाठी चार गोष्टी लागताततस त्या अशा धर्म, संपत्ती, सुख, मुक्ती. त्याची उत्पत्ती अव्यक्त आत्म्यातून होत असते. ते एकाच वेळी बुद्धीमान असूनही अज्ञानाने वेढलेला असल्याने बुद्धीहीनसुद्धा असल्यासारखे वागत असतो. जीवात्म्याला सत्त्व समजले जाते सांख्यांच्या परिभाषेत अव्यक्त आत्म्याला क्षेत्रज्ञ समजले जाते. त्या दोघांचा उद्देश वेदांत असा आहे कीं, ते दोनही प्रकारचे आत्मे शरीराच्या इंद्रीयांच्या भोगात अडकलेले असतात. सांख्य सांगतात कीं, इंद्रीय भोगांपासून साधक अलिप्त राहील. ज्याला ते जमले तो योगी ठरतो. तेथून योग पद्धती प्रारंभ होते. त्याची मुक्ती होते त्या सगळ्या जोडांपासून ज्यांचा उल्लेख असा केला आहे, त्या अशा आहेत सुख-दुःख, थंडी-गरमी, आनंद-वेदना, सत्य-असत्य, क्रोध-लोभ, मद-मत्सर, इच्छा-मोह, स्तुती-टीका. त्या अवस्थेत गेल्याने तो योगी पापमुक्त होतो. अशा जोडगोळ्यांपासून मुक्त अशा त्याच्या इच्छा सहसा पूर्ण होत असतात. सातत्याने अशा स्वभावात राहणारा योगी ठरतो व लिलया मोक्षाकडे जात असतो. मी तुला सांख्यांचे व योग्यांचे विचार कसे असतात ते थोडक्यात सांगितले आहे. थोडक्यात जो ह्या जोडगोळ्यांच्या बंधनातून मुक्त झाला तो ब्रह्माला प्रिय होतो व त्यात मिळून जातो.

मोक्ष धर्म पर्व भाग त्रेसष्ठावा संपला.

# मोक्ष धर्म पर्व

# भाग चौसष्ठावा

व्यास पुढे सांगतात, मोक्ष साधना करण्यात कृतयुग चांगले होते कारण त्या युगात माणसाचे आयुष्य कांहीं हजार वर्षे असे. त्या युगात साधारणपणे एका जन्मात मोक्षप्राप्ती शक्य होती परंतु, नंतरच्या युगात आयुर्मर्यादा कमी होत जाणार त्यामुळे मोक्षसाधना करण्यासाठी माणसाला कित्येत जन्म घ्यावे लागणार हे उघड आहे. साधारण अंदाजाप्रंमाणे त्रेतायुगात चार जन्म द्वापार युगात आठ ते दहा जन्म आणि कलीयुगात बारा पेक्षा जास्त जन्म घ्यावे लागतील. परंतु, जर सद्गुरू कृपा असेल तर त्याहून कमी कालखंडात ते होणे शक्य असते. त्यासाठी त्या योग्याला प्रत्येक जन्मात त्याच्या मोक्ष उद्दिष्टाची आठवण रहाणे आवश्यक असते. जर तो ते विसरला आणि शरीराच्या भोगांच्या मोहात अडकला तर त्याची मोक्ष साधना खंडीत होत असते व त्याचा अध्यात्मिक उद्धार थाबतो.

शुक विचारतो, "ते कोणते ज्ञान असते ज्याच्या प्राप्तीने त्याचे मन इतर भोगांकडे न जाता फक्त मोक्षसाधनेकडेच एकचित्त राहू शकते ते सांगा. कृतयुगात एकाच जन्मात ते शक्य होते कारण त्याच्या त्या जन्मात त्याचे एकच शरीर व एकच जीवात्मा होते परंतु, नंतरच्या युगांत अनेक जन्म घ्यावे लागत असल्याने प्रत्येक जन्मातील वेगळ्या जीवात्म्याला आधीच्या जन्मात केलेल्या साधनेची आठवण करून देण्यात लिंगदेह कितपत कामयाब होतो ते समजत नाही. त्याकरता त्या जन्मोजन्मी पोहोचणार्या ज्ञानाची कांहीं माहिती सांगा".

व्यास सांगतात, "लिंगदेह जीवाच्या सगळ्या गोष्टींची नोंद योग्य प्रकारे करत असल्याने ते शक्य होते. तरीसुद्धा नवीन जन्माचा जीवात्मा बदललेल्या परिस्थितीमुळें मार्गभ्रष्ट होणे अशक्य नसते. विशेषकरून कलीयुगात कित्येक जन्म घ्यावे लागत असल्यामुळें तसे होऊ शकते. त्याची मोक्षसाधना खंडीत होऊ शकते. कांहीं समजतात कीं, आपले जीवनभोग ब्रह्माच्या एका वेगळ्या योजनेचा भाग असतात व त्याचा आपल्या गतकर्माशी कांहीं संबंध नाही. असे समजणारे भरकटत जाऊन त्यांची मोक्षसाधना

खंडीत होण्याची जास्त शक्यता असते. तशा समजात तू राहू नकोस त्यासाठी कर्मविपाकाचा व शक्तीसातत्याचा असें दोन सिद्धांत तू प्रथम समजून घे. निसर्गास त्याचा असा वेगळा कार्यक्रम नसतो जे मनुष्याच्या बाबत घडते ते त्याच्याच कर्माचा अथवा विचाराचा परिणाम असतो. ते समजण्यासाठा मी तुला कांहीं उदाहरणं सांगतो, पहा शेतकर्याचे उदाहरण, शेतकरी शेती करण्यासाठी लावणी करतो पाणी देतो त्यामुळें त्याला पीक मिळते. ह्यात शेती करण्याची जी कामं त्यानी केली त्या त्याच्या कर्माचा विपाक (परिणाम) म्हणून त्याला पीक मिळाले. दुसरे उदाहरण, मनुष्य गाडी बनवतो तेव्हां ती चालते म्हणजे गाडी बनवण्याच्या कर्माचा विपाक त्याला गाडी मिळते. निसर्गात आपसुकपण पीक येत नाही किंवा गाडी बनत नाही. त्यासाठी माणसाला कर्म करावे लागते. अशी कित्येक उदाहरणं तू तुझ्या भोवती पहात आहेस. माणसाला आजार होतात त्यावर तो इलाज करतो व बरा होतो. हेसुद्धा कर्मविपाकाचे नेहमीचे उदाहरण आहे. जर व जे कराल ते व तसे तुम्हाला परत मिळत असते, ना कमी ना जास्त. हा समान शक्ती सातत्याचा सिद्धांत वेदांनी मान्य केला. जसें चेंडू जोराने आपटला तर तो उसळी मारून परत तुमच्या कडे येत असतो. सनातन विचारातील हा पहिला सिद्धांत आहे. शहाणी माणसे ते लक्षात घेऊन जीवाच्या कर्माचा परिणाम त्या आत्म्यालाच उलटून भोगावा लागतो हा नियम मान्य करतात. ह्यालाच कर्मविपाक सिद्धांत असें म्हणतात हा दुसरा सिद्धांत मान्य झाला. कर्मविपाक शक्य होण्यासाठी त्या आत्म्याला मृत्यूनंतर पुन्हा जन्म घेणे क्रमप्राप्त असल्याने पुनर्जन्माचा सिद्धांत वैदीक ऋषींनी स्वीकारला. अशारितीने सनातन (हिंदू) धर्मात हे तीन मुलभूत सिद्धांत प्रस्थापित झाले. संपूर्ण सनातन विचार प्रणाली ह्या तीन सिद्धांतावर आधारीत आहे. त्याशिवाय अध्यात्मिक उर्जेच्या कमी अथवा जास्त होण्याचा सिद्धांत आधीपासून मान्य झाला होता. त्या सिद्धांता नुसार पाप पुण्य व्यवस्थापनाचे नियम ऋषींनी सांगितले ते वेदांत आहेत. शहाणपणाच्या मदतीने मनुष्य ह्या सृष्टीला समजण्यात यशस्वी होतो. म्हणून तो फार महत्वाचा असतो. सगळे सांख्य तत्वज्ञान अशा शहाण्या लोकांनी तयार केले आहे त्यासाठी त्यांनी त्यांच्या भोवतीच्या निसर्गाचे व प्राण्यांचे निरीक्षण केले व त्यावरून त्यांच्या बुद्धीच्या (शहाणपणाच्या) मदतीने ही अध्यात्मविद्या तयार केली आहे.

त्यांच्या निरीक्षणानुसार चर आणि अचर असे दोन प्रकारचे जीव आहेत. त्यात चार प्रकारचे ते आहेत हेसुद्धा ते समजले. ते आहेत, गर्भज, अंडज आणि वनस्पती (बीज). त्याशिवाय सुक्ष्म जीव आहेत जे पेशीज समजले जातात कारण त्यांची निर्मिती एका पेशीच्या विभाजनाने होत असते. माणसाच्या समजण्यानुसार चर जीव अचरांपेक्षा उच्च दर्जाचे असतात. त्यात पुन्हा जे चर त्यांच्या बुद्धीने त्यांची कामं करतात ते त्यात जास्त उच्च समजले आहेत जे चर त्यांच्या उपजत प्रेरणेने त्यांचे जीवन जगतात ते त्यापेक्षा कमी दर्जाचे समजले जाऊ लागले. त्यांच्या निरीक्षणाप्रमाणे चर प्राण्यात चार पायाचे आणि दोन पायाचे असें असतात. त्यात दोन पायाचे त्यातल्या त्यात श्रेष्ठ समजले जाऊ लागले. दोन पायाच्यात कांहीं जमिनीवर रहातात व कांहीं झाडांवर रहातात. त्यातील मनुष्य जमिनीवर रहाणारा जास्त श्रेष्ठ समजला जाऊ लागला. दोन पायाच्या माणसात जे कच्चे खातात त्यापेक्षा शिजवून खाणारा कारण तो बुद्धी त्यासाठी वापरतो म्हणून अधिक उच्च समजला जाऊ लागला. अशी सगळी आपल्या पूर्वजाच्या निरीक्षणाची परिणिती आहे. थोडक्यात असे कीं, बुद्धी वापरणारे श्रेष्ठ समजले जाऊ लागले व जे त्यांच्या उपजत प्रेरणेने त्यांचे जीवन जगतात ते कनिष्ठ समजले जाऊ लागले. आत्मा त्या सगळ्या चराचरात प्रविष्ठ असतो परंतु, फक्त माणसाचा आत्मा त्याच्या उच्च दर्जाच्या बुद्धी प्रेरणेमुळे अध्यात्म विद्येत पारंगत झाला आहे असे त्यांना समजले. कर्म त्याचे परिणाम आणि भाग्य असे तीन आहेत हे ते सांख्य मान्य करू लागले. माणसाचे ह्या जन्माचे भोग व कर्मं त्याच्या आधीच्या जन्माचा परिपाक असतो असे एक गृहीत तत्त्व त्याना मान्य करावे लागले जे त्यांच्या निरीक्षणानुसार योग्य होते. पुढे बुद्धीचा निकष सर्वमान्य झाल्यामुळें जे जास्त बुद्धीमान ते कमी बुद्धीमंतांपेक्षा श्रेष्ठ ठरले. माणसाची कर्तव्ये कोणती ते ठरवण्यात त्या बुद्धीचा उपयोग होत होता. जे वेद समजतात ते न समजणार्यांपेक्षा श्रेष्ठ ठरले. वेदज्ञांत आत्मा समजलेले व न समजलेले असे दोन आहेत. त्यातील पहिले श्रेष्ठ समजले जातात. माणसाची कर्तव्ये कोणती ते जाणणारे ज्यात दोन कर्तव्ये विचारात घेतली गेली ती प्रवृत्ती आणि निवृत्ती अशा आहेत. प्रवृत्ती म्हणजे सकाम कर्म करणे आणि निवृत्ती म्हणजे निष्काम कर्म करणे. जे निवृत्ती

मध्ये रहातात ते ब्रह्माला समजण्यासाठी जास्त योग्य ठरले त्यांना ब्राह्मण म्हणून समजले जाऊ लागले.

अव्यक्त सृष्टीतील कार्यकारी देवता निवृत्ती श्रेष्ठ समजतात. ते असे मानतात की, जीवात्मा शरीरात असतो व आत्मा शरीराच्या भोवती प्रभावळीच्या रुपात वावरत असतो. सगळ्या चराचरांचे आत्मे तसे असतात. त्यांच्या प्रभावळीच्या रंगावरून तो किती शुद्ध आहे ते ज्ञानी लोक ओळखतात. जर शुभ्र वर्ण असेल तर तो दिव्य आत्मा समजला जातो. अशाप्रकारे चराराची व्यवस्था ब्रह्माने केली आहे असें मान्य झाले आहे. त्याला अनुभूती सिद्धता आहे परंतु, प्रयोगसिद्धता नाही कारण त्या विषयात प्रयोग करणे शक्य नसते. म्हणून तो विषय समजण्यासाठी, अरे शुका, गुरूवर अंधश्रद्धा असावी लागते.

मोक्ष धर्म पर्व भाग चौसष्ठावा संपला.

# मोक्ष धर्म पर्व

## भाग पासष्ठावा

व्यास पुढे सांगतात, "ब्रह्मणावर कांहीं जबाबदार्या असतात त्या सांगतो, ज्याला ज्ञान आहे तो त्या गोष्टीमध्ये यशस्वी होतो. तरी कांहीं शंका असतात जसे, ते कार्य आवश्यक होते कां? त्याच्या शिवाय झाले नसते कां"? त्यातील पहिल्याचे उत्तर असे कीं, ब्रह्मज्ञानासाठी असेल तर ते आवश्यक होते. इतर सगळी अनावश्यक समजली जातात. आता मी तुला सांगतो, ह्या संशोधनावरचे इतर निष्कर्ष काय आहेत. कांहीं जाणकार सांगतात कीं, कर्म महत्वाचे आहे. दुसरे सांगतात, केवळ निसर्गाची योजना आपले भोग ठरवत असते. तिसरे सांगतात माणसाचे कर्म आणि निसर्गाची योजना असे दोनही आपले भोग ठरवत असतात. आणखीन कांही समजतात कीं, नेहमीच त्यांचा संयुक्त प्रभाव असेल असे नाही, कधी त्यातील एकच कारणीभूत असू शकतो. अशी विविध पर्यायी मतें मांडली जात होती. त्या सगळ्यांचा विचार ते दृष्टे ऋषी करत होते. तपस्या करणार्यांना दृष्टांत होत होते व त्यातून त्यांना विचारसागरातून नवीन संकल्पना समजू लागल्या ज्या अनुभवसिद्ध होत्या. त्यांची निरनिराळ्या युगांतील दृष्टे दखल घेत होते. ते साक्षात्कार त्यांनी ऋचा, साम आणि यजूंमधून सांगितले आहेत ते त्या चार वेदात आहेत. अनेक हजारो वर्षाच्या घोर तपस्येने ते ज्ञान त्यांना प्राप्त होत होते. इतर कमी प्रतीचे विद्वान ती माहिती आयती घेऊन त्यानुसार त्यांचे आडाखे मांडत होते. अशारितीने ह्या सृष्टीचे स्वरुप ते समजत व सांगत होते. त्यात कवी कल्पनासुद्धा घुसडल्या जात होत्या. त्या कवीकल्पनांतून अज्ञानी सुद्धा ब्रह्माची साधारण कल्पना करू लागले. पुढे ब्रह्माच्या अस्तित्वाबद्दल शंका उरली नाही. तरी ते प्रयोगांने सिद्ध झालेले नव्हते. त्यामुळे प्रखर बुद्धीवादी ब्रह्माच्या अस्तित्वाबद्दल आजही शंका घेत असतात. त्यामुळें ब्रह्माच्या उद्देशाने जे यज्ञ करावयास सांगितले होते त्याच्या आवश्यकतेबाबत ते बुद्धीवादी साशंक असतात. ज्याचा जो जीवन प्रकार त्याप्रमाणे त्यांचे देवतांचे अनुष्ठान बनवले गेले जसें, ब्राह्मणांनी आणि क्षत्रियांनी मांसांचा प्रसाद यज्ञात देण्यास सुरूवात केली कारण ते मांसाहारी होते. वैश्य कृषी करत असल्याने त्यानी शाकाहारी प्रसाद देण्यास प्राधान्य दिले व ते ते त्या त्या प्रकारच्या प्रसादांचा आग्रह

करू लागले. वस्तुतः ब्रह्माला जो प्रसाद हवा असतो तो तुमच्या तपस्येचा असतो. तो ब्राह्मण देत होते. जोवर ब्राह्मण तेजस्वी होते तोवर ते चांगले होत होते पण त्रेता युगापासून पुढे ब्राह्मण भ्रष्ट झाले तसे कांहीं ब्राह्मणांनी कारण त्यांचा आहार प्रामुख्याने मांसाहार होता यज्ञात मांस प्रसाद देण्याची प्रथा चालवली. क्षत्रियांचा मांसाहारी प्रसाद व कांहींनी वैश्यांचा शाकाहारी प्रसाद यज्ञात (पुजांत) देण्याची प्रथा कायम केली. शुद्र वैश्याप्रमाणे शाकाहार देऊ लागले कारण त्यांचा प्रधान आहार शाकाहार होता. अशारितीने चारही वर्णाचे लोक त्यांच्या सोयीनुसार ब्रह्माची पुजा करत होते. कृतयुगानंतरच्या काळात वेदांचा विसर पडणार व भलतेच कांहीं धर्माच्या नांवानें लोकांना सांगितले जाणार असे नियतीने ठरवलेले असल्याने तसे होत जाणार आहे. सत्य, तपस्या योग साधना ह्यांचा विसर पडणार व मिथ्याचार वाढत जाणार अशी काळाची किमया आहे. काळ सगळे उलटवू शकतो कारण तोंच ब्रह्माचे अंतिम शस्त्र आहे.

मोक्ष धर्म पर्व भाग पासष्ठावा संपला.

# मोक्ष धर्म पर्व

## भाग सहासष्ठावा

भिष्म नंतर सांगतात, "शुक व्यासाकडून मिळालेल्या माहितीने संतुष्ट होतो व आणखीन माहिती विचारण्यासाठी प्रश्न विचारतो".

शुक विचारतो, "सर्वप्रकारे शहाणा झालेला, वेदाचा अभ्यास केलेला, निर्दोष जीवन जगणारा, त्यापुढे ते ब्रह्म कसे समजू शकतो जे प्रयोगांने अथवा कोणत्याही युक्तीने आकलन होणारे नसते? ते सांगा. असें विलक्षण असलेले ब्रह्म मनुष्य कसे जाणून घेऊ शकतो ते सांगा. केवळ तपस्येने, ब्रह्मचर्य पालनाने, वैराग्याने, कां केवळ बुद्धीसामर्थ्याने ते शक्य असते ते मला सांगा".

व्यास सांगू लागतात, कोणीही योग्य ज्ञानाशिवाय असे ब्रह्म समजू शकत नाही. त्याशिवाय तपस्या, ध्यान साधना, इंद्रिय संयमन, वैराग्य आणि ब्रह्मचर्य असावे लागते. ब्रह्माचे अस्तित्व सगळ्या सृष्टीत सर्वत्र पसरलेले असते ते कोण्या एका ठिकाणी नसते. सगळे वस्तुमात्र पृथ्वीतून येत असतात, त्याशिवाय पाण्यात असते, त्या ब्रह्माचे डोळे प्रकाशात असतात, प्राण, अपान, व्यान आणि समान असे वायुच्या रुपात असतात, त्याचे नाक, कान असे भाग आकाशातून तयार होत असतात. त्याचे पाय विष्णूमध्ये असतात. त्याचे हात इंद्र असतो, उदर अग्नी असतो, कानामध्ये त्याची क्षितिज असते, जिभ सरस्वती असते, त्याचे ज्ञानेंद्रियं त्याच्या कानात, नाकात डोळ्यात त्वचेत असतात. त्यांच्या मदतीने ते ब्रह्म सगळ्या गोष्टींचे ज्ञान करून घेत असते. त्याचे मन म्हणजे त्याचे ज्ञान असते. त्याच्या मदतीने ब्रह्म सृष्टीचा गाडा चालवत असतो. असे असले तरी त्याला शरीर नसते. त्याची केवळ कल्पना दिली आहे जी ऋषी अनुभवतात. त्याची प्रकृती जिचे तीन विशेष गुण आहेत, चांगुलपणा, वासना आणि अज्ञान. त्याचे (प्रकृतीचे) आकलन ध्वनिच्या माध्यमातून होत असते. त्याचा जीव (कार्यकारी प्रेरणा) अज्ञानी असतो, आत्मा जरी ज्ञानी असतो. त्याच्या वासनेतून सहा प्रतिक्रीया (काम, क्रोध, लोभ, मोह, मद आणि मत्सर) व्यक्त होत असतात. हे सगळे योगी त्याच्या कल्पनेने समजून घेत असतो. जीवाचे अस्तित्व फक्त

मनाला कल्पनेने ओळखता येते, त्याचे वस्तुनिष्ठ स्वरुप नसते. म्हणून त्याच्या अस्तित्वाला बुद्धीजीवी आव्हान देत असतात. जो अंधश्रद्धेने गुरूच्या सांगण्यारून त्याचे अस्तित्व मानतो तो पुढची प्रगती करत असतो. जो ते मानत नाही त्याला ब्रह्माचे ज्ञान कधीच होत नाही. योग्याला त्याचे दर्शन त्याच्या विचारांच्या प्रकृती आणि विकृतीनुसार वेगवेगळे होत असते. म्हणून कोणाला तो गाईच्या रुपात दिसतो तर कोणाला हत्तीच्या रुपात. कोणाला सुंदर देवता दिसते तर कोणाला फक्त प्रकाश दिसतो. ह्या सगळ्या त्या त्या साधकाच्या मनातील ब्रह्माबद्दलच्या संकल्पनाची रुप असतात. प्रत्येकाचे दर्शन वेगवेगळे असते त्यामुळे विचारणार्याचा बुद्धीभेद होत असतो. म्हणून ब्रह्माला असे त्याचे विशिष्ट रुप नसते हे समजून घे. त्याची गरज माणसाला भासते कारण मनुष्य त्याच्या मर्यादित आकलन क्षमतेचा गुलाम आहे. त्यासाठी अरे शुका, ब्रह्माच्या स्वरुपाबद्दल तू आग्रही होऊ नकोस. ते महत्वाचे नसते. म्हणून तू ब्रह्माच्या वास्तविक रुपाची अपेक्षा करू नकोस कारण त्याला तसे निश्चित रुप नसते. त्याची जी जाणीव तुझ्या अंतर्यामी होईल त्यावर समाधानी रहाणारा योगी शांत होऊन त्याची ध्यानसाधना करत रहातो व तोंच मोक्षाप्रती जातो. ब्रह्म सुक्ष्म आहे त्याचवेळी स्थुल सुद्धा आहे. ते आहे आणि नाहीसुद्धा अशा प्रकारे कांहीं ऋषी त्याचे वर्णन करतात त्यामुळे बुद्धीवाद्यांचा गोंधळ होतो व ते भरकटून जातात, म्हणून कांहीं खरे ज्ञानी ह्या विषयावर मौन पाळतात. बुद्धीवाद्याना जे समजावयाचे ते त्याना समजू द्या असा ते आग्रह करतात.

मोक्ष धर्म पर्व भाग सहासष्ठावा संपला.

# मोक्ष धर्म पर्व

## भाग सदुसष्ठावा

व्यास पुढे सांगतात शुकाला, माझ्या गुणी मुला, सांख्य तत्त्वज्ञानाच्या विचारधारेनुसार जे योग्य आहे ते सगळे मी तुला सांगितले आहे. आता मी तुला योग मार्गाने तेंच कसे साध्य करावयाचे त्याची माहिती सांगणार आहे. बुद्धी आणि मन ह्यांच्या एकत्रित वापराने तसेंच इंद्रियांचा (शरीराचा) उपयोग करून जगाचे ज्ञान गुरूच्या सहाय्याने जो उत्तम ध्यानसाधना करतो मिळवावयाचे असते, त्यासाठी योगाच्या साधनेतील त्या पांच (इच्छा, क्रोध, मोह, भय आणि आळस) अडचणींवर मात करावयाची असते. तेव्हां ते विलक्षण ज्ञान प्राप्त होते. त्या योगसाधनेत क्रोध शांतवृत्ती ठेवण्याची सवय करून साध्य होतो, इच्छा औदासिन्याच्या धोरणांने साध्य होते, इंद्रियांच्या संयमाने आळस आणि भय, मोह आवरता येतात. ते गुरूच्या मार्गदर्शना खाली साध्य करता येते. त्यासाठी विविध योगिक आसनांचा उपयोग होत असतो. सावकाशपणे इंद्रियांचे संयमन करून मोठ्या धीराने त्याला त्याच्या पाप वासनांचे नियंत्रण करावे लागते. त्यासाठी मन आणि बुद्धीचे नियंत्रण त्याला गुरूच्या मार्गदर्शना खाली करावे लागते. हातापायांचे नियंत्रण नजरेने करावे लागते, नजरेचे मनाने करावे लागते, मनाचे नियंत्रण वागणूकीच्या संयमाने करावयाचे असते त्यासाठी औदासिन्य धोरणात असले पाहिजे. त्यासाठी तशात तयार झालेल्यांचे निरीक्षण करावे लागते व त्यातून शिकावयाचे असते. अनुभवी ब्राह्मणांचे ऐकावे लागते. देवतांचे स्मरण करावयाचे असते ज्यामुळे त्यांची मदत मिळते. अशुभ गोष्टींपासून दूर रहावयाचे असते. मद, मत्सर ह्यांने प्रेरीत वाचा वापरण्याचा मोह टाळावा लागतो. ब्रह्मावर नितांत श्रद्धा (अंधश्रद्धा) असावी लागते. ध्यान, अभ्यास, मदत करण्याची इच्छा, सत्याची चाड, साधेपणा, क्षमाशिलता, शरीराची शुद्धी, वागणूकीतील शुद्धी, मनाची शुद्धी, असे राखल्याने योग साधना सोपी होते. चांगुलपणा, माणूसकी आणि भूतदया हे समाजात वावरतांना धोरण असावे लागते. अशारितीने स्वताला नियंत्रित करून तो अंतिम ध्येयाकडे पोहोचतो. आपले आहार, विहार आणि आचार चांगले नियंत्रित केलेला तो योगी ध्यान साधनेत रमलेला,

योगासनाने शरीराचे व्यापार संयमित करणारा, ज्याच्या वासना शरीरा पुरत्या मर्यादीत झाल्या आहेत असा तो योगी ब्रह्माकडे जाऊ शकतो. जरी एक इंद्रिय संयमित नसेल तरी त्याची अध्यात्मिक उर्जा गळती लागल्या प्रमाणे नष्ट होते. मनाचे संयमन केल्या नंतर तो त्याची ज्ञानेंद्रिये संयमित करू लागतो. त्यासाठी तो विविध योगिक आसनांचा उपयोग करत असतो. विचारशून्य अवस्थेत रहाण्यामुळे अवकाशातील विचारसागरांतील मोक्याचे (उपयोगाचे) विचार योग्याला सुचू लागतात. त्याला त्यांचा शोध लागतो. ते विचार त्याच्या ज्ञानात भर घालतात. त्याद्वारा तो ब्रह्माचे दर्शन घेऊ लागतो. मौन धारणा करून तो यति पुढची प्रगती करत असतो. रात्रंदिवस त्याची साधना चालू असते. त्याला मिळणार्या विचारसागरातील विचारांमुळें त्याची दृष्टी वृद्धींगत होत असते. सामान्य मनुष्य जसे धनाचा विचार करत असतो तसा हा यति ज्ञानाचा अभ्यास करत असतो त्या विचारसागरातील विचारांच्या मदतीने. त्या अवस्थेत तो विचलित न होता राहिल. त्या समाधीतून तो बाहेर येणार नाही. त्याला कशाचीच गरज नसेल. त्यासाठी असा योगी निवांत जागी रहाणे पसंत करतो. एकाद्या देवतेच्या मंदिरात तो रहाणे पसंत करतो जेथे एकांत आहे. तो कोणाच्याही संपर्कात रहात नाही. त्याला कशाचीच गरज नसेल. त्याच्या साठी सगळ्या चांगल्या वाईट गोष्टी सारख्याच असतील. असा योगी कोणत्याही वर्णाचा असला तरी तो तसाच वागत असतो त्यात स्त्री असो अगर पुरूष असो. अशारितीने प्रगति करणारा योगी ब्रह्माचे दर्शन घेतो अचानकपणे.

भिष्म पुढे सांगतात, व्यासमुनी त्यांच्या मुलाला शुकाला सांगत होते. जे वेदात आधीच दिले आहे. ह्या विश्वाच्या अंतापर्यंत ते योगी ब्रह्मात विलीन झालेले रहातात.

मोक्ष धर्म पर्व भाग सदूसष्ठावा संपला.

# मोक्ष धर्म पर्व

## भाग अडूसष्ठावा

शुक विचारतो, वेदात जे दिले आहे त्याचे दोन अर्थ निघतात. एकदा सांगतात, कर्म करा आणि नंतर सांगतात, कर्म करू नका. मला समजत नाही नेमके काय करावे, साधकांने त्याच्या बुद्धीने ठरवावयाचे कां, केवळ अंधपणे त्यांचे अनुकरण करावे? मला त्यावर तुमचे स्पष्टीकरण समजून घ्यावयाचे आहे. माझ्या मते ह्यात गोंधळ आहे त्याचे निराकरण करावे".

पराशराचा मुलगा, व्यास ह्यांचे उत्तर काय ते भिष्म सांगतो, "दोन मार्ग आहेत एक नश्वर आणि दुसरा अनश्वर, ते त्या योग्याच्या ज्ञानावर अथवा कर्तृत्वावर अवलंबून असते. प्रथम ज्ञानाच्या माध्यमाने जे साध्य होते ते सांगतो. त्या दोन मार्गातील फरक मोठा असतो. दुसरा कर्मावर असतो. एकाला ज्ञानयोग म्हणतात व दुसर्याला कर्मयोग असे म्हणतात. वेदाची सगळी बैठक ह्या दोनांवर असते. कर्म प्रवृत्ती ठरवते. ज्ञानातून निवृत्ती समजते. कर्मयोगाचा संबंध नश्वर गोष्टींशी असतो व ज्ञानयोगाचा संबंध अनश्वरशी असतो. म्हणून जे योगी अनश्वर ज्ञानाच्या मागे असतात ते विरक्त जीवन जगणे पसंत करतात. कर्मयोगाने तो कधीच पूर्ण ज्ञानी होत नाही. तरी कांहीं अपूर्ण ज्ञान असलेले कर्मयोगाची वहाव्वा करत असतात. कर्मयोगी त्यांच्या कर्माच्या पूर्ततेसाठी पुन्हा पुन्हा जन्म घेत रहातात. शरीराच्या संवर्धनासाठी कर्मयोग जरूरीचा असला म्हणून त्याचे महत्व फाजिल वाढवणे ज्ञानाच्या मार्गात अडचण होत असते. कर्मयोगाने सुख आणि दुःख प्राप्त होत असतात. ज्ञानाच्या प्राप्तीने तो योगी सुख आणि दुःखाच्या पलिकडे गेलेला असतो. सुख आणि दुःख ह्यात जो अडकतो तो जन्म मरणाच्या चक्रात अडकत असतो. ज्याला सुख आवश्यक वाटत नाही तो दुःखाचा विचार करत नाही. ज्ञानमार्गी सगळ्या अनुभवांना समान दृष्टीने पहात असतो. त्याला औदासिन्य असें म्हणतात. ज्ञानाच्या मार्गाने जाणारा व कर्मयोगी ह्यांच्या व्यवहारात त्यामुळें मोठा फरक आढळून येत असतो. कर्मयोगी अपयश आल्याने खच्ची होऊन जातो तसा ज्ञानमार्गी खच्ची होत नाही. यजुर्वेद सांगणारे महान ऋषी याज्ञवल्क्य बृहदारण्यकात सांगतात, कर्मयोगात

असणारा त्याच्या दुसर्या जन्मात आधीच्या कर्माच्या परिणामस्वरुप नवीन देह त्याप्रकारचा धारण करत असतो. त्याच्या त्या आत्म्याला क्षेत्रज्ञ असें म्हणतात. त्याच्या ज्ञानात पुढील कर्माने प्रगती होत असते. त्यावेळी त्याच्या कडे जे माहिती भांडार असते त्यानुसार त्याच्या मनाच्या तीन अवस्था होत असतात. अज्ञानी अवस्था ज्याला तमो अवस्था म्हणतात. गोंधळलेली अवस्था ज्याला रजो अवस्था म्हणतात आणि ज्ञानाची अवस्था ज्याला सत्त्व अवस्था म्हणतात. रजो अवस्थेत तो अज्ञान आणि ज्ञान ह्याच्या मध्ये अडकलेला असतो काय करावे काय न करावे त्याचा त्याला अंदाज करता येत नाही व म्हणून त्याचे मन ज्ञान आणि अज्ञान ह्यामध्ये दोलायमान होत असते. त्यालाच जीवात्मा म्हणतात. तो शरीराचा अव्यक्त भाग असतो. त्याशिवाय अव्यक्त आत्मा तेथे प्रभावळीच्या स्वरुपात वावरत असतो त्या शरीराभोवती तो वेगळा. जीव सगळी शरीराची कर्तव्ये पार पाडत असतो आत्मा त्याचा साक्षिदार असतो. त्या शरीराला क्षेत्र समजले जाते ज्याच्या माध्यमातून कर्मयोग साध्य होत असतो.

मोक्ष धर्म पर्व भाग अडूसष्ठावा संपला.

# मोक्ष धर्म पर्व

## भाग एकोणसत्तरावा

शुक पुढे विचारतो, "आता मला समजले की, दोन प्रकारची निर्मिती आहे ह्या सृष्टीमध्ये, एक नश्वरातून (अविद्येतून अथवा मायेतून) होते व दुसरी परमात्म्यातून होते ज्यात आत्मा असतो. दुसरे पहिल्यापेक्षा श्रेष्ठ असते. दुसर्याला पहिल्याचे ज्ञान होणे आवश्यक असते. परंतु, मला समजले नाही चांगुलपणा, माणूसकी आणि भूतदया हे त्यात कसे मदत करतात. वेदात कर्म करा आणि कर्म करू नका असे दोनही सांगितले आहे त्यामुळे माझा गोंधळ उडाला आहे. मला ते नीटपणे समजावून सांगा. कारण त्या त्रयीच्या आचरणाने माझे चित्त शुद्ध झाल्यानंतर मला माझा आत्मा पहावयास मिळणार आहे ते कसे ते सांगा".

व्यास सांगतात, "ब्रह्माने ती त्रयी सांगितली आहे. त्याचे समर्थन अनेक ऋषींनी वेळोवेळी केले आहे. ज्यांनी ब्रह्मचर्य व्रताने त्यांच्या सगळ्या वासनांचे शमन केले होते. मिताहार करून व वनात राहून ते तपस्या करत होते. अरण्यात रहाणार्या वनवासींच्या कडे भिक मागून ते त्यांचा उदरनिर्वाह करत असतं".

शुक विचारतो, "वेदांत अशी गोंधळ घालणारी विधान असतील तर त्याला धर्म शास्त्र कसे मानावे"? करा आणि करू नका अशी बुद्धीभेद करणारी विधान तत्त्वज्ञानाचा भाग कसी ठरतात. त्यातील गोंधळाचे तुम्ही निराकरण करावे".

भिष्म पुढे सांगतात की, शुकाचे ते प्रश्न ऐकून व्यास संतुष्ट झाल्यासारखे आनंदी दिसतात. ते त्याच्या प्रश्नाचे कौतुक करतात. पुढे व्यास सांगतात, समाजात ब्रह्मचर्य पालन करणारे, गृहस्थी, वानप्रस्थी आणि संन्याशी असे चार प्रकारचे जीवन जगणारे लोक असतात. त्यांच्यासाठी वेगवेगळे कर्म सांगितले आहे. कांहीं ते करण्यासाठी व इतर कांहीं ते न करण्यासाठी असा त्याचा अर्थ आहे. निरनिराळ्या आश्रमात रहाणारे त्यांचे कर्माचे व योगाचे नियम भिन्न असतात. त्याप्रमाणे ते सांगितले आहे. ज्याला ते करावयाचे त्याच्या आश्रमानुसार त्याने ते करावे असा त्याचा अर्थ आहे. त्या सगळ्यांसाठी एकच मार्ग उचित नसतो त्याप्रमाणे ते समजून करावयाचे असा त्याचा अर्थ

आहे. ब्रह्मचर्याश्रमात तो शिक्षकाची सेवा करून त्याचे शिक्षण पुरे करेल. त्यानंतर तो शिक्षकाच्या परवानगीने त्याच्या घरी जाऊन त्याचा गृहस्थाश्रम प्रारंभ करतो. त्यामध्ये तो राहून वंश वाढवण्याचे व समाजाचे ऋण फोडण्याचे कार्य त्रयीच्या (चांगुलपणा, माणूसकी व भूतदया) आचरण्याने व कर्मयोगाच्या माध्यमातून पूर्ण करतो.

मोक्ष धर्म पर्व भाग एकोणसत्तरावा संपला.

# मोक्ष धर्म पर्व

## भाग सत्तरावा

व्यास पुढे सांगतात, गृहस्थाश्रमीला जाणकारांनी चार गोष्टी करण्याचे पर्याय सांगितले आहेत. पहिला पर्याय घरच्च्यासाठी धान्याचा व इतर संसारी गोष्टींचा साठा करून ठेवणे जो तीन वर्षे पुरेल. दुसरा पर्याय असा, फक्त एक वर्षाचा साठा करावा, तिसरा पर्याय आहे फक्त त्या दिवसापुरता विचार करावा आणि चौथा पर्याय असा सांगितला आहे कीं, (ब्राह्मण) गृहस्थाने शेतात जाऊन जमिनीवर पडलेले धान्य जसे कबुतर वेचून खाते तसे गोळा करावे व ते खावे. त्याचप्रमाणे शास्त्र आणखीन सांगते कीं, पहिला पर्याय आचरणारा सहा प्रकारचे उपक्रम करील त्यात यज्ञ करणे, दानं करणे, शिकवण्या करणे, विद्याभ्यास करणे, दानं स्वीकारणे, पौरोहित्य करणे असे असतील. दुसरा पर्याय आचरणारा तीन उपक्रम करील त्यात, शिकणे शिकवणे, दान करणे व दानं घेणे असतील. तिसरा पर्याय आचरणारा फक्त दोन उपक्रम करील त्यात असतील शिकवणे शिकणे आणि दानं घेणे असेल, चौथा पर्याय आचरणारा फक्त वेदाचा अभ्यास करत असेल. त्या सगळ्या कामाचे फार महत्व आहे, कारण त्याप्रमाणे जगणार्यांचा समाजात मान केला जातो. राजा त्यांचे आदरतीथ्य करतो. गृहस्थ केवळ त्याच्च्यासाठी शिजवणार नाही, तो त्याच्याकडे येणार्या अतिथींना, त्याच्या नोकरांना त्याच्याकडे असलेल्या पशुंना सुद्धा खाण्यासाठी देईल व त्याचे झाल्यावर मगच स्वतः जेवण करील. खाण्यासाठी पशु मारतांना त्याचे प्रथम देवतेला दान करील व त्या देवतेचा (कुलस्वामिनीचा) प्रसाद म्हणून तो ते खाण्यासाठी घेईल. अशारितीने दान केलेला पशु त्याच्या पुढच्या जन्मात उत्कर्ष पावतो असे समजले जाते. तसा पशु वयांने मोठा ज्यांने त्याचे जीवन पूर्ण जगले आहे असा असेल. लहान, तरूण, गर्भवती मादी, जिच्या पाडसांना तिची अजून गरज आहे अशा माद्या देवतेला दान करता येत नाहीत. सूर्य आकाशात तळपत आहे तोवर गृहस्थ अंथरुणावर निजणार नाही. तो फक्त दोनदा खाणे करेल. मधल्या काळात तो उपवास करील ज्यामुळे त्याला पुण्य प्राप्त होते. तो केवळ त्याच्या धर्मसंमत पत्नीशी संभोग करील जेव्हां तिला पाहिजे असेल. तो इतर

स्त्रीयांमध्ये माता, भगिनी अथवा कन्या पाहिल अशा गृहस्थ ब्रह्मचारी समजला जातो. खाण्यासाठी पशूचे दान करणारा, वेदशास्त्रसंपन्न, व्रतस्थ जीवन जगणारा, उच्च कुलीन, त्याच्या वर्णाचे कर्तव्य पार पाडणारा, संयमी, तपस्वी अशा अतिथीचे गृहस्थाने स्वागत करावे. शास्त्र सांगते कीं, पितर, देवता ह्यांना दिलेले शिधा अशा पाहुण्याना खाण्यासाठी द्यावे. गृहस्थ त्याच्याकडे याचना करणार्या सर्वांना आदरपूर्वक खाण्यासाठी देईल जरी तो शास्त्र मानत नसला, धर्म मानत नसला, यज्ञ करत नसला, त्याच्या वर्णाचे कर्तव्य करत नसला, त्याने त्याचे शिक्षण मध्येच सोडले असेल, ज्याने त्याची नख वाढवली आहेत, जटा धारण केल्या आहेत, जो सन्यासी अथवा बैरागी असेल, असे करण्याने पितरांची पुजा केल्याचे पुण्य त्याला प्राप्त होत असते. देवाला दिलेला प्रसाद आणि मध असे करून तो ते ग्रहण करील त्याला विघास असें म्हणतात. सर्वांना खाऊ घातल्यानंतर तो विघास खाईल. गृहस्थ त्याच्या पुरोहितांशी भांडणार नाही. तो आप्तांतील सगळे मतभेद सामोपचाराने सोडवण्याचा प्रयत्न करील. कुटूंबातील वाद सामोपचाराने जो सोडवू शकतो तो स्वर्गात जातो. गृहस्थ धनाच्या लोभाने कोणतेही अपकृत्य करणार नाही. अशी कर्तव्ये गृहस्थाला सांगितली आहेत.

चार आश्रमात गृहस्थाश्रम ब्रह्मचर्याश्रमा पेक्षा श्रेष्ठ समजला जातो. वानप्रस्थाश्रम गृहस्थाश्रमा पेक्षा श्रेष्ठ समजला जातो. संन्यासाश्रम वानप्रस्थाश्रमा पेक्षा उच्च समजला जातो. ज्याला त्याचा उद्धार करावयाचा आहे तो त्यांचे योग्य आचरण करील. ज्या राज्यात असे गृहस्थ रहातात ते उत्कर्षाकडे जाते. अशारितीने जगणार्याच्या आधीच्या व नंतरच्या दहा पिढ्यांचा उद्धार होतो. जो इसम गृहस्थाश्रम यशस्वी करतो त्याला स्वर्ग प्राप्त होतो. वानप्रस्थाश्रमींना जे कठोर तपस्या करतात त्यांना काय प्राप्त होते ते सांगतो.

मोक्ष धर्म पर्व भाग सत्तरावा संपला.

## मोक्ष धर्म पर्व

## भाग एकाहत्तरावा

भिष्म सांगतात, गृहस्थांची कर्तव्ये सांगितली जी व्यासांनी शुकाला सांगितली होती. आता ते सांगतात नंतरच्या म्हणजे वानप्रस्थाश्रमाच्या माणसाची कर्तव्ये कोणती. पुत्र मोठे झाले व त्यांना मुलं झाली कीं, ह्या आश्रमाकडे जाण्याची प्रथा होती. त्यामध्ये तो त्याच्या पत्नीसह वनात जाऊन ऋषींच्या आश्रमात रहात असतं. तसेंच तीर्थक्षेत्री जातात. सर्व भोगांचा त्याग मनापासून तो करतो त्यात त्याची सहधर्मचारीणी मदत करत असते. त्यांची कर्तव्ये सांगतो. संसाराचा तो त्याच्या पत्नीसह त्याग करतो परंतु, जर त्याची पत्नी मुलाबरोबर रहाणे पसंत करत असेल तर तो एकटांच त्याचे घर सोडून वनात काटक्यांचे झोपडे बांधून राहू लागतो. तेथे ते त्याचा अग्नी सांभाळत असतो. त्याशिवाय कांहीं गुरं सांभाळत असतो. ध्यानसाधना करत रहातो. त्याशिवाय तेथे असलेल्या ऋषींच्या बरोबर वार्तालाप करत आपला समय व्यतित करत असतो. कमी खाणे, जपजाप करणे असें त्याचे दैनंदीन जीवन असते. तेथे तो त्याचे धान्य स्वतः पिकवत असतो. जे जास्त होईल ते तो दान करत असतो. अतिथींची सेवा केल्यानंतर तो त्याचे जेवण करतो. तो विविध प्रकारचे यज्ञ करतो. त्याचा सर्व काळ असा अध्यात्मिक योगांसाठी तो खर्च करत असतो. त्यामध्ये कठोर अनुष्ठान तो करतो. उपास तपास तो करतो व त्याच्या शरीराला शिस्त लावतो. खाण्या पिण्याबाबत ते विशेष काळजी करत नाहीत जे मिळेल ते खाणे असे असते. जीवंत रहाण्यापुरते खाणे व पिणे असा त्यांचा उद्देश असतो. ते खाद्य शिजवण्यात त्यांचा समय खर्च करत नाहीत. त्यामुळे खाद्य फुलं कंदमुळं, फळं असा त्यांचा आहार असतो. त्यानंतर संन्यासाचा विचार करावा लागेल. उपनिषदाप्रमाणे त्यासाठी जे करण्याचे सांगितले आहे ते करावे लागते. ह्या युगातील अनेक ऋषीनी त्याचे पालन केले आहे. त्यामध्ये अगस्त्य, अत्री, अंगिरस, पुलस्त्य, पुलह, वसिष्ठ, नारद, क्रातू, मधूचंद, अघमर्श, संकृती, सुदीवतंदी, अहोवीर्य, कव्य, तंद्य, मेधातिथी, कर्मनिर्वक, शून्यपाद अशा महान ऋषींनी त्या चौथ्या आश्रमातील कर्तव्ये कोणती ती सांगितली आहेत. ते

स्वतः त्यांचे पालन करत असतं. ते सगळे त्यानंतर स्वर्गात गेले आहेत. त्यात ययवरस ह्यांची तपस्या विशेष वाखाणण्या सारखी होती. त्यामध्ये अनेक ब्राह्मण आहेत जे त्याप्रकारे संन्यासाश्रमाची कर्तव्ये पार पाडत होते. त्यांची नांवे असंख्य आहेत म्हणून ती मी देत नाही. त्यातील वैखना, वालखिल्य, शैकत ह्यांची तपस्या विलक्षण होती. घोर तपस्या करणे, ध्यानस्थ रहाणे, मौनव्रत, मिताहार अशी त्यांची संन्यासाश्रमाप्रती कर्तव्ये होती. त्याच्या देहाला कसल्याच वासना उरलेल्या नव्हत्या त्यामुळे त्यांच्या संयमाची गरजच नसे. ते सर्व प्रकारच्या वासनांपासून स्वाभाविकपणे मुक्त होते. अखेरीस जसे आयुष्य संपण्याचा काळ येतो व मनुष्य अपंग, वृद्ध होतो त्यांने देहाचा त्याग करावयाची वेळ येते, तो वनातून रहाणे बंद करतो. तो एकदिवसाचा यज्ञ करतो त्यात जे त्याच्याकडे उरलेले आहे ते तो दक्षिणा म्हणून दान करतो. त्यात तो स्वताचे श्राद्ध उरकतो. सगळ्या तपस्या सोडून तो त्याच्या विकलांग देहाची काळजी घेण्याचे ठरवतो, त्यात त्याला त्याचे सहचारी मदत करत असतात जे अजून त्या अवस्थेत गेलेले नाहीत. तो ध्यान करत मृत्यूची वाट पहात रहातो. जे मिळेल ते तो खात असतो. कोणतीही तक्रार न करता तो समाधानाने त्याचे उरलेले दिवस कंठत असतो. यजुर्वेदातील यजूंचे तो स्मरण करत असतो. तो त्याची दाढी, मिशा व इतर केस काढून टाकतो. असे संयमित जीवन जगलेला तो संन्याशी अखेर मृत्यू स्वीकारतो. त्या संयमित जीवनामुळें त्याचे पाप भोग संपलेले असतात असें समजले जाते. त्याला कसल्याच वासना उरलेल्या नसतात. तो मोक्षाजवळ पोहोचतो. त्या संन्यस्त जीवनात तो यमात (*यमत्रयी, चांगुलपणा, माणूसकी व भूतदया*) दिलेली कामं करत नसतो. त्याप्रमाणे नियमाचे (*ब्रह्मचर्य, ध्यान साधना, वेदांचा अभ्यास, वैराग्य*) सुद्धा त्याला बंधन उरत नाही. तो कोणत्याही वर्णात (*चार वर्ण मनुष्य समाजात रहात असल्याने त्याच्या व्यवस्थापनेसाठी सांगितले आहेत. असा संन्यासी समाजाचा सदस्य राहात नाही म्हणून त्याला वर्णव्यवस्थेचे बंधन नसते.*) रहात नाही. म्हणून तो त्याचे जान्हवे फेकून देतो. कोणत्याही वर्णाचे चिन्ह तो त्याच्या शरीरावर धारण करत नाही. त्यानंतरचे त्याचे कार्य काय असू शकते ते मी आता तुला सांगणार आहे.

मोक्ष धर्म पर्व भाग एकाहत्तरावा संपला.

# मोक्ष धर्म पर्व

## भाग बाहत्तरावा

शुक व्यासांना विचारतो, संन्याशी त्याच्या कुवतीनुसार सगळी कर्तव्ये पार पाडत असतांना योगाचा अभ्यास कसा करतो ते सांगा.

व्यास सांगतात, ब्रह्मचर्य आणि गृहस्थाश्रमात राहून तो त्याच चित्त शुद्ध करतो त्यानंतर तो वानप्रस्थाश्रमात योगाचा अभ्यास करू लागतो. ब्रह्मावर ध्यान करू लागतो. मनातील सगळे दोष त्यामुळें तो काढून टाकतो. त्याच्या शरीराच्या गरजा किमान पातळीवर आलेल्या असतात. अशा अवस्थेत तो सन्यासाश्रमासाठी योग्य झालेला असतो. त्याला कोणाच्या सोबतीची गरज रहात नाही. तो एकटा त्याचे जीवन कंठू लागतो. त्याला फक्त ब्रह्माचा ध्यास लागलेला असतो. बाकी कशाचीच त्याला आस रहात नाही. तो एकांत पसंत करतो. कोणी केलेल्या टीका स्तुतीचे त्याला भान रहात नाही. तो सदैव शांत असतो. ही त्या सन्यस्थ अवस्थेत असलेल्याची लक्षणं असतात. त्याच्या भोवतीच्या जगाशी त्याचा कसलाच संबंध नसतो, जरी तो त्या ठिकाणी वावरत असतो. त्याचे वागणे औदासिन्य पूर्णतेचे असते. त्याचा सगळा काळ ध्यान साधनेत (विपाशना) व्यतीत होत असतो. ज्याला कसलेच बंधन राहीलेले नसते, जो पूर्णपणे निर्भय अवस्थेत गेलेला असतो त्याला मृत्यूचे सुद्धा भय रहात नाही. तो कोणावर प्रेम दाखवत नाही आणि रागसुद्धा दाखवत नाही. कोणाच्या कसल्याही वागण्यावर तो त्याची प्रतिक्रिया देत नाही. कारण त्याचा त्या गोष्टींशी काहीं संबंध नसतो. त्याच्यासाठी राव आणि रंक एकसमान असतात. कोणाच्या सुखाने तो आनंदी होत नाही व दुःखाने कष्टीसुद्धा होत नाही. त्याचे असे वागणे वासनामय जीवन जगणार्यां सामान्य लोकांना घाबरवत असते. त्याना त्याच्या वागण्याचा अर्थ समजत नाही. अशा विरक्त सन्याशाची जे सेवा करतात (न सांगता) त्यांना मोठे पुण्य प्राप्त होत असते. म्हणून ब्रह्मचार्यानी व गृहस्थानी त्यांची सेवा करावयाची असते. खरोखर अशा अवस्थेत असलेल्याकडे लोकपाल देवता (इंद्र, वरुण, कुबेर, वायू, अग्नी आणि यम) लक्ष देऊन असतात. योग्य समयी त्यातील यम त्याला घेऊन जातो त्याच्या निजधामाला.

त्याचे कल्याण होते. तो खर्या अर्थाने ब्राह्मण झालेला असतो जरी तो जन्माने कोणीही असो. देवता त्याला कौतुकाने पहात असतात. असा संन्यासी मोक्षाजवळ गेलेला आहे असे समजावे. त्याकरता अरे शुका हा संन्यासाश्रम सगळ्यात श्रेष्ठ समजला गेला आहे. त्याला कांहीं हवे अथवा नको असें नसते.

मोक्ष धर्म पर्व भाग बाहत्तरावा संपला.

# मोक्ष धर्म पर्व

## भाग त्र्याहत्तरावा

व्यास पुढे सांगतात, जीवात प्रकृती असते. तिचे सगळे गुण त्यात असतात. तो शरीराचा कार्यकारी भाग असतो व आत्म्याचे व्यक्त रुप असतो. त्याला प्रकृतीची बंघन लागू असतात. तो शरीराच्या इंद्रियांचा वापर करून त्याचे कार्य करत असतो. त्याला मन आणि बुद्धी मदत करत असतात. त्याची सगळी हालचाल प्रकृतीच्या नियमानुसार होत असते. जी ब्रह्माकडून आज्ञा घेत असते. ब्रह्मपेक्षा मोठे कोणीही नाही. फक्त योगी ज्यांनी ध्यान साधना योग्य प्रकारे केली आहे तोंच त्याचा अंदाज करू शकतो. त्यासाठी स्वतः मधील ब्रह्माला स्मरून तो त्याच्या सगळ्या भोग इंद्रियांचे संयमन करून मनाला शांत राखून तो साधना करत असतो. परंतु, जो त्याच्या भोग इंद्रियाच्या पाशात अडकण्यात धन्यता मानतो तो नष्ट होतो. त्याच्या भोगाची निरर्थकता जो समजतो व त्याच्या जीवाला आत्म्यात सामावण्याचा प्रयत्न करतो तो खरी प्रगती करत असतो. असा योगी चांगुलपणाच्याही पलिकडे जाऊन चिरंतन आनंदाचा अनुभव घेत असतो. योग्याचे लक्षण असे आहे की, तो सुशुप्तीमध्ये जातो जेव्हा तो झोपतो. त्याचा जीव त्याच्या आत्म्यात एकरुप झालेला असतो. ह्यातच सगळा वेदाचा सार आहे हे तू लक्षात घे माझ्या मुला. केवळ वेदाचा अभ्यास करून ते साध्य होत नाही. त्यासाठी संयमाची तपस्या असलेली साधना करावी लागते. ह्याबद्दलच्या सुचना असलेले शेकडो कवनं असलेले साहित्य वेदात दिले आहे ज्याच्या मदतीने स्नातक त्यांची तयारी करत असतात. ज्याच्या मनाची तयारी नाही त्याला ते कांहीं उपयोगाचे नसते. अशा अयोग्य माणसास ते सांगू सुद्धा नये असे सांगितले आहे. ज्याच्या मनात ह्या विषयाबद्दल शंका कुशंका आहेत त्याला सुद्धा ते सांगू नये. जो पापमय जीवन जगत आहे, जो वासनांत अडकण्यात धन्यता मानतो, ज्याला वैराग्याबद्दल घृणा आहे, ज्याचे मन अशांत असते, जो रजोगुणी अथवा तमोगुणी आहे, अशांना ते सांगू नयेत. ज्याची अपरंपार श्रद्धा आहे वेदाबद्दल, कारण त्यातील ज्ञान अमुल्य आहे त्याला वेद शिकवावेत. ह्यापुढे मी तुला त्यातील रहस्य समजावून सांगणार आहे. त्याचा संबंध आत्म्याशी आहे.

आत्म्याचे ज्ञान सामान्य जनांच्या कल्पनासामर्थ्याच्या आवाक्यात येत नाही. ते सांगण्यात ऋषींना फार कष्ट होतात. ते उपनिषदांतून दिले आहे. तो विषय तुझ्या अभ्यासाचा आहे. ते सांगितल्यानंतर आणखीन काय तुला माझ्याकडून ऐकावयाचे आहे ते सांग. तुला कांहीं शंका असतील तर त्या मला खुल्या मनाने विचार, मी त्याचे निराकरण करून ते समजावून सांगेन.

मोक्ष धर्म पर्व भाग त्र्याहत्तरावा संपला.

# मोक्ष धर्म पर्व
## भाग चौर्याहत्तरावा

शुक विचारतो, "अहो तात मला ते सगळे सांगा जे महान ऋषीनी अध्यात्म विद्येत सांगितले आहे. मला सांगा अध्यात्म म्हणजे काय"?

व्यास सांगतात, "माणसाच्या संदर्भात अध्यात्म म्हणजे काय ते सांगतो. पंचमहाभूत सगळ्या सृष्टीच्या रचनेचे आधार आहेत. त्यातून सगळे चर आणि अचर तयार झाले आहेत. त्या पंचमहाभूतांच्या विविध रचनांतून ह्या सृष्टीचे द्वैत तयार झाले आहे".

शुक विचारतो, "त्या पंचमहाभूतांचे निरनिराळ्या प्रमाणात मिश्रण कां झाले आहे? त्यात गुण कसे वाटले गेले आहेत आणि वस्तुमात्र कसे? त्यातील वस्तुमात्र व्यक्त स्वरुपातील असतात व गुण अव्यक्त स्वरुपात असतात हे मला ठाऊक आहे".

व्यास सांगतात, "ते सगळे मी तुला समजावून देतो त्यासाठी तू तुझे सगळे लक्ष माझ्या सांगण्याकडे ठेव. शरीरातील सगळ्या पोकळ्या आणि ध्वनि हे आकाश तत्त्वात आहेत. श्वास, सगळ्या अवयवांचे हालचाल वायू तत्त्वात येतात. डोळे आणि पहाणे प्रकाश तत्त्वात आहेत. रुची, जिभ, रक्त, पित्त, कफ हे जल तत्वात आहेत. गंध, नाक, त्वचा, इतर अवयव हे पृथ्वी तत्त्वात आहेत. अशारितीने ती पंचमहाभूतात असतात. मन, बुद्धी आणि स्वभाव हे गतजन्माच्या कर्मामुळे उत्पन्न होत असतात. त्यांचे स्थान वस्तुमात्र घटकांच्या पेक्षा वरचे असते. पंचमहाभूतांनी बनलेले त्यांच्या नियंत्रणात असतात. त्यावर मन आणि बुद्धी ताबा ठेवत असतात. माणसात सहा वस्तुमात्रात इंद्रीय आहेत त्यावर मन हे सातवे अव्यक्त इंद्रीय काम करत असते. मनाचे कार्य कल्पना रम्य अथवा भावनांवर आधारीत असते आणि बुद्धीचे कार्य तर्कशुद्ध असते हा त्यांच्या दोघांच्या काम करण्याच्या पद्धतीतील फरक असतो. त्या सगळ्याच्या वर असतो आत्मा. त्याला आठवे इंद्रीय म्हणून कांहीं ऋषी मानतात. ज्ञानेंद्रियांच्या आकलनाचा अर्थ काढण्याचे काम मन आणि बुद्धी त्यांच्या प्रवृत्तीनुसार करत असतात. त्याप्रमाणे माणसाला जगाचे आकलन होत असते. त्या सगळ्या व्यवहारावर आत्मा फक्त एकाद्या निरिक्षका सारखा लक्ष देत असतो. आत्मा त्या दोघांच्या कामात ढवळाढवळ करत नाही. हे सगळे ज्या मुलभूत अध्यात्मिक उर्जेच्या

माध्यमातून होत असते त्याच्या विविध तीव्रतेच्या अवस्था आपल्याला पहाव्या लागतात. तीव्रता उच्च असते तेव्हां त्या अवस्थेला सात्त्विक अवस्था समजले जाते. तीव्रता सामान्य असेल तर रजोगुण अवस्था समजली जाते. जर त्यापेक्षा कमी असेल तर ती तमोगुण अवस्था समजली जाते. अशा तीन अवस्था सगळ्या चराचरांत असतात. ब्रह्माची अध्यात्मिक अवस्था अति उच्च समजली जाते. आनंद, मनाची शांती, समाधान ही सात्त्विकतेची लक्षणं समजली जातात. गर्व, अहंकार, लोभीपणा, आसुया ही रजोगुणाची असतात. मनाचा गोंधळ, मनाची अशांतता, अस्थीरता, आळस, बेपर्वाई अशी तमोगुणाची लक्षणं असतात.

मोक्ष धर्म पर्व भाग चौर्याहत्तरावा संपला.

# मोक्ष धर्म पर्व

## भाग पंच्याहत्तरावा

व्यास पुढे सांगत असतात, मनाची कल्पनाशक्ती विलक्षण असते. त्यामुळे ते विविध काल्पनिक विचार रंगवत असते. त्यावर बुद्धी त्याचे मत मांडत कोणते योग्य व कां त्याचे विश्लेषण करत असते. भावनांचा त्यात गोंधळ चालूच असतो. त्यानंतर जे ठरते त्याप्रमाणे जीव काम करतो. बुद्धी मनापेक्षा श्रेष्ठ असते म्हणून त्याप्रमाणे गोष्टी होत असतात. तरी मनाचे खेळ चालूच असतात. त्याचवेळी बुद्धी तिचे कार्य विविध ज्ञानेंद्रीयांच्या माध्यमाने करत असते. त्या विविध कामांसाठी जी अध्यात्मिक उर्जा लागते ती आत्मा पुरवत असतो. त्यामुळे त्याची अध्यात्मिक क्षमता कमी होत असते. ती भरून काढण्यासाठी माणसाने अध्यात्म साधना करावयाची असते आणि जर ती नाही केली तर माणसाची सात्त्विकता कमी होऊन तो रजोगुणी अथवा तमोगुणी होत जातो. केवळ शरीराचे कार्य चालू ठेवण्यासाठी सुद्धा मोठ्या प्रमाणात अध्यात्मिक उर्जा खर्च होत असते. जो त्याची अध्यात्मिक साधना सातत्याने करत असतो तो अध्यात्मिक दृष्ट्या संपन्न होतो. म्हणून माणसाने अध्यात्म साधना ज्यात ब्रह्मचर्य पलन, चांगुलपणा, माणूसकी व भूतदया ह्या त्रयी, पवित्र जीवन, ध्यान साधना ज्यात विपाशना महत्वाची असते असे सगळे करत रहावयाचे असते. म्हणजे अरे शुका, माणसासाठी अध्यात्म साधना केवळ मोक्षासाठी पाहिजे असे नाही तर साधे मानवी जीवन जगण्यासाठी सुद्धा आवश्यक असते. जेव्हां बुद्धी कांहीं मागते तेव्हां ती गोष्ट मनाला समजते. त्यानंतर ती जीवाला करावी लागते. त्यात मन, बुद्धी आणि सद्‌प्रवृत्ती असें सगळे काम करत असतात. सद्‌प्रवृत्ती आत्म्याचे अंग असते. अशारितीने आपले देहाचे कार्य होत असते ते योग्याला समजले कीं, त्याची अध्यात्मिक साधना चांगली जोर धरते. जशी अध्यात्मिक उर्जा वाढत असते तो मनुष्य तमो अवस्थेतून रजो आणि नंतर सात्त्विक अवस्थेत जातो. त्याची जगाकडे पहाण्याची दृष्टी सुधारते. तो सुख दुःखाच्या भोवर्यात अडकत नाही. क्रोध, लोभ, मोह, मद आणि मत्सर हे दोष त्याला बाधत नाहीत. त्याला अव्यक्त आत्मा जाणवू लागतो प्रचितीमुळें. तो अनुभव शब्दाने सांगता येणारा

नाही. ज्याच्या त्याच्या कल्पने प्रमाणे त्याला तो भासतो. त्यामुळें आत्म्याचे कोणी निश्चित वर्णन करू शकत नाही. जो योगी अशा अवस्थेत गेला त्याला ते गुण (सत्त्व, रज आणि तम) बाधत नाहीत. व्यवहारिक जीवनात सात्त्विक मनुष्य कधी रजो किंवा तमो गुणी असा वागत असतो परंतु, ते त्याला बाधत नाहीत. जसे पाण्यावर तरंगणार्या बदकाला पाण्याचा स्पर्श होत नाही. माणसातील सत्त्वगुण त्याच्या अध्यात्मिक उच्चतेचे लक्षण असते. परंतु, तो सत्त्व गुण म्हणजे आत्मा नाही ते दोन वेगळे असतात. जसें मासा व पाणी दोन वेगळे असले तरी ते दोन नेहमी एकत्र असतात तसेंच आत्मा आणि सत्त्व गुण नेहमी एकत्र असतात.

मोक्ष धर्म पर्व भाग पंच्याहत्तरावा संपला.

# मोक्ष धर्म पर्व

## भाग श्याहत्तरावा

व्यास पुढे बोलतात, बुद्धीच्या समजूतीनुसार आपले आपल्या भोवतीच्या गोष्टींचे ज्ञान होत असते. आत्मा त्यात भाग घेत नसतो. जगाची जी माहिती आपल्याला होते त्यात आपल्या कल्पना विश्वाचा मोठा भाग असतो. ज्या कांहीं गोष्टी जीवनात घडतात त्यात तीन घटक असतात. आत्मा, मन आणि बुद्धी. त्यासाठी आत्मा अध्यात्मिक उर्जा पुरवत असतो व त्या नुसार त्याचा हातभार त्यात असतो. त्या कल्पना ज्यांच्या मदतीने जगाची माहिती त्याला मिळते त्या त्या माणसाच्या असता. निरनिराळी माणसें तेंच निरनिराळ्या प्रकारे समजू शकतात. म्हणून एकच सत्य अनेक प्रकारे पाहिले जात असते. जेव्हां त्याबद्दल बोलले जाते त्यांच्यातील फरकामुळे ते अनेक आहेत असा गैरसमज होत असतो. म्हणून त्या मार्गाने जे ज्ञान मिळते ते सापेक्ष असते. त्यासाठी त्या भेदामुळें बावचळून न जाता धीराने ते समजून घ्यावयाचे असते. त्याप्रमाणे तो सृष्टीचे ज्ञान प्राप्त करत असतो. त्या ज्ञानाच्या मदतीने तो मोक्षापर्यंत जाऊ शकतो. ते ज्ञान ज्याला झाले त्याला अभय प्राप्त होते. असा योगी ऐहिक सुखात रमत नाही. त्याला त्याची गरज रहात नाही. ज्याला ते ज्ञान झाले नाही असें सुख दुःखाच्या भोवर्यात अडकून जन्म मरणाच्या गर्तेत फसतात. कोणतीही अपेक्षा न ठेवता जो सत्कर्म करतो त्याच्या आधीच्या जन्माची पाप धुतली जातात. त्याची अध्यात्मिक उर्जा वृद्धींगत होत जाते.

मोक्ष धर्म पर्व भाग श्याहत्तरावा संपला.

# मोक्ष धर्म पर्व

## भाग सत्याहत्तरावा

शुक विचारतो, "अहो तात मला सांगा कोणते कर्तव्य सर्वश्रेष्ठ असते कीं, त्याच्यापेक्षा उच्च असे कोणतेही कर्तव्य नाही ह्या जगात"?
व्यास सांगतात, "अति प्राचीन काळापासून मान्यता असलेल्या तीन कर्तव्यांची माहिती मी तुला सांगतो. ती ज्ञानी ऋषींनी सांगितलेली आहेत ते एकचित्ताने ऐक". माणसाने त्याच्या शरीराच्या वासनांत कमीत कमी गुंतून रहावे असें एक कर्तव्य सांगितले आहे. जसे मोठा मनुष्य लहान मुलाला प्रेमांने नियंत्रित करतो तसे त्याने त्याच्या इंद्रियांना नियंत्रित करावे. तो एक तपस्येचा भाग आहे. ती तपस्या सर्वात उच्च दर्जाची तपस्या म्हणून समजली जाते. जगाच्या विविध व्यवहारात कमीत कमी गुंतणे हे आणखीन एक महत्वाचे तप आहे. ज्यामुळें तो मनुष्य फक्त स्वताच्या संयमित जीवनामध्ये रहातो. अशा वागण्यामुळें तो ब्रह्माच्या जवळ नकळतपणे जात असतो. माणसाचा जीव जो शरीराच्या संवर्धनासाठी कार्यरत असतो कधीच समजत नाही कीं, तो का आला आहे ह्या जगात व केव्हां जाणार आहे. परंतु, देहात असणारा आत्मा मात्र ते सगळे ओळखत असतो. त्या आत्म्याचे दर्शन जीवाला होण्यासाठी जीवाला अंतर्यामी व्हावे लागते. तरीसुद्धा ते ज्ञान त्याला स्वानुभवाने कल्पनेच्या मदतीनेच होत असते. कारण वस्तुनिष्ठ असें आत्म्याचे ज्ञान शक्य नसते. जगाकडे पूर्ण तटस्थाच्या दृष्टीने जो पहातो व त्यातील कांहीं माझे नाही अशी पूर्ण खात्री बाळगून जो जगतो, हे एक उच्च दर्जाचे कर्तव्य समजले जाते, तो नेहमी चिरानंदात असतो. त्याची सगळी पापं नाहीशी होतात व त्यामुळें त्याचा लिंगदेह लहान होतो, त्याचे बंधन त्याला सतावत नाही, तो लिंगदेहाच्या विळख्यातून मुक्त होतो. मोक्षप्राप्तीसाठी लिंगदेह पूर्णपणे नाहीसा व्हावा लागतो ते घडण्यासाठी सगळ्या गतजन्माचे कर्मसिद्ध बंध संपावे लागतात. ते ह्या तटस्थतेच्या धोरणाने शक्य होते. त्याचा त्या दिशेने प्रवास प्रारंभ होतो. असा मनाने तयार झालेला योगी तो भवसागर विनासायास पार करू शकतो. सवयप्रधान मन आणि शरीर त्यात त्याला साथ देऊ लागते व त्याचा मोक्षाप्रती प्रवास सुकर होतो. तो योगी

त्याचे जीवन व जग एकाद्या त्रयस्थासारखा पहात व अनुभवत असतो. त्यातील सुखाचे व दुःखाचे प्रसंग तो विचलित व होता झेलत असतो त्याचे त्यास कांहींच वाटत नाही कारण त्या गोष्टींशी त्याचा कांहींच संबंध नाही अशी त्याची पक्की धारणा झालेलेली असते. जगात घडणार्या सगळ्या घटनांकडे तो त्रयस्थाच्या नजरेने पहात असतो. त्यांबद्दल तो रागावत नाही किंवा आनंदीसुद्धा होत नाही. ज्याच्या इंद्रीयांबद्दलच्या वासना किमान पातळीवर आल्या आहेत तोंच ते साध्य करू शकतो. आत्म्याचे असें अस्तित्व हे एक विलक्षण रहस्य आहे जे समजणे सामान्यांना शक्य नसते. त्याला अनुभवणे हेसुद्धा एक विलक्षण सत्य आहे. ते ज्याला गवसले तो धन्य झाला. त्याला पुन्हा जन्म घ्यावा लागत नाही असें ऋषी सांगतात. ह्या विषयावर सांगणारे सगळे ऋषी ह्याबद्दल एकमत आहेत. ज्या रीतीने ते तुला सांगावयाचे त्या पद्धतीने मी तुला ते सांगितले आहे. येथे जसे सांगितले आहे तसे समजून तू तुझे कार्य केलेस तर तू मोक्षापदी जाऊ शकतोस.

मोक्ष धर्म पर्व भाग सत्त्याहत्तरावा संपला.

# मोक्ष धर्म पर्व
## भाग अठ्ठ्याहत्तरावा

व्यास पुढे सांगतात, तशा योग्याला सुगंध, स्वाद, सुमधूर आवाज अशांचे आकर्षण असेल तर त्यात तो अडकून जाऊ शकतो. म्हणून त्याला त्या भोगांचे आकर्षण असू नये. मान सन्मान, आदर सत्कार, स्तुती, कौतुक, प्रसिद्धी ह्याची अभिलाषा नसावी. तो दानं घेणार नाही. केवळ गुरूची सेवा केल्याने, वेदांचा अभ्यास केल्याने, ब्रह्मचर्य पालन केल्याने तो ब्राह्मण समजला जात नाही. जर त्याच्या वागण्यात नैतिकतेचे त्रयी (माणूसकी, चांगुलपणा भूतदया) नसतील तर तो ब्राह्मण समजला जात नाही. केवळ विविध यज्ञ करण्याने व पुजापाठ करण्याने तो ब्राह्मण होत नाही, त्याच्या वासना संयमित असल्या पाहिजेत. जर तो कोण्या जीवाला त्रास देत असेल तर तो ब्राह्मण ठरू शकत नाही. जो सुखाच्या गोष्टीने प्रभावित होतो तसेंच दुखाने व्यथित होतो तो खरा ब्राह्मण नसतो. जरी कांहीं कर्मकांड करून तो भल्याबुर्या मार्गाने स्वर्गात गेला तरी तो ताबडतोब खाली फेकला जातो. तो तिथे राहू शकत नाही. वेदाच्या अभ्यासाचा उद्देश सत्य समजणे असा आहे, इंद्रीयांचे नियमन करण्या मागील उद्देश असतो त्याग, त्यागाचा उद्देश असतो तपस्या, त्यागात सात्त्विक आनंद दडलेला असला पाहिजे, त्या सात्त्विक आनंदात स्वर्ग असतो, स्वर्गात मोक्ष असतो. सुखाच्या क्षणभंगूरतेच्या जाणीवेने शहाणा मनुष्य त्याच्या मागे जात नाही. समाधानात जे सुख असते ते चिरंतन असते. त्याने जी शांती प्राप्त होते ती सर्वश्रेष्ठ असते. आत्म्याचे दर्शन घडण्यासाठी माणसात सात्त्विक प्रवृत्ती असावी लागते. त्याला एकच वासना असली पाहिजे की, ब्रह्माचे ज्ञान कधी होईल. असा योगी तेथवर जाऊ शकतो. तो त्या अवस्थेत गुणांपासून मुक्त होतो म्हणजे त्याची अध्यात्मिक उर्जा अतितीव्र झालेली असते. तो सतत सुशुप्तीत असतो जरी वरकरणी तो जागृत असल्याचे भासत असते. असा ज्ञानी सहसा पुन्हा जन्म घेत नाही.

मोक्ष धर्म पर्व भाग अठ्ठ्याहत्तरावा संपला.

# मोक्ष धर्म पर्व
# भाग एकोणऐंशीवा

व्यास पुढे बोलतात, ज्या शिष्याला मोक्षाच्या प्रती इच्छा असते त्याला त्याचा गुरू मी आधी दिलेल्या सगळ्या गोष्टी समजावू देईल. त्यालाच अध्यात्म विद्या असें समजले जाते. आत्म्याचे पंचमहाभूतांशी, शरीराच्या माध्यमातून असलेले जे संबंध आहेत, तो त्या शिष्याला समजावून सांगतो. त्यानंतर तीन गोष्टी ज्यांच्या कार्यामुळें सगळे घडत असते त्या म्हणजे अज्ञान (अविद्या, माया), कर्म आणि कर्ता ह्यांची ओळख करून देतो. प्राचीन ऋषी अशा प्रकारे अध्यात्म विद्या शिकण्यास सुरूवात करत असतं. त्यानंतर मन आणि बुद्धि ह्या अव्यक्त साधनांचा परिचय तो त्याला करून देतो. त्याच्या मनात येणार्या सगळ्या शंका कुशंकांचे तो निरसन करतो. त्यानंतर जीव आणि आत्मा ह्यांच्यातील साम्य आणि फरक तो त्याला समजावून देतो. ह्या सगळ्यांवर काळ कसा प्रभाव करत असतो तेसुद्धा तो त्याला समजावून देतो. अशारितीने गुरू त्या मोक्षपदाची अपेक्षा करणार्या शिष्याला अध्यात्म विद्या शिकण्यास प्रारंभ करतो.

मोक्ष धर्म पर्व भाग एकोणऐंशीवा संपला.

# मोक्ष धर्म पर्व

## भाग ऐंशीवा

व्यास पुढे सांगतात, प्राचीन शास्त्रांत सांगितल्या प्रमाणे आत्मा अविद्येच्या (मायेच्या) प्रभावामुळें लिंगदेहाच्या कवचात अडकलेला असतो जरी प्रत्यक्षात तो पूर्ण ब्रह्म असतो. जसें सूर्याचे प्रखर किरणं जेव्हा कशावर तरी पडल्यानंतर परावर्तनामुळें जाणवतात जसेंच आत्म्याचे अस्तित्व कशाच्या तरी (शरीराच्या) प्रतिक्रीयांमुळें प्रतित होत असते. तेसुद्धा जर आपण त्याबाबत जागृत असलो तरच. त्याशिवाय मात्र अंदाजाने त्याला समजू शकतो मनुष्य. जर तो अंदाज कोणी बुद्धीवादी मान्य करणार नसेल तर त्याच्यासाठी तो असून नसल्यासारखेच असते. ध्यानसिद्ध योग्याला त्याचे प्रतिबिंब त्याच्या जीवात दिसू शकते. योग्याला त्याच्या ध्यान साधनेच्या माध्यमातून त्याच्या लिंगदेहाचे सुद्धा दर्शन होऊ शकते. त्या योग्याचा जीव त्या सात माध्यमांचा (महत, जागृती, पंचेंद्रिये) उपयोग करून ते साध्य करत असतो. अशा योग्याला जरा आणि मृत्यू त्रास देत नाहीत. सामान्य मनुष्य मात्र त्याच्या अज्ञानामुळे ते समजू शकत नाही. सामान्य मनुष्य त्याच्या कल्पनाविश्वात विविध प्रकारची काल्पनिक सुख आणि दुःख अनुभवत असतो जे प्रत्यक्षात अस्तित्वात नसतात. त्याच्या स्वप्नात तो कित्येक गोष्टींचा अनुभव घेत असतो ज्या खर्या दुनियेत नसतात. तसेंच योगी आत्म्याचे अनुभव घेत असतो. गर्भात वाढणार्या जीवास त्या त्रासदायक परिस्थितीचा क्लेष होत नाही. कारण तो अव्यक्त असतो. ते सगळे अनुभव सात्त्विक मनुष्य अनुभवतो जे तमोगुणी आणि रजोगुणी अनुभवू शकत नाहीत.

आत्मा जो सगळ्या प्राण्यात निरनिराळ्या स्वरुपात वावरत असतो तो समजण्यासाठी विज्ञानाची मदत घेणारे अनेक व्यर्थ प्रयोग करत असतात. असा आत्मा विश्वाच्या अंतीसुद्धा तसांच असतो कारण तो ब्रह्माचा अंश असतो. त्याच्या बरोबर त्याला साथ देणारे सुक्ष्म लिंगदेह मात्र बदलत असते त्याच्या कर्मविपाकामुळें.

चांडोक्य उपनिषदात ऋषी शांडिल्य सांगतात, आत्म्याचे गुण जे कधीच बदलत नाहीत. ते असे आहेत, तो सर्वज्ञ आहे, तो चिरंतन समाधानी असतो, तो सर्वव्यापी असतो, तो नित्य मुक्त असतो, तो पूर्णपणे जागृत असतो आणि तो सर्वशक्तीमान असतो.

हे विश्व अविद्येचा प्रभाव आहे म्हणून त्यात सूज्ञ जास्त रमत नाहीत. तो ब्रह्माच्या शोधात फिरत असतो ज्यासाठी त्याला सनातन शस्त्रं मार्गदर्शन करत असतात.

मोक्ष धर्म पर्व भाग ऐंशीवा संपला.

## - शांती पर्व भाग सहावा संपला -

## भाषांतरकाराचा परिचय -

मी अशोक कोठारे, माझ्या वयाची ७७ वर्षे झाली आहेत. गेली कित्येक वर्षे मी विविध प्राचीन ग्रथांचा एक कुतुहल म्हणून अभ्यास करत असतो. त्या काळात मला समजले कीं, आपल्या प्राचीन शिक्षण पद्धतीत चार ग्रंथांचे महत्व होते. त्यात मनुस्मृती, महाभारत, रामायण आणि योगवासिष्ठ हे महत्वाचे होते. आपल्या पूर्वीच्या शिक्षण पद्धतीत ह्या ग्रंथांचे वाचन करण्याची प्रथा होती. नंतरच्या काळात इंग्रजांनी त्यांची शिक्षण पद्धती येथे रुजवली व आपली पाठशाळा पद्धती संपुष्टात आली. आपल्या शिक्षण पद्धतीत अक्षर ओळख, नितीशास्त्र, गणित एवढेच शिकवले जात. त्याशिवाय शिकतांना घोकंपट्टी करण्याचे महत्व होते. ते सगळे आता इतिहास जमा झालेले असले तरी त्याची उपयुक्तता नाकारता येणार नाही. म्हणून एक प्रयत्न मी करावयाचे ठरवले. मी एक अतिसामान्य अभ्यासक आहे तरी व्यासंग मोठा आहे. त्या प्रमाणे, मनुस्मृती प्रथम ई-साहित्यच्या माध्यामाने तुम्हाला दिली. त्याचे चांगले स्वागत झाले आहे. त्यामुळें माझा उत्साह वाढला आणि महाभारताचे, 'जसे आहे तसे', अशाप्रकारचे भाषांतर आता देत आहे. त्याचे साधारणपणे ४० खंड होणार आहेत. संपूर्ण महाभारत येण्यास बराच अवधी लागणार आहे. इतर मंडळी महाभारताचे भाषांतर करतांना त्याचा आकार आटोपशीर करण्यासाठी त्यातील शिकवणूकीचा भाग व्यर्थ समजून सोडून केवळ कथाभागाचेच भाषांतर करतात त्यामुळे एक शैक्षणिक पुस्तक म्हणून असें भाषांतर रहात नाही. मी सगळ्या नितीशास्त्र शिकवणार्या कथा जशाच्या तशा ठेवल्या आहेत. कांहीं जागी विषय समजणे सोपे व्हावे म्हणून मी टीपा दिल्या आहेत कांही कंसात दिल्या आहेत, कारण मला माहित आहे किं, ह्याचे वाचन करणारे मराठी भाषिक सामान्य आहेत. कोणी विद्वान वाचक असेल तर त्याला त्या टीपांची गरज वाटणार नाही.

आता थोडे माझ्याबद्दल लिहीत आहे. तसे पाहता अशा कामात कोणी संस्कृतचा प्राध्यापक असला पाहिजे असें कोणाला वाटेल मग मी एक इंजिनीअर कां हे काम करत आहे असा प्रश्न पडेल पण त्याचे उत्तर असें आहे किं, एवढे मोठे काम करण्यास कोणी

तयार होत नाही आणि ते सुद्धा फुकट करणारा विद्वान मला मिळाला नाही. ज्या कोणाला मी त्याचे महत्व सांगितले ते सगळे त्या कामासाठी भरपूर मानधन मागू लागले मग मी ठरवले आपणच ते करावे. गेली २५ वर्षे मी निवृत्त जीवन जगत आहे, बराच समय माझ्याकडे आहे मग आपणच हे करावे अशा विचारांने ते करावयास घेतले व प्रथम मनुस्मृती दिली आता महाभारत देण्याचा प्रयत्न चालू आहे. त्यासाठी दैवयोगांने ई-साहित्य सारख्या ध्येयवादी मंडळींची साथ मिळाल्यामुळें माझा उत्साह द्विगुणित झाला.

१९८५ पर्यंत मी माझा उद्योग करत होतो. कारखाना भाईदरला व रहाणार चेंबूरला त्यामुळें येण्याजाण्याची दगदग माझ्या प्रकृतीला झेपली नाही व मी हृदयाच्या झटक्याने आजारी झालो. त्यानंतर डॉक्टराच्या सल्ल्याने मी सगळे उद्योग बंद करून घरात बसलो. थोडी बचत केली होती त्याच्या जोरावर आज मी माझे साधे जीवन जगत आहे. पैशापाठी लागण्याचा स्वभाव माझा मुळातच नाही. सुरुवातीपासून वाचनाचा छंद होता त्यात कथा कादंबर्या वाचण्यात रस नव्हता. मी कांहीं माहिती देणारे ग्रंथच वाचत असें. त्यामुळें अनेक विषयांचा व्यासंग झाला त्यात ही चार पुस्तक पुढच्या पिढीस विशेष उपयुक्त ठरतील असे मला जाणवू लागले तेव्हा त्यांची भाषांतरे करण्याचे ठरवले. त्या व्यतिरीक्त माझे लिखाण शेती विषयांत बरेच आहे. कॉटिनेंटलचे कै. रत्नाकर कुलकर्णी ह्यांनी आग्रहपूर्वक माझ्या कडून 'सेंद्रिय खत निर्मिती उद्योग', नांवाचे पुस्तक लिहून घेतले, मराठीतील हे पहिले खतविषयक पुस्तक आहे. त्याच्या चार आवृत्या झाल्या आहेत. बळिराजा मासिकाचे संपादक भोसले ह्यांच्या आग्रहामुळें त्यांच्या मासिकांत मी १९९२ ते २००५ पर्यंत शेतकर्यांना शेतीचे पद्धतशीर शिक्षण एका लेखमालेच्या द्वारा दिले आहे. त्यात ६५ लेख लिहीले. त्या शिवाय संपादक भोसल्यांच्या आग्रहामुळें निसर्गशेतीचे तंत्र शिकवणारा एक अभ्यासक्रम, 'व्यावहारिक निसर्गशेती अभ्यासक्रम' तयार करून तो स्वखर्चानें शेतकर्यांसाठी १९९४ साली उपलब्ध केला. त्यामुळें आपल्या महाराष्ट्रात निसर्गशेतीचा प्रचार झाला. आता ह्या उतारवयात जेव्हां शरीर साथ देण्यात कुचराई करू लागले आहे,

माझे सगळे लक्ष आपल्या हिंदू मान्यतांचा मराठी माणसाला परिचय करण्यावर आहे. त्यासाठी महाभारत, रामायण व योगवासिष्ठ ह्यांचे 'जसे आहे तसें' अनुवाद करण्यावर भर आहे. माझे ज्योतिष शास्त्राचे ज्ञान चांगले आहे. त्याप्रमाणे जर गोष्टी होणार असतील तर मी २०२० नंतर नसेन. त्यासाठी हे सगळे उपक्रम लवकरात लवकर उरकण्याचा मानस आहे.

आता कोणाला प्रश्न पडेल कीं, हा इंजिनियरींगचा माणूस शेतीवर कसें लिहीतो? त्या बद्दल थोडे लिहीतो. माझ्या कारखान्यात बहुतेक कामगार उरण, अलिबाग, वसईचे होते. शिक्षण बेताचे पण एकादे अवजार कसें वापरावयाचे ते शिकवले किं, ते त्यात लवकरच निष्णात होत होते. त्या मुलांना मी विचारले किं, ते एवढे हुशार असूनही शेती कां करत नाहीत? त्यांचे एकच उत्तर असें, मालक शेतीत भागत नाही. मग मी ठरवलें शेतीशास्त्राचा अभ्यास करावयाचा. अभ्यासाचाच छंद असल्यामुळें तो सुरु झाला. त्यात मला लवकरच समजले कीं, शेतीचा संबंध बॉटनी पेक्षा मायक्रोबायॉलॉजीशी जास्त आहे. मग मी त्या विषयाचा अभ्यास करून त्यात लवकरच पारंगत झालो. त्या अभ्यासाप्रमाणे मी कांहीं तंत्र विकसित केले व ते अजमावण्यास सुरुवात केली. त्यात अपेक्षेप्रमाणे परिणाम मिळू लागले त्याप्रमाणे एक शेतीतंत्र विकसित होत गेले. माझ्या कामगाराच्या शेतावर माझे प्रयोग होत होते, त्यात माझा पैसा लागत होता व त्यांचे कुटूंबिय काम करत होते. त्यावेळी मी चांगला तरुण होतो व उत्साहसुद्धा होता. माझ्या तंत्राने शेती उत्तम होते हे मी समजलो व ते सगळे तेथेच संपले. ते सगळे १९८२ ते १९८५ अशा सालात झाले होते. मीसुद्धा ते सगळे विसरून गेलो. परंतु, १९९२ साली मोठा दुष्काळ पडला होता महाराष्ट्रात त्यावेळी मी एक दृष्य टीव्हीवर पाहिले, त्यात एक ग्रामीण महिला एका खोल विहीरीत उतरून वाटीने पाणी काढून बालदीत भरत होती. त्यावेळी मला रहावले नाही व विचार केला, माझ्या ज्ञानाचा जर उपयोग होणार नसेल तर काय कामाचे ते ज्ञान. मी एक लेख लिहीला व दैनिक नवशक्तिला पाठवला. तो लेख त्यांनी प्रसिद्ध केला नाही. मग मी तो लेख बळीराजा

मासिकात पाठवला. त्यात तो छापून आला. तसे पहाता नवशक्तिनेसुद्धा तो प्रसिद्ध केला. त्यानंतर बळीराजाच्या वाचकांची प्रश्न विचारणा सुरु झाली व मी माझे शेतीचे ज्ञान त्यांना त्या मासिकात लेख लिहून देऊ लागलो. अशारितीने माझे शेतीत लिखाण भरपूर झाले. त्याबद्दल आधी लिहीले आहे.

आता थोडे माझ्या ब्लॉगपोस्ट बद्दल लिहीतो. हिंदूस्तानात २००८ साली इंटरनेटवर ब्लॉग सुरु झाले व मी त्यात माझे ब्लॉग सुरु केले. माझ्या ख्रिस्ती धर्माबद्दलच्या वादग्रस्त परंतु शास्त्रशुद्ध विवेचनामुळें पहिले ब्लॉग बंद झाले. माझे पूर्वी पांच ब्लॉग होते. त्यात मी अभ्यासांने जे संशोधन करून शोधून काढत असें, ते लिहीतो. त्यात अनेक विषयावरील माझे संशोधित साहित्य प्रसिद्ध करत असतो. त्यात ब्राह्मण धर्म, जैन धर्म, ख्रिस्ती धर्म, इस्लाम, अर्थ, न्याय, नितीशास्त्र, राजकारण अशा विषयांवर बरेच लिहीत असतो. ते तुम्ही वाचू शकता. एकच ब्लॉग मराठी आहे बाकीचे इंग्रजीत आहेत. सिलीकॉन मधील ब्लॉग इस्लाम बद्दलच्या माझ्या संशोधनाचे शास्त्रशुद्ध लिखाण आल्यानंतर बंद झाला आहे. गुगलवरील ब्लॉग मात्र जोरात चालू आहेत. माझे अशा विषयावरील विचार नाकारता येणार नाहीत असें सत्याला धरून असल्यामुळे जेव्हां मला कोणी विरोध करतो तेव्हां त्यांना मी नम्रपणे सांगतो, कृपया माझ्यावर अब्रुनुकसानीचा दावा करावा, ते झाले किं, ते लोक गप्प होतात. कारण, जर ते तसा दावा करतात तर त्यात तेंच हरण्याचा संभव जास्त असतो. एवढेच नाही तर त्यांच्या खोटेपणाचा जाहिर बभ्रा होईल ते त्यांना परवडण्यासारखे नसते. मी प्रचारकी थाटाचे लिखाण करत नाही. जे समजते ते विज्ञानाच्या आधाराने सिद्ध करूनच लिहीतो, आजच्या काळात असें लिखाण बर्याच गटांना आवडत नाही. बर्याच लोकांचे खूनसुद्धा झाले आहेत हे आपण जाणताच, म्हणून मी शक्यतर माझ्याबद्दल कांहीं लिहू इच्छित नाही. सत्यापेक्षा सोइस्करचा आज जमाना आहे. माझे जीवनातील अनुभव लिहीले तर ते एक वाचनीय पुस्तक होईल पण त्यात सर्व वादग्रस्त विषय पुढे येतील. मी मांडलेला कोणताही मुद्दा आजवर कोणालाही खोटा ठरवता आलेला नाही. जाता जाता,

जैन धर्माबद्दलचा वाद सांगतो एक उदाहरण म्हणून, १९०२ मध्यें सर जगदीशचंद्र बोस ह्यांनी वैज्ञानिक पुरावे देऊन जे सिद्धांत मांडले त्याचा पुरावा देऊन मी लिहीले कीं, हल्ली जो जैन धर्म प्रचारात आहे तो तीन हजार वर्षापूर्वीच्या अडाणीपणावर आधारित आहे, त्यातील सगळेंच विचार अज्ञानाधारीत म्हणून खोटे आहेत. एवढेच नाही तर व्यवहारिक जीवनात तो धर्म पाळणे केवळ अशक्य आहे. त्यामुळें जैन उखडले पण सुदैवाने ते खूनखराबा करणारे नसल्यामुळें वाचलो.

शेवटी माझ्या तब्यती बद्दल लिहीतो. मुळातच माझी प्रकृती तोळामासा असते त्यात २०१० साली बेस्टच्या बसने मला ५० फूट लांब फेकल्यामुळें पुरता जायबंद झालो होतो. मेंदूला आघात झाल्यामुळें माझी स्मरणशक्ती गेली होती. दोन बरगड्या तुटल्या होत्या. माझे शौंच व मुत्र ह्यांवर नियंत्रण राहिले नव्हते. दीड वर्ष तसेंच गेले. त्यावेळी माझे वय ६८ होते. केवळ दैव बलवत्तर म्हणून आज मी पूर्ववत झालो आहे तरी कोठल्याही वाहनाने प्रवास करण्यास परवानगी नाही. म्हणून मी कोठेही जात नाही. गेलेली स्मृति पुनः आली व आता सगळे बरे चालले आहे. त्या काळातील अनुभव विशेषकरून माझ्या ज्ञान साधनेचे, मोठे रोचक आहेत. तूर्तास एवढे पुरे.

ई-साहित्यच्या पदाधिकार्यांच्या आग्रहामुळें ही माझ्याबद्दली खरी माहिती सविस्तरपणे दिली आहे. जर शक्य असेल तर त्यातील मजकुरात बदल न करता तो प्रसिद्धीस घ्यावा.

अशोक कोठारे,

२३- २ -२०१८

ashokkothare@gmail.com ,

## ई साहित्य प्रतिष्ठान -

मराठी भाषा आता झेप घेण्याच्या मूड मध्ये आहे. रडणार्यांकडे लक्ष नका देऊ. मराठीत कधीच नव्हते इतके वाचक आहेत आता. पुर्वी पुस्तकाच्या एका आवृत्तीच्या हजार न हजार प्रती छापल्या जात. पांच हजार म्हणजे डोक्यावरून पाणी! आता ई पुस्तकांच्या जमान्यात एक एक पुस्तक पाच लाख वाचकांपर्यत जात आहेत. वर्षाला अर्धा कोटी डाऊनलोड होतात. वाचक एकमेकांना परस्पर ऑर्डर करतात. व्हट्स अप, ई मेल, ॲप्प, ब्ल्यु टुथ, वेबसाईट, पेन्ड्राईव्ह, सिडी अशा असंख्य मार्गांनी पुस्तकं व्हायरल व्हायला लागली आहेत. सुसाट सुटल मराठीचं वारु. खेड्यापाड्यांच्या गल्लीबोळांपासून ते जगाच्या पाठीवरील प्रत्येक देशात. रॉकेटच्या वेगांने सुसाट सुटलेल्या मराठीच्या गाडीला आता कोणी थांबवू शकत नाही. या धूमधडक क्रांतीत साहभागी व्हा. आपल्या ओळखीच्या मराठी साक्षरांना यात ओढा. त्यांचे ई मेल पत्ते, व्हाट्सप नंबर आम्हाला पाठवा. तुम्ही कितीही वाचक आणा. ते शंभर आणतील आणि ते हजार आणतील. तुमच्या व्हाट्सप ग्रुपमधून याची जाहिरात करा. आपल्याला कुठली पुस्तकं वाचकांपर्यंत पोहोचवायची आहेत ते आपल्याला टिव्ही, पेपरची जाहिरात परवडत नाही. आमचे वाचक हेच आमचे जाहिरात एजंट. तेच आमची ताकद. मराठी भाषेची ताकद जगाला दाखवून देऊ.

esahity@gmail.com ला कळवून ई-मेलने मांगवा. किंवा 7710980841 हा नंबर सेव्ह करून ठेवा, या नंबरला तुमचे नांवाने Whatsapp करून पुस्तके whatsapp मार्गे मिळवा. लिंक ई साहित्यचे app.https://play.google.com/store/apps/details?id=com.

esahity.www.esahitybooks ह्या लिंकवर उपलब्ध आहेत. ते download करा. हे सर्व मोफत आहेत.

धन्यवाद,